
# ई-अभिव्यक्ती (मराठी) – दिवाळी अंक - 2022

प्रवेशांक



ई-अभिव्यक्ती (मराठी)

सम्पादक मंडळ



सौ. उज्ज्वला केळकर



श्री सुहास रघुनाथ पंडित



सुश्री मंजुषा सुनीत मुळे



सौ. गौरी गाडेकर



www.e-abhivyakti.com

## व्यक्ति विशेष - श्री संदीप राशिनकर



(चित्रकार आणि लेखक)

**जन्म :** ७ मे १९५८, इंदोर
**शैक्षणिक अर्हता :** बी.ई. ( सिव्हिल )
श्री. संदीप राशिनकर हे सुपरिचित आणि मान्यवर चित्रकार, लेखक आणि समीक्षक आहेत.
आत्तापर्यंत अनेक अखिल भारतीय कला प्रदर्शनांसाठी त्यांच्या चित्रांची आवर्जून निवड केली गेलेली आहे. तसेच, मुंबई, गोवा, इंदोर, निमच,या ठिकाणी आणि लंडनमध्येही त्यांच्या चित्रांची स्वतंत्र प्रदर्शने भरवली गेलेली आहेत.
राष्ट्रीय पातळीवर प्रकाशित केल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांमध्ये आणि साप्ताहिकांमध्ये आत्तापर्यंत त्यांची अक्षरशः हजारो चित्रे आणि रेखांकने प्रकाशित झालेली आहेत.
भारतीय ज्ञानपीठासह अनेक प्रतिष्ठित प्रकाशनांच्या शेकडो पुस्तकांची मुखपृष्ठे श्री. राशिनकर यांनी चित्रांकित केलेली आहेत. म्यूरल्सच्या क्षेत्रातही ते कार्यरत असून अनेक ठिकाणी अनेक प्रतिष्ठानांसाठी त्यांनी भव्य म्यूरल्स तयार केलेली आहेत. आणि त्यात अनेक अभिनव आणि यशस्वी प्रयोगही केलेले आहेत. ब्रास आणि स्टील यांचा वापर करून त्यांनी स्वतः अनेक कलाकृती साकारल्या आहेत, ज्या देश-विदेशातील अनेक कलाप्रेमींनी स्वतःकडे जतन करून ठेवल्या आहेत.
पत्नी सौ. श्रुती यांच्या सहयोगाने त्यांनी लिहिलेला "कुछ मेरी कुछ तुम्हारी" हा काव्यसंग्रह, आणि त्यांनी स्वतः लिहिलेले "कैनवासपर शब्द" हे पुस्तक– अशी त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झालेली असून दोन्हीही लोकप्रिय ठरलेली आहेत. तसेच पुरस्कारप्राप्तही ठरलेली आहेत. याखेरीज 'कला-संस्कृती' या विषयावरही त्यांनी बरेच लेखन केलेले असून, त्यांचे समीक्षात्मक लेखनही प्रकाशित झालेले आहे.
"जीवनगौरव" पुरस्काराबरोबरच देशभरातील अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी श्री. राशिनकर यांना सन्मानित केले गेलेले आहे.
**संपर्क:-**: ११-बी , मेन रोड , राजेंद्रनगर , इंदौर -४५२०१२ (म.प्र.)
**मो.** ९४२५३ १४४२२ / ८०८५३ ५९७७० email :rashinkar_sandip@yahoo.com
**Web Site.** http://www.sandiprashinkar.com

## व्यक्ति विशेष - डॉ. भारती माटे



(चित्रकार, लेखिका आणि कवयित्री)

**शैक्षणिक अर्हता :** M.Com, CAIIB, Ph.D.(from Irvine (USA) Sub: "Art History of Rangavali & Dry Frescos of Rangavali as Neo-Antiques".)
**Proprietor :** TAO ARTS, Pune **Creative Director :** TAO Communications, Pune
**संस्थापक** : भारती माटे फाईन आर्ट्स अँड रिसर्च सेंटर, पुणे. आर्ट वेलफेअर, पुणे.
भारती माटे यांच्या व्यक्तिमत्वाचे अद्वितीय म्हणावेत असे आणखी दोन पैलू आहेत... एक म्हणजे त्यांच्या समकालीन कलाकारांमध्ये त्याच एक अशा कलाकार आहेत, ज्यांना खरोखरच "आत्मशिक्षित" कलाकार म्हणता येईल.
दुसरी गोष्ट अशी की त्या "चित्रकार कवयित्री" आहेत. सर्जनशील असणारी त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, कविता आणि चित्रकारिता अशा दोन्ही क्षेत्रात एकाचवेळी उत्तम प्रकारे कार्यरत असते. आणि या दोन्ही कार्यक्षेत्रात त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यांची ही वैशिष्ट्यपूर्ण आणि सुंदर रांगोळी चित्रे विक्रीसाठीही उपलब्ध आहेत.
**मो.** : +91 9890722120 Email : bharati.taoarts@gmail.com
**Web Site** : www.bharatimate.com Blog : https://bharatimate-painter.blogspot.com/





## संपादकीय

गणेशोत्सव सुरू झाला की लगेचच आपल्या सांस्कृतिक पर्वाचाही श्रीगणेशा होतो. विजयादशमीचा उत्सव साजरा करत असतांनाच एकीकडे प्रकाशोत्सवाची अर्थात् दीपावलीची प्रतीक्षा सुरू होते. मन नकळतच उल्हसित झालेलं असतं. दीपोत्सवासाठी ऑनलाइन शॉपिंग / मॉलशॉपिंग यासाठीच्या अनेक जाहिराती, आणि टी.व्ही. वरून व कितीतरी अन्य प्रकारांनी केल्या जाणाऱ्या जाहिराती आपल्याला आकर्षून घेऊ लागतात. सोन्या-चांदीची दुकाने, लहानांपासून मोठ्यांपर्यंतच्या हरतऱ्हेच्या कपड्यांची, साड्यांची आणि वैविध्यपूर्ण भेटवस्तूंची दुकाने आधीपासूनच सजू लागलेली असतात.

अशावेळी आपल्या बालपणापासून ते आत्तापर्यंत दरवर्षी आपण साजऱ्या केलेल्या दिवाळीच्या आठवणी आपल्याला भावविभोर करतात. तेला-तुपाच्या दिव्यांपासून ते रंगी-बेरंगी, झगमगणारे, मनमोहक छटांचे विद्युत दिवे, वेगवेगळ्या आकारांचे चित्ताकर्षक आकाशकंदील, आणि त्यांच्या जोडीने लाडू, चकली, चिवडा, करंजी या पदार्थांचा स्वाद– भरीला गुलाबी थंडीची चाहूल देणारे आल्हाददायक वातावरण — सारे कसे आपल्यासाठी दिवाळीचा भरभरून आनंदच जणू सोबत घेऊन येतात.

या आनंदात भर घालणारी आणखी एक गोष्ट हा दीपोत्सव नेहेमीच घेऊन येतो, आणि ती गोष्ट म्हणजे फराळाच्या जोडीने साहित्याची मेजवानी देणारे विविध दिवाळी विशेषांक– दिवाळी अंकांशिवाय दिवाळी खरंच अपुरी अपुरी वाटते ना ! घरातील सारेच जण, त्याहीपेक्षा सगळेच सुजाण वाचक अतिशय उत्सुकतेने दिवाळी अंकांची वाट बघत असतात. आणि प्रत्येक सुजाण लेखकालाही वाटत असतं की दिवाळी विशेषांकांच्या माध्यमातून आपल्या भाव-भावना, आपले विचार वाचकांपर्यंत जणू अधोरेखित होऊन पोचावेत.

या दिवाळी अंकांनाही आपला असा एक इतिहास आहे बरं का ! कै. काशीनाथ रघुनाथ आजगावकर, जे, का. रा. मित्र या नावाने सुपरिचित होते, त्यांनी सन १९०९ मध्ये " मासिक मनोरंजन " नावाने पहिला दिवाळी अंक प्रकाशित केला होता. हे त्यांनी उचललेले नक्कीच एक ऐतिहासिक पाऊल म्हणायला हवे. हा दिवाळी अंक १९३५ सालापर्यंत ते सातत्याने प्रकाशित करत होते. आणि त्यानंतरही आजतागायत अनेक वर्षे सातत्याने सुरु असलेली, ही खास दिवाळीसाठी प्रकाशित केल्या जाणाऱ्या अंकांची परंपरा पहाता, श्री आजगावकर यांचे हे कार्य आपणा सर्वांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरलेले आहे.

आज अनेक प्रकाशन संस्था दिवाळी अंक प्रकाशित करताहेत. आणि त्याचबरोबर, सतत प्रगत होत असलेल्या तंत्रज्ञानामुळे आता कागदविरहित ' वेब दिवाळी अंक' ही प्रकाशित होऊ लागले आहेत. आपल्या " ई-अभिव्यक्ति (मराठी) " च्या संपादक मण्डळानेही यंदा असाच दिवाळी अंक काढण्याचे ठरवले. सर्वच जण अर्थातच सहमत होते आणि तितकेच उत्सुकही होते. मग या दिशेने अथक प्रयत्न सुरू झाले, आणि आज आमचा हा पहिला दिवाळी अंक प्रत्यक्ष साकार झाला आहे.

या अंकासाठी अनेक लेखकांनी आणि कवींनी मनापासून सहकार्य केले आणि त्यामुळे अगदी अभिरुचीपूर्ण असा हा अंक मूर्तरूपात आला आहे ई-अभिव्यक्ती मंच त्या सर्वांचाच मनापासून आभारी आहे. तसेच, ' फ्रेस्को ' या वैशिष्ट्यपूर्ण चित्रशैलीत अतिशय पारंगत असणाऱ्या चित्रकार डॉ. भारती माटे आणि सुप्रसिद्ध चित्रकार श्री संदीप राशिनकर, या दोघांनी या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठासाठी आणि अंतर्गत रेखाटनांसाठी त्यांची सुंदर चित्रे नि:शुल्क उपलब्ध करून दिली. त्यासाठी ई-अभिव्यक्तीतर्फे दोघांचेही अगदी मन:पूर्वक आभार.

ई-अभिव्यक्ति (मराठी) चा हा पहिलाच दिवाळी विशेषांक आम्ही आपणा सर्वांना सहर्ष समर्पित करतो आहोत. आपल्या साहित्यिक प्रतिक्रिया आम्हाला आमच्या या आगळ्यावेगळ्या साहित्यिक प्रवासासाठी नक्कीच प्रेरणा स्रोत ठरतील.

आपणा सर्वांसाठी ही दिवाळी आणि येणारे नववर्ष अतिशय सुखासमाधानाचे, आनंदाचे आणि आरोग्यसंपन्न ठरो या मंगल कामनेसहित सादर ..

हेमन्त बावनकर


**प्रधान संपादक**

# अनुक्रमणिका


1. व्यक्ति विशेष – श्री संदीप राशिनकर आणि डॉ भारती माटे 2
2. चित्रकाव्य - शुभ दिवाळी - श्री सुहास रघुनाथ पंडित 5
3. कथा - बापाचा बाप - श्री आनंद हरी 6
4. लेख - सहज फुलू द्यावे फूल - सौ मनीषा चिंतामणी आवेकर 11
5. कथा - अखेर सत्य स्विकारलं - श्रीमती अनिता जयंत खाडीलकर 14
6. कथा - आणि गौरी कथालेखिका बनली - सौ. उज्ज्वला केळकर. 16
7. पुस्तकावर बोलू काही - कलामांचं बालपण - श्री. गुरुनाथ चंद्रकांत ताम्हणकर 20
8. कविता - अजब सोहळा - श्रीमती अनिता जयंत खाडीलकर 22
9. कथा – ट्रिटमेंट - सौ. अंजली दिलीप गोखले 23
10. कविता - दिवाळी -सौ. रंजना मधुकर लसणे 26
11. कथा - त्या पिंपळाच्या साक्षीने - सौ. वंदना अशोक हुळबत्ते 27
12. पुस्तकावर बोलू काही - दिगंतर (कथा संग्रह) - सौ. राधिका भांडारकर 31
13. कथा - पिकलं पान - श्री रवींद्र पां. कानिटकर 34
14. कथा – पीळ - डॉ ज्योती गोडबोले 36
15. कथा - मायेची सावली - सौ. अर्चना सुरेश देशपांडे 40
16. कवितेचा उत्सव - चंदन जळले - श्री अशोक श्रीपाद भांबुरे 43
17. कथा - माहेरचे घर - श्री उदय गोपीनाथ पोवळे 44
18. कथा – वळणवाटा - श्री अरविंद लिमये 47
19. कथा – वेळ - सौ. सुजाता काळे 51
20. कथा – रिचार्ज - सौ. गौरी गाडेकर 54
21. मुलाखत श्री. प्रताप रघुनाथ चिपळूणकर (लोकाभिमुख, कृतिशील, कृषी तज्ञ) - सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई 59
22. नाटिका - दिव्या दिव्या दीपत्कार - सौ. दीपा नारायण पुजारी 65
23. लेख - अनुभवांची दिवाळी - सुश्री प्रभा सोनवणे 70
24. "कृतार्थ वारकरी" - (कथाकाव्य) समृद्ध वारकरी - श्री सुहास सोहोनी 72
25. कविता – प्रवास - श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर 75
26. कविता - मी गृहिणी - सुश्री प्रेमा माधव कुलकर्णी 76
27. कविता - हे मनां... ! - सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी) 77
28. कविता - .. दीप-ज्योति - सुश्री दीप्ति कुलकर्णी 78
29. कविता – आई - श्री आनंदराव (नंदकुमार) रघुनाथ जाधव 79
30. कविता – व्रतस्थ - श्री शरद कुलकर्णी 80
31. कविता - हार... प्रहार... - प्रा. सौ. सुमती पवार 81
32. कविता - एक तारा उगवता - श्री प्रकाश लावंड 82
33. कविता – आठवणी - सुश्री मंजुषा सुनीत मुळे 83
34. कविता - आयुष्याचे व्हावे चंदन.. - श्री सुहास रघुनाथ पंडित 84
35. कविता - करायचं काय... ? - डॉ.सोनिया कस्तुरे 85
36. काव्यानंद - जय शारदे वागेश्वरी - कवयित्री शांता शेळके - सौ. विद्या पराडकर 86
37. चित्र काव्य -- चित्र क्रमांक १ - सौ. ज्योत्स्ना तानवडे 88
38. चित्र काव्य -- चित्र क्रमांक २ - सौ. ज्योत्स्ना तानवडे आणि सौ. नीला देवल 89
39. पुस्तकावर बोलू काही - "दि अल्टिमेट इन्व्हेस्टर" - सौ. प्रभा हर्षे 90
40. पुस्तकावर बोलू काही - व्याख्यानांचे आख्यान - सुश्री तृप्ती कुलकर्णी 93
41. पुस्तकावर बोलू काही — खारीच्या वाटा - सुश्री सुलू साबणे जोशी 96
42. पुस्तकावर बोलू काही - "धरणकळा" - सुश्री सुलू साबणे जोशी 97
43. लेख – पुण्यातील पहिल्या महिला पत्रकार - श्रीमती विद्या नाडगौडा - सुश्री संगीता कुलकर्णी 99
44. लेख – आयुष्याचा चिरंतन प्रवास - सुश्री संगीता कुलकर्णी 103
45. लेख - मी कृतज्ञ आहे..... माझ्या सुपरमूनची - सुश्री ज्योती विलास जोशी..... 105
46. लेख - "जागृत ग्राहक व्हा" - ॲड. ज्योत्स्ना (सावळे) डासाळकर 107
47. लेख - जेम्स वेब अंतरिक्ष दुर्बीण - श्री राजीव गजानन पुजारी 109
48. लेख - घ डी ! - श्री प्रमोद वामन वर्तक 114
49. लेख - गंध सुगंध - सौ. उज्वला सुहास सहस्रबुद्धे 117



श्री सुहास रघुनाथ पंडित



# चित्रकाव्य - शुभ दिवाळी

लक्ष्मी आणि सरस्वती
नित्य जिथे वसती
धन, धान्य, ज्ञान संपदा
नित्य तिथे नांदती.

या दिपामधल्या वाती
अंधारा भेदून जाती
स्नेहाने जोडून नाती
प्रकाश गीते गाती.

तम सगळा विरून जावा
कण कण तो उजळावा
दु:खाचा अंश नसावा
सौख्याचा बाग फुलावा.

कलहाचे वादळ निवळो
दशदिशात दीपक तेवो
मन प्रसन्नतेने बहरो
नववर्ष सुखाचे जावो.

चित्र - डॉ भारती माटे

**श्री सुहास रघुनाथ पंडित** - सांगली (महाराष्ट्र) - मो - 9421225491

# कथा - बापाचा बाप



श्री आनंदहरी

’बापाची चप्पल पोराच्या पायाला याला लागली का त्येला मैतर म्हणावं' आसं सांगत हुतास.. केला मैतर.. आपुनबी त्येचं मस्त मैतर झालो तरी पोरासनी तसं वाटाय नगं? पर त्येनं हुतं काय.. तेच्यासाठनं बाप बाप बी ऱ्हात न्हाय आन मैतरबी होत न्हाय. तेच्यात आईची माया. ही 'माझा सोन्या, माझा रुप्या 'करीत ऱ्हातीच.. मग काय वो. ख्वांड उधळाय किस्ता वखुत लागतूय?"

रामराव हसत हसत बोलत होता. लांब बदली झाल्याने जवळपास दोन वर्षांनी सुट्टी काढून मी गावाकडे आलो होतो. आम्ही पूर्वी जमायचो तसेच आल्यादिवशीच रात्रीचे जेवण झाल्यावर रामरावच्या सोप्यात आम्ही गप्पा मारायला जमलो होतो. रात्रीची गप्पांची वेळ ही आम्हां चार-पाच मित्रांची अगदी शालेय जीवनापासूनची. ज्याचे जेवण आधी होईल तो दुसऱ्याकडे जायचा.

मोठे झालो कोण शेती करू लागला, कोण नोकरी करू लागला. कुणी छोटा-मोठा व्यवसाय करू लागला. सगळ्यांची लग्ने झाली. प्रपंच सुरू झाले, बहरले, मुले मोठी झाली पण ती गप्पांची वेळ काही चुकली नाही. मी नोकरीला लांब असल्याने गेले काही वर्षे मीच तेवढा पाहुणा कलाकार झालो होतो. अधून-मधून गावी आलो की मात्र हमखास असायचो, एक दिवस चुकवायचो नाही. बाकी सारे रोज जमायचे अगदी नित्य नेमाने.

रामराव चंची बाळगून पान खायला लागल्यापासून रामरावचा सोपा हेच बैठकीचे ठिकाण झालेले होते.. दिवस मावळून गेल्यावर कुठं कुठं गेलेली पाखरं एक एक करत त्यांच्या झाडावर येतात तसेच आमचं. आपआपली जेवणे झाली की एक एक करीत सारे जण रामरावच्या सोप्यात यायचे. गप्पांची मैफल जमायची ती अगदी डोळ्यांत झोप दाटून येईपर्यंत. मग एक एक जण बाकीच्यांचा निरोप घेऊन आपापल्या घरी परतायचा. आज बाकीचे सगळे परतले होते.

मी ही उठायच्या तयारीत होतोच. तेवढ्यात रामरावने 'बापाची चप्पल.. ' करीत काहीशा गांभीर्याने बोलायला सुरुवात केली तसा मी मनोमन चपापलो आणि उठायचा विचार सोडून देऊन मागे भिंतीला टेकत विसावलो. खरे तर गंभीर होणे हा रामरावचा स्वभावच नव्हता. कितीही गंभीर किंवा सलणारी गोष्ट असली तरी ती तो हसत हसत सांगायचा.

“रामराव, काहीही झालं तरी हसत बोलणारा तू आज एकदम गंभीर झालायस ?" काय झालंय हे नेमकेपणाने कळावे म्हणून मी विचारले.

"गरीबाने गरिबीला हासल्याबिगर गरिबी पचतबी न्हाय आन रुचतबी न्हाय. रडून काय हुतंय ? सुखागत दुखबी हासून साजरे केले तर हलकं वाटतं."

"खरं आहे तुझं. पण वाटणी होऊन मिळालेल्या अर्ध्या एकरात तू केलेलं माळवं तुझ्या हासण्याने फुलायचं. त्यात सुखाने मीठ-भाकर खात होतास."

"व्हय ! पर त्ये दिस ऱ्हायल्यात कुठं ? खाणारी तोंडं वाढली म्हणून का शेतजमीन वाढत न्हाय.. पर ह्ये आगुदर न्हाय उमगत.. 'बैल गेला आन झोपा केला ' म्हणत्यात तसं आसतंय आपलं. मला सांगा आमच्या अर्ध्या एकराच्या राज्याला वारस नगं व्हय? मग तीन पोरी झाल्याव आलं की युवराज.."

रामराव हसत हसत बोलत होता पण ते हसणे नेहमीसारखे दिलखुलास हसणे नव्हते. त्याला कुठंतरी हतबलतेची किनार होती, वेदनेचे कोंदण होते.

"रामराव, अरे झाले ते झाले.. आता त्याचा विचार कशाला ?"

"त्ये बी खरंच हाय.. झाल्याव इचार करून काय बी उपेग नसतोय आणि आगुदर इचार करायचं सुचतबी न्हाय. तवा वाटतं उद्याचा इचार आज कशापायी करावा ? उद्याचं बगू उद्या.. पर त्ये बगाय उद्या कवा उगवतच न्हाय.. "

यावेळी मात्र रामराव मनापासून हसला. त्याचेही खरेच होते. उद्या कधीच उगवत नसतो. खरंतर मी त्याच्या ज्या वाक्याने थबकलो होतो, त्या अनुषंगाने तो बोलतच नव्हता आणि त्याला त्या विषयावर कसे आणावे असा मी मनोमन विचार करत होतो, तोवर तोच म्हणाला,

"लय रात झाली बग.. बोलण्याच्या नादात येळ कवा सरती त्ये ध्येनातच येत न्हाय.. तुजी झोपंची येळ उलटून गेली आसंल.. हाय न्हवंका चार-पाच रोज ? येरवाळी ये की च्या प्याला.. "

कदाचित माझ्या झोपेच्या वेळेची जाणीव झाल्यामुळे असेल त्यानेच विषय बदलला तसा मी उठलो. निरोप घेऊन घरी आलो. सकाळी मी उठेपर्यंत तो कामाला गेलाही होता. चहा घेताना भाऊ म्हणाला,

"दादा, रात्री केंव्हा आलास ? बराच वेळ गप्पा चालल्या होत्या वाटतं रामभाऊकडे ? "

"होय, पण काय रे रामभाऊचे काही बिनसलंय काय ? "

"काही म्हणाला का रामभाऊ ?"

"नाही. तो काही म्हणाला नाही पण त्याच्या वागण्या-बोलण्यात पूर्वीसारखा उल्हास वाटला नाही. मनात एखादा सल असावा आणि तो दडवत नेहमीसारखे वागण्याचा प्रयत्न करावा, तसे त्याचे वागणे वाटलं मला."

"हं. त्याचा तो स्वभावच आहे. तू जिवलग मित्र असून तुला सांगितले नाही.. मग इतरांना कसा सांगेल? पण दादा, ऐकिवात गोष्ट अशी आहे की त्याच्या मुलाने लग्नानंतर भरपूर कर्ज करून ठेवलंय... आणि ते देणेकरी दारात आले तेंव्हा रामभाऊला समजलं."

"काय? त्याच्या मुलाने कर्ज केले ? आणि कशासाठी ?"

"सगळे म्हणतात, चैनीसाठी. खरं खोटं तोच जाणे. पण बहुदा तेच खरे असावे. रामभाऊने रान गहाण टाकून थोडे पैसे भागवले.."

"त्याचा मुलगा काय करतो."

"रान गहाण टाकले त्यावेळीच रामभाऊने त्याला घराबाहेर काढले. आता कोल्हापूरकडे कुठंतरी असतो म्हणे,.."

"रामभाऊने त्याला घराबाहेर काढलं ? आश्चर्य आहे."

"खरंच आश्चर्य आहे. त्याची खूप माया आहे पोरावर.. घराण्याचा एकुलता एक वारस, कुलदीपक, असे खूप त्याला वाटत होते पण पोरगा तसा नाही ना ? रामभाऊ त्याला म्हणाला, “बापाची चप्पल पोराच्या पायात बसाय लागल्याव त्यो मैतर हुतो.. म्हणत्यात.. लगीन झाल्याधरनं दोगं ऱ्हात हुता, खात हुता.. कवा हिकडली काडी तिकडं केली न्हाईस.. तरीबी काय बोललो न्हाय.. पर तुज्या करतुकीनं रान गहाण ठेवाय लागलं... तुमास्नी फुकटचं खाया मिळायचं न्हाय.. काम-धंदा कर आन आदि रान सोडीव मगच घरात याचं..' तेंव्हापासून पोरगा आणि सून नाहीत इथं."

रामरावच्या हसण्यामागे दडलेली वेदना मला समजली होती. संध्याकाळी त्याच्याशी बोलायचे असे मी मनोमन ठरवले होते पण रामरावची सासू आजारी पडल्याचा सांगावा आला आणि बायकोला घेऊन तो सासुरवाडीला गेला. माझी सुट्टी संपून परतायचा दिवस उजाडला तरी रामराव परत आला नव्हता.

मी परतलो आणि कोरोनाची साथ आली त्यामुळे दोन वर्षे गावाकडे जाणं झाले नाही. भावाशी फोनवर बोलणे व्हायचे पण त्यात कधी रामरावचा विषय निघाला नाही. कोरोनाची साथ ओसरली. सारे व्यवहार सुरळीत झाले तेंव्हा मी आठ दिवस गावाकडे जायचे ठरवून रजा काढून एसटीत बसलो आणि मला रामरावची आठवण झाली.

इस्लामपूरला उतरून पुतण्यासाठी काहीतरी घ्यावं आणि मगच पुढे गावी जावं, असं बसमध्ये बसताना ठरवलं होतंच. स्टँडवर उतरून चालतच गांधी चौकाकडे निघालो तर जैन बस्ती जवळ रामराव दिसला. त्याला हाळी दिली. तसा तो थांबला. मला पाहून त्याला खूपच आनंद झाला होता.

"बरं झालं भेटलास. चल, गांधी चौकात पोरांसाठी काहीतरी घेऊया आणि मग सोबतच गावी जाऊया.. पण त्याआधी चल चहा घेऊया एखादया हॉटेलात." मी त्याला म्हणालो तसा तो कसंनुसं हसला.

" आरं, हाटीलात कशापायी घ्याचा च्या ? घरला जाऊनच घेऊया की..."

" घरला ? गावाकडे गेल्यावर आधी तुझ्याच घरी जाऊन चहा घेऊया.. पण आत्ता इथं घेऊया.. चल."

" गावाकडं न्हाय, हितं ऱ्हातो मी. हितंच घरला जाऊन च्या घेऊया."

" का ऽ य ? हितं राहतोस ?"

मला धक्काच बसला. रामरावाचे गावावर, घरावर एवढं प्रेम की कुठेही गेले की मुक्कामाला घरी येण्यासाठी धडपडायचा. त्याला बाहेर कुठंच करमायचं नाही. काही कारणामुळे चार दिवस कुठं पाहुण्यांकडे जायचं म्हंटलं की त्याचा जीव खाली-वर व्हायचा.. आणि तो गाव सोडून इस्लामपूरला राहतोय ? मी धक्क्यातून सावरायच्या आधीच त्याने माझा हात धरून घरी नेले होते.

रामराव एका निवासी संकुलामध्ये चोवीस तास सुरक्षारक्षक म्हणून काम करत होता. संकुल आवारातच सुरक्षा रक्षकाला राहण्यासाठी दोन खोल्यांची सोय होती. तिथे तो आणि वहिनी रहात होते. मुलगा गावाकडे परत आल्यावर रामरावने लगेच गाव, घर सोडले आणि तो इथं कामाला लागला होता. त्याने गावाकडचे घर,

रान सगळं मुलाच्या ताब्यात देऊनही टाकले होते. रामरावच्या बाबतीत मला धक्क्यावर धक्के बसत होते. घरी येताच त्याने बायकोला चहा बरोबरच काहीतरी खायला करायला सांगितले.

" लय दिसानं आलास रं गावाकडं ?"

मला त्याच्याबद्दल काहीच ठाऊक नाही हे ध्यानात येताच मी दरम्यान गावी आलोच नाही हे ओळखून तो म्हणाला.

" होय. कोरोनाच्या साथीमुळे येणे शक्यच झाले नाही.. "

" व्हय त्ये बी खरंच हाय.. कवा काय हुईल आन काय न्हाय.. सांगता याचं न्हाय. "

बोलता बोलता तो स्वतःशीच हसल्यासारखा हसला. खरे तर दिलखुलास रामराव कधीकाळी असा हसेल असे पूर्वी कोणी सांगितले असते तर ते कुणालाच पटले नसते. दोस्तांची मैफल जमवावी, खुलवावी तर ती रामरावाने. स्वतःच्या पोतडीतून असे एकेक किस्से काढायचा की ज्याचे नाव ते.. आणि अगदी साधी घटनाही खूप रंगवून सांगायचा की तो आहे म्हणल्यावर जाणारा येणाराही वेळेचे, कामाचे भान विसरून थांबायचा आणि भानावर आल्यावर हसतच निघून जायचा. त्याने सांगितलेले किस्से नंतर जसेच्या तसे आठवायचे आणि ते आठवताच वेळी-अवेळी हसू यायचे.

" तुला सांगतो, तुझी ही वहिनी हाय का न्हाय.. आरं, तिनं मला नापास केलवतं.. "

रामरावाने सांगायला सुरवात केली.

"आस्सं? पण मग ते आम्हाला कसे ठाऊक नाही ? आणि इतक्या वर्षात तू कधीच बोलला नाहीस त्ये."

माझ्याही नकळत मी बोलून गेलो. माझ्या तेवढया वाक्क्याने गडी पूर्वीसारखाच खुलला. ते पाहून मला बरे वाटले.

"तुमा दोस्तांस्नीच न्हाय तर कुणालाबी ठावं न्हाय.. बस, मला आन तिला दोघास्नीच ठावं हाय. पयल्याझूट बगाय गेलो तवा तुमी समदी हुतासाच की.. "

मला आठवलं, रामरावच्या मामाने त्याला  जेवायला म्हणून बोलावले होते. तेंव्हा आम्ही सगळेजण भाड्याच्या तीन सायकली घेऊन डबलसीट गेलो होतो. तिथे जातोय तर काय, मामाने त्याच्यासाठी स्थळ पाहिले होते. मुलगी तशी दुरून पाहुण्यातीलच होती. मामा म्हणाला म्हणून आम्ही सगळेच मुलगी बघायला गेलो होतो.

"आपुन बगून आलो आन दोन दिसांनी सांगावा आला, 'पोरीला म्होरं शिकायचं हाय.. '  पोरगा पास न्हाय कसं म्हणायचं? मग काय आसलं कायबी सांगून कटीवत्यात हे मला ठावं हुतंच.. "

रामराव, कदाचित त्या वेळचे सारे काही आठवल्यामुळे असेल, दिलखुलास हसला होता.

"मग रे? "

"मग काय... गेलो चार रोज मामाकडे ऱ्हाया. ही आडाव पाणी न्ह्याला  याची. त्याच वक्ताला घागर घेऊन गेलो की आडाव.. मला बगून तर ती येरबाडलीच की, मंग मीच म्हणालो, 'आशी गांगरून जाऊ नगंस.. पाणी न्हाय घरात म्हणून आलोय, तू मला 'न्हाय' म्हंलीस त्ये इसरून जा.. मला मातूर तू लैच आवडलीस.. पर जाऊंदेल.. ' येवडंच बोलून घागर घेऊन माघारी आलो. दुसऱ्या दिशी पुन्यांदा आडाव गेलो. तवा कंचाच इशय काडला न्हाय.. दोन-चार किस्सं हाणलं.. लै म्हंजी लैच हासली. माघारी याच्या आदल्या दिशी आडाव तिला म्हणलं, ' ह्ये बग, मला तुज्यासंगं लगीन करायचं हाय पर तुला माज्यासंगं करायचं न्हाय.. मला लै वाटतंय का तू दिसावीस, तुज्यासंगती बोलावं.. तवा मी आसं करतो, तुज्या भणीसंगं लगीन करतो.. म्हंजी माझ्या आन तुझ्या, दोगांच्याबी मनाजोगतं हुईल.. तवा, बायकू हुन याचे का म्हेवणी हून ऱ्हायाचं त्ये तूच ठरीव.."

बोलता बोलता रामराव थांबला. वहिनी आतून पोह्यांच्या डिश घेऊन आल्या होत्या.. त्या आम्ही घेताच त्या आत गेल्या.. मला 'पुढं काय झाले' ते ऐकायची उत्सुकता लागून राहिली होती. " पुढे काय झाले ?"

रामराव हसत म्हणाला, ”आरं, तिनंच फवं आणून दिल्याती आन आसं ईचारतुस व्हय ? बरं ऐक, तवा मला ती म्हणली, ' लय शानं हायसा, जावा घरला आन तयारीला लागा, मी आईला सांगत्ये, मी तयार हाय म्हणून.. ' आन म्होरलं समदं तुला ठावं हाईच की.. आरं बायका कवा सवंनं 'व्हय 'म्हणत्यात व्हय ?”हसत रामराव म्हणाला. हसता हसता त्याच्या डोळ्यांत पाणी आले.. स्वर काहीसा गंभीर झाला.”शाळंत गुरुजींनी चार आश्रम सांगितले हुतं, ध्येनात हायती का ?”

“हो, ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्याशाश्रम”

"ह्यो गृहस्थप्रस्थाश्रम हाय. पोरं मोठ्ठी झाली का समदं त्येच्या हातात द्याचं आन गाव सोडून कुठंतरी पोटापुरतं मिळवत जीव जास्तवर जगायचं.. कलियुग हाय बाबा ह्ये. बापाची चप्पल पोराच्या पायाला याला लागली तर त्यो मैतर होत न्हाय, तर  बापाचा बाप बनत असतो... बापाचा बाप !

मी रामरावच्या पाठीवर हात ठेवला, त्याच्या डोळ्यांतून अश्रु ओघळलेले मी इतक्या वर्षात पहिल्यांदाच पहात होतो.

***टीप*** *- सवंनं- सरळपणे*

**श्री आनंदहरी -** इस्लामपूर जि. सांगली मो. - ८२७५१७८०९९

# लेख  - सहज फुलू द्यावे फूल



सौ मनीषा चिंतामणी आवेकर

***सहज फुलू द्यावे फूल, दरवळावा सुवास***

***अधिक काही मिळवण्याचा करु नये अट्टाहास...***

आदरणीय ज्येष्ठ, श्रेष्ठ कवयित्री कै. शांताबाई शेळके ह्यांच्या वरील ओळी वाचल्यावर, मनात आवर्तने सुरु झाली.

सर्वप्रथम मला आठवली नाट्यछटा- "चिंगी महिन्याची नाही झाली तोच !!- यामधे आई माझी चिंगी यंव करेल अन् त्यंव करेल अशा बढाया मारत असते. चिंगी केवढी अन् आईने बोलावे किती, ह्यातून सुंदर उपहासात्मक विनोद साधला आहे.

आता फरक एवढाच झालाय की, पूर्वी चिंगी निदान महिन्याची. . तरी झाल्यावर आई बोलत होती. आता तर मूल जन्माला येण्याआधीच, आईवडील मुलाचे / मुलीचे नाव ठरवून ठेवतात. मुलगी झाली तर ह्या शाळेत घालायचे अन् मुलगा झाला तर त्या शाळेत घालायचे. ही अगदी सत्यघटना आहे. सांगीवांगी किंवा काल्पनिक नाही. ऐकल्यावर मला वाटले, नशीब, त्या भावी अपत्याचे कॉलेज आणि साईड नाही ठरवून ठेवत आईवडील !!

आपल्या पूर्वजांच्या काही पद्धती खूप चांगल्या होत्या. ३ महिने झाल्याशिवाय, गरोदरपणाची बातमी कोणाला सांगायची नाही. पूर्वी तर बाळ झाल्यावरही ती. .न दिवसांनी सांगत. आता टेस्ट झाली, की दणादणा फोन सुरु !! आनंद इतका अमाप की सासूबाईंना सांगावे लागते की" जरा जपून चालं गं पोरी !!" मूल जन्मल्यावर बघायला येणा-यांची, फोटो काढणा-यांची इतकी घाई की, पाच मिनिटात आईबरोबर एक, बाबांबरोबर एक, आईबाबांबरोबर एक असे तीन तीन फोटो देशपरदेशात रवाना होतात. बिचारी आई आणि सासू, नुसतं बघत राहण्यापलीकडे काहीच करु शकत नाहीत, कारण  "आई, आता मॉडर्न टेक्नॉलॉजी आहे. काही नाही होत, " असा रिबाउंड येणार, हे त्यांना माहित असते. तो मुलगा/ मुलगी कोणासारखा दिसतो, हे वर्तवणारे खूप असतात. अपत्याचा चेहरा पहिल्या दिवशी कोणासारखा आहे, हे कोणीच सांगू शकणार नाही. ५-६ महिन्यांनी तोंडवळा ओळखू येतो. पण हे सांगणार कोण आणि ऐकणार कोण? सगळी घाईच घाई.

प्रत्येक लहान मुलाचे बसणे, रांगणे, बोलणे वेगवेगळ्या वेळी असते. "तिचा मुलगा माझ्या मुलाहून लहान आहे, तरी तो बसायला लागला. माझा कसा नाही बसत ?" इति माझी भाची.... "अगं प्रत्येक मुलाची प्रगती वेगळी असते. बसेल तो. " सासूबाईंनी समजावून सांगितले. पण लक्षात कोण घेतो? भाचीने लगेच डॉक्टरकडे धाव घेतली. “मी त्याला बसायची प्रॅक्टीस देऊ का?" डॉक्टरांनी मंद स्मित केले. ते म्हणाले, "प्रत्येक मुलाची प्रगती वेगळी असते. मुलांमधे तुलना कधीच करु नका. आत्ताही आणि पुढेही. "  घरी आल्यावर सासूबाईंना सांगताना स्वर नरमाईचा आला. त्या मनात म्हणाल्या, "मी तेच सांगितलं होतं ना?"

लहान मुलांचे बोरन्हाण, जावळ, उष्टावण, वाढदिवस हे सगळे आनंददायी कार्यक्रम. पण ह्यात फोटो आणि व्हिडीओचे इतके प्रस्थ झाले आहे की, त्या ओझ्याने मूल रडायला लागले, तरी ह्यांचे फोटो चालूच. एका कार्यक्रमात  आजीने त्या मुलाला कडेवर घेऊन शांत केले, तेव्हा बाळ झोपले. अशावेळी आईवडीलांनी फोटो, व्हिडीओ काढावेत, पण प्रमाणात आणि मूल हसतखेळत असेपर्यंतच.

हल्ली आईला रात्रीच व्हाट्सअप बघायला मिळते. मुलाला गाणी ऐकत ऐकत झोपायची सवय लावल्याने, ते बिचारे पेंगुळत झोपते. तेच आईच्या मांडीवर, प्रेमळ स्पर्शाचे सुख घेत, नीज माझ्या नंदलाला हे गाणे ऐकणे परम सुखदायी आहे.


कित्येक लहान मुले उशीरा बोलतात. तुम्ही मुलांशी जेवढे बोलाल, तेवढे ते लवकर बोलतात. पण आजकाल नोकरी करणा-या आईला लहान मुलाशी बोलायला वेळ कमी मिळतो. मग कोणी कोणता रस द्या, ही औषधे द्या, असे सुचवतात. माझा मोठा मुलगा उशीरा बोलायला लागला. आमच्या वाड्यात डॉ. माई होत्या. त्यांनी आईला सांगितले,

"तो जर दा, बा, मा असे उच्चार करत असेल तर, कोणीही काहीही सांगितले तरी, त्याला कोणतीही औषधे देऊ नकोस. " नंतर तो इतका स्पष्ट आणि छान बोलायला लागला की अनेक वक्तृत्व स्पर्धांमधे त्याला बक्षिसे मिळाली.

नंतर महत्वाचा टप्पा येतो शाळेचा. आता इंग्लिश मिडीयमचे प्रस्थ खूपच माजले आहे. माझा भाषेला विरोध नाही पण मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने आकलन चांगले होते. पुस्तके वाचायला हुरुप येतो. नाहीतर शाळेत सांगितल्याप्रमाणे घरीही इंग्रजी बोलले जाते. आजी, आजोबा आल्यावर त्यांच्याशी ही मुले इंग्रजाळलेले मराठी बोलतात. तो तसे तोडकेमोडके मराठी बोलला तरी आईबाबांना कोण कौतुक वाटते !! आजीआजोबा आपले

"कालाय तस्मै नमः" म्हणून गप्प बसतात.

शाळेत गेल्यावर ज्युनिअर आणि सिनिअर K, G, होते न होते तोच सुट्टीतली शिबिरे, क्लास सुरु होतात. कोण काय शिकतं, कोण कुठल्या क्लासला जातं याची चाचपणी सुरु होते. मुलाला आवड चित्रकलेची. आपली अपूर्ण स्वप्ने मुलांकडून पूर्ण करुन घेण्याची आई बाबांना कोण घाई झालेली असते. आईचे व्हायोलिन, बाबांचा सिंथेसायझर तसेच धूळ खात पडलेले असतात. मग ते स्वच्छ केले जाऊन, मुलाला वाजवून दाखवतात. खरंतर काहीतरी मंजुळ नाद येतोय म्हणून मुलाचे डोळे लकाकतात. पण आई लगेच संगीत शिक्षकांकडे घेऊन जाऊन, कौतुक करायला सुरुवात करते. मुरलेले संगीत शिक्षक सर्व काही जाणतात. "काय रे तुला शिकायचंय का वाजवायला?" असे प्रेमाने विचारतात. मुलगा म्हणतो "मला नाही वाजवायचं. मला चित्र काढायला आवडतं. " संगीत शिक्षक“ त्याच्या कलाने शिकवा. अजून त्याची आवड ठरायची आहे. तो खूप लहान आहे. तुम्ही घरी वाजवा म्हणजे कानावर पडल्यावर, पुढे कदाचित वाटेल. ही शिकावेसे. " असे म्हणून त्यांची बोळवण करतात.



नंतर थोडे दिवस चित्रकलेचा क्लास सुरु असतो. निदान दोन परीक्षा देईपर्यंत तरी त्याला जाऊ द्यावे ना !! पण आईबाबांना ७ वी -८ वीत गेल्यावर मुलगा मार्काच्या रेसमधेही पुढे गेला पाहिजे असे वाटते. पुन्हा कोण कुठल्या क्लासला जाते, याची चाचपणी सुरु होते. मुलाची चित्रकलेची एक परीक्षा झालेली असते. त्याला दुस-या परीक्षेचे वेध लागलेले असतात. चित्रकला शिक्षकही कळकळीने सांगत असतात" त्याची एवढी परीक्षा होऊ दे. त्याला चित्रकलेत पुढे शिक्षण घ्यायचे असेल, तर दोन परीक्षा द्याव्या लागतात. " पण आईबाबांना इतर मुलांपेक्षा आपल्या मुलाला कमी मार्क्स मिळालेले सहन होत नाही. त्याला चित्रकलेच्या क्लासमधून काढून, सायन्स, गणिताच्या क्लासला टाकले(?)जाते. त्याच्या आवडीची कोणाला पर्वाच नसते. आजीने शाळेतून आल्यावर गरम खाऊ खाताना मुलगा आजीला आपले मनोगत सांगतो. आजी मनाचा धीर करुन बोललीच तर, " तुम्ही तुमची मुले तुमच्या पद्धतीने वाढवलीत ना!! आता आम्हांला आमची मुले आमच्या पद्धतीने वाढवू देत. " इतके सणसणीत उत्तर मिळाल्यावर आजीची वाचाच बंद होते.

"मुलांची एकमेकांशी कधीही तुलना करु नका. " हा डॉक्टरांचा सल्ला पालक पूर्णपणे विसरतात. "अरे, त्याला बघ किती छान मार्क्स पडले. तू पण जरा अभ्यास करुन, तसेच मार्क्स मिळव !!" आता मुलगाही टीन एजर असतो. तो लगेच प्रत्युत्तर देतो, " बाबा त्याला घरी झेलणारे किती आहेत ते बघा ना !! आजी, आई, आजोबा सगळे झुलत असतात. " मुलाने केलेल्या तुलनेने बाबा निरुत्तर होतात.

आता वयात येणे चालू होते. आई बाबांनी जास्त काळजी घेऊ नये. आपले निर्णय स्वतंत्रपणे आपल्याला घेऊ द्यावेत. काहीशी बेपर्वाई, बेफिकीर वृत्ती येते. " त्याला काय झालं?" अशी प्रतिक्रिया दिली जाते.

साकल्याने विचार करता, मुलांना वाढवणे आणि तेही आत्ता सध्याच्या काळात, अत्यंत अवघड आहे. आपल्यावेळी दूरदर्शन फक्त एकाच चॅनलचे, सह्याद्री वाहिनीचे होते, आणि त्यातील कार्यक्रम दर्जेदार आणि कुटुंबाला एकत्र बघून बसण्यासारखे होते. आता वाहिन्यांचे जाळे १५०च्या पुढे गेले आहे आणि त्यात सतत वाढच होत आहे. प्रत्येकाची आवड - निवड वेगळी. आणि पूर्वी मोबाईल नव्हते. आता मुलांवर लक्ष ठेवणेही अवघड जात आहे. त्यामुळे आजच्या युगातील मुले आणि पालक वेगळ्याच मानसिकतेतून जात आहेत.

वरील ओळ वाचल्यावर असे वाटते की, चंद्र किंवा कला जशी कलेकलेने वाढते, तसेच पालकांनी फार अट्टाहास न करता, मुलांचा विश्वास संपादून, त्यांना कलागुणांना प्रोत्साहन देत प्रेमाने वाढवावे. मग त्यांच्यातील गुण उमलून येतील आणि यशपरिमळ दशदिशांत दरवळेल. त्यासाठी पालकांना संयम, तडजोड स्वीकारावी लागेल. मुलांनीही मोठ्या लोकांच्या आज्ञा पालन करुन, स्वविकास साधणे गरजेचे आहे.

**सौ मनीषा चिंतामणी आवेकर** - सर्व्हे नं ९, सनसिटी रोड, सोहम रिव्हेरिया सोसायटी, फ्लॅट नं B-602,, वडगाव बुद्रुक, पुणे - 411051, फोन - 9763706200 ईमेल आयडी mcawekar@gmail. com



# कथा - अखेर सत्य स्विकारलं

श्रीमती अनिता जयंत खाडीलकर

त्या दिवशी अचानक सुरेशरावांनी प्रकाशरावांना फोन लावला. ते म्हणाले–

'प्रकाशराव तुम्हाला आज दुपारी वेळ आहे का?सुवर्णाच्या संदर्भात थोड बोलायच होतं. तुम्ही दोघेजण ४वाजता चहाला आलात तर बरं होईल. '

प्रकाशराव म्हणाले- "मी घरात बोलतो व तुम्हाला सांगतो. एवढं काय बोलायच होतं? सर्वजण ठिक आहात ना?"

सुरेशराव म्हणाले-"हो ठिक आहोत. पण एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. आमचीही तयारी गडबड सुरू आहेच. " एवढं बोलून त्यानी फोन ठेवला.

फोन झाल्यावर प्रकाशरावांच्या मनात चलबिचल सुरू झाली. त्यांनी वर्षाला हाक मारली 'अग वर्षा आज दुपारी ४वाजता आपण दोघांनी सुरेशरावांकडे जायचं आहे. त्यांनी काही महत्त्वाची गोष्ट सांगण्यासाठी बोलावले आहे आपल्याला. मला प्रश्न पडलाय की एवढं काय महत्वाचं बोलायच असेल? तू तयार रहा. आपण जाऊया. काय म्हणतात ते पाहुया. ' वर्षाताई त्यांना म्हणाल्या, 'बरं जाऊया' आणि त्या त्यांच्या कामाला गेल्या.

ठरल्याप्रमाणे प्रकाशराव, वर्षाताई  सुरेशरावांना फोन करून त्याच्याकडे  निघाले. ते थोडे अस्वस्थच होते. लग्न तर छान खेळीमेळीत जमलंय. हुंडा, मानपानाचा तर काहीच प्रश्न नव्हता. सगळंच छान ठरलं होतं आणि आता अचानक काय झालं? त्यांना कोडेच पडले. त्याच्या माहितीप्रमाणे सुवर्णा चांगली मुलगी होती. गेली दोन, तीन वर्षं दोन्ही कुटुंब एकमेकांना चांगली ओळखत होती. सुवर्णा व रोहन एकमेकांना पसंत होते. दोघांची भेट एकाच कंपनीत व एकाच विभागात काम करत असल्याने झाली होती. सुवर्णा गृहकृत्यदक्ष होती. त्यांच्या आवडीनिवडीही जुळत होत्या.

प्रकाशराव, वर्षाताई सुरशेरावांकडे आले. ते त्यांची वाट पाहत होते. आल्यावर त्यांनी दोघांचं हसून स्वागत केलं आणि म्हणाले, "या! बरं झालं दोघेही आलात ते!"

ते आलेले पाहून रोहिणीने  टिव्ही बंद केला आणि त्या पाणी आणायला आत गेल्या. सुरेशरावानी त्यांना बसण्याची खूण केली. "काय घेणार?"

प्रकाशरावांनी शांततेचा भंग करत विचारलं-'मुद्द्याचं बोला. सुवर्णाबद्दल एवढं काय बोलायच होत?"

सुरेशराव म्हणाले-"आम्ही तर हा विषय 23 वर्षापुर्वीच बंद केला होता. पण आज माझी आई साखरपुड्याला गावाहून आली. तिनेच आग्रह धरला म्हणून तुम्हाला बोलावलं."

'सुरेश प्रस्तावना जास्त नको. मीच सांगू का? प्रत्येक गोष्ट स्पष्ट असु दे." त्यांच्या आई म्हणाल्या.

"आई, मी सांगतो. सुवर्णा ही आमचीच मुलगी आहे हे खरं. पण आम्ही तिला दत्तक घेतलं. आपलसं केलं. शिकवून सावरून मोठं केलं आणि आता तिची पाठवणी करत आहोत."

"म्हणजे काय मी समजलो नाही. नीट खुलासा करा."

मग सुरेशराव म्हणाले -"रोहिणीला लग्न झाल्यावर ७\८ वर्षे मूल होत नव्हतं म्हणून आम्ही सुवर्णाला दत्तक घेतलं आणि नंतर दोन वर्षांनी आमचा सुजित झाला. आमच्या फार थोड्याच नातेवाईकांना व मित्रांना ही गोष्ट माहिती आहे. नंतर तुम्हाला बाहेरून कळलं असं व्हायला नको म्हणून हा खुलासा! सुवर्णाला जरी आम्ही दत्तक घेतलं असलं तरी ती अनैतिक संबंधातून झालेली मुलगी नाही. ती आमच्या मित्राची मुलगी आहे. ते दोघेजण एका अपघातात दगावले. तेव्हा हे आम्हाला कळल्यावर आमचा शोध सुरू झाला आणि ती आम्हाला एका अनाथाश्रमात मिळाली. अपघात झाल्यानंतर पोलीसांनी तिला अनाथाश्रमात दाखल केली हे आम्हाला चौकशीत समजलं. अनाथाश्रमवाले ही खर तर माहिती  देत नाहीत. पण ही बातमी पेपरात वाचून मग आम्ही तिचा शोध घेतला आणि आम्हाला ती मिळाल्यावर आम्ही तिला दिड वर्षाची असतानाच दत्तक घेतली. पुढचा सर्व इतिहास तुम्हाला सांगितला आहेच. आता सुवर्णा पूर्णपणे आमचीच आहे. हे गुपित आम्ही मुलांनाही चार दिवसांपूर्वीच सांगितल आणि आता त्यांनीही ते स्विकारलय. " एवढं बोलून ते बोलायचं थांबले.

हे सर्व ऐकल्यावर प्रकाशराव, वर्षाताई दोघेही स्तंभित झाले. प्रकाशराव म्हणाले-घाबरू नका आपले संबंध तुटणार नाहीत. पण मला थोडा वेळ द्या. मी रोहनशी बोलून मग सांगेन. काय ग वर्षा ठिक आहे ना? चला भेटूच परत."

घरी आल्यावर प्रकाशराव, वर्षाताई दोघांनी मिळून ही गोष्ट रोहनला सांगितली पण रोहनला सुवर्णा खूप आवडली असल्यामुळे लगेच त्याने विचारलं, ‘तिचे आई वडील अचानक अपघातात दगावले म्हणून तिला दत्तक घेतलं, ह्यात तिचा काय दोष? आतापर्यंत तर ती चांगल्याच संस्कारात वाढलीय ना? मग प्रश्नच नाही. तिचा आपण स्विकार करायला माझी हरकत नाही. " हे सर्व ऐकल्यावर प्रकाशराव, वर्षाताई आनंदित झाले. आणि त्यांनी सुरेशरावांना फोन करून आपली संमती कळवली..

मग रोहनने सुवर्णाला फोन करून भेट ठरवली.

त्या दिवशी रविवार होता. दोघांनाही सुट्टी होती. त्यांनी दुपारी ४. ३०ला भेटण्याचे ठरवले होते. सुवर्णा रोहन च्या आवडीचा आकाशी रंगाचा पंजाबी ड्रेस घालून निघाली. रोहन व सुवर्णा त्यांनी ठरवल्या कॉफी हाउस मध्ये भेटले.

रोहनने सुवर्णाजवळ तिची जन्मकथा समजल्यावरही तो तिच्याशी लग्न करणार असल्याचे स्पष्ट सांगितले. दोघांनी एकमेकांना पसंती दिली आणि मग सर्वांच्याच आनंदाला उधाण आलं. साखरपुड्याची तारीख ठरली. सोनाराकडे जाऊन  अंगठ्यांची खरेदी झाली. कपडे व साड्यांची खरेदी झाली. साखरपुड्याला कार्यालय व मेनू ठरला. नातेवाईक व मित्रमैत्रिणींना आमंत्रण देण्यात आली आणि मग मोठ्या थाटामाटात रोहन व सुवर्णाचा साखरपुडा झाला. आता दोन्ही कुटुंबात कोणताच आडपडदा राहीला नव्हता. आभाळ स्वच्छ झालं होतं. सुरेशरावांना आता शांत, निवांत वाटत होतं. किती तरी दिवस मनात होत असलेली प्रचंड खळबळ आता ओसरली होती.

**श्रीमती अनिता जयंत खाडीलकर** - सहयाद्री अपार्टमेंट, खाडीलकर गल्ली, बालगंधर्व नाट्यमंदिर समोर, ब्राह्मणपुरी, मिरज,जि. सांगली मो 9689896341



## कथा - आणि गौरी कथालेखिका बनली.

सौ. उज्ज्वला केळकर

आज सकाळी सकाळी अजयचा फोन आला. फोन सहजच. नेहमीसारखा ख्याली-खुशाली विचारणारा. पण त्यानंतर का कुणास ठाऊक, गौरीच्या मनात जुन्या जुन्या आठवणी भरभरून ओसंडू लागल्या. जुन्या म्हणजे किती जुन्या? ४५-४६ वर्षांपूर्वीच्या. अगदी अजयच्या जन्माच्या वेळच्या .

गौरीला लग्न होऊन दहा वर्षे झाली पण तिला मूल-बाळ झाले नाही. पहिली पाच वर्षे वाट बघण्यात गेली. मग वैद्यकीय उपचार, सासूबाईंच्या दृष्टीकोनातून उपास-तापास, नवस-सायास झाले. कशाचाच उपयोग झाला नाही. डॉक्टरांच्या दृष्टीने कुणात कुठेच कमतरता नव्हती पण मूल झालं नाही हे खरं. तिच्या मनात येत राहिलं, 'मूल होणं आपल्या हातात नाही. पण एखादं मूल वाढवणं, मोठं करणं, त्याच्या बाललीलांचा आनंद घेणं, त्याच्यावर मायेचा, वात्सल्याचा वर्षाव करणं हे तर आपल्या हातात आहे. ' तेव्हा आपण अनाथाश्रमातील एक मूल दत्तक घेऊ या. मुलगा- मुलगी कोणीही. अर्थात् इतका मोठा निर्णय घ्यायचा, म्हणजे घरच्यांच्या पाठीबा असणं आवश्यक आहे. निदानचं सासूबाई, जाऊबाई, दीर, नणंदा या सगळ्या अगदी जवळच्यांनी तरी मान्यता द्यायला हवी, तरच घरात येणाऱ्या बाळाचं सगळं व्यवस्थित होऊ शकेल. मुख्य म्हणजे बाळाच्या मानसिक वाढीच्या दृष्टीने ते आवश्यक होतं. मग सगळ्यांना तिचे विचार भावना पटवून देण्यात तीन-चार वर्षे गेली. मग नाईलाजाने का होईना, घरचे सगळे या गोष्टीला तयार झाले. मग तिने काही अनाथाश्रमांची चौकशी केली. तीन-चार ठिकाणी फॉर्मस् भरून दिले. वर्षाच्या आतलं मूल दत्तक घ्यायचं ठरवलं. तिला मुलगा-मुलगी कुणीही चालणार होतं, पण मुलगाच घ्यावा, असा गौरवचा आग्रह होता. एका ठिकाणी त्यांना मुलाखतीलाही बोलावलं होतं. तिथे जाऊन गौरी-गौरव आपल्या अपेक्षा सांगून आले आणि... अहो आश्चर्यम्... दैवी चमत्कार म्हणा, नियतीचा खेळ म्हणा, एक दिवस गौरीला कळलं, तिला दिवस गेले आहेत. आता मूल दत्तक घेण्याचा प्रश्न आपोआपच निकालात निघाला.

जानेवारीत मधे काही समस्या निर्माण झाल्यामुळे गौरीला हॉस्पिटलमधे बेड रेस्ट घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. त्याप्रमाणे ती डॉ. श्रीदेवी पाटील यांच्या मॅटर्निटी होममधे अॅडमिट झाली. आता तिथे तिला काही काम करायचं नव्हतं पण काहीही होत नसल्यामुळे दुखण्याकडे लक्ष जावं अशीही परिस्थिती नव्हती. तिने डॉक्टरांना एकदा विचारलंसुद्धा 'मला काहीच होत नाहीये, मग मला इथे कशाला ठेवून घेतलय?' त्यावर त्यांचं उत्तर असं की तुला काही होतय म्हणून नव्हे, काही होऊ नये म्हणून ठेवून घेतलय. ' योग्य वेळेपूर्वी पोटात कळा येणं, बाळंतपण वगैरे.... असा त्यांचा बोलण्याचा रोख होता.

गौरीच्या डोक्यात कामाचे विचार नव्हते खरे, पण तिचा मेंदू काही पूर्ण निद्रिस्त नव्हता. काही ना काही विचार मनात येतच होते. 'एम्टी माईंड इज द हाऊस ऑफ डेव्हील' म्हणतात. तिचं मन 'हाऊस ऑफ डेव्हील' झालं नव्हतं पण ते 'हाऊस ऑफ स्टोरीज' मात्र झालं होतं कारण तिथे अनेक पेशंट येत होते. त्यांचे प्रत्येकाचे अनुभव वेगळे. त्यात तिला कथाबीजे दिसत होती. तोपर्यंत तिने कधी कथा लिहीलेल्या नव्हत्या. तसं पांढऱ्यावे काळं करत, ती कविता, लेख वगैरे लिहायची. आता इथे अनेकांचे अनुभव ऐकताना, घटना प्रसंग पाहताना, तिला आसासून कथाच लिहाव्यासं वाटू लागलं.

एक दिवस तिच्या अचानकच मनात आलं, 'आपण एकीकडे दत्तक घ्यायचं ठरवलं आणि इकडे आपल्याला दिवस गेले. समजा आपण दत्तक घेतलं असतं आणि नंतर एक दोन वर्षांनी आपल्याला मूल झालं असतं तर? तर त्यानंतर भोवतालची मंडळी कशी वागली असती त्याच्याशी? मला दुसरा मुलगा झाला, असं मी म्हंटलं असतं. पण बाकीच्यांनाही तसंच वाटलं असतं का? मागे जेव्हा मी मुलाखतीसाठी एका संस्थेत गेले होते, त्यावेळे मला नेमका हाच प्रश्न विचारला गेला होता, की दत्तक घेतल्यानंतर तुम्हाला स्वत:चं मूल झालं तर?' तेव्हा मी उत्तर दिलं होतं की मी मला दुसरा मुलगा झाला आहे, असं समजेन. एव्हाना माझ्या बरोबरीच्यांना दोन दोन मुले आहेतच की! पण घरा-दारातल्या इतरांचं काय? स्वत:च्या वंशाचा दिवा तेवू लागल्यावर त्यांनाही माझ्यासारखंच वाटलं असतं का? त्यांचं वागणं आधीसारखं राहिलं असत का? की काही बदल झाला असता? शेजारी-पाजारी, नातेवाईक, ओळखी-पाळखीचे या साऱ्यांचा बघण्याचा दृष्टीकोन कसा झाला असता? विचार... विचार... आणि विचार... या विचारातून मग एका कथेच आराखडा माझ्या डोक्यात फिक्स झाला. कथेचं नावसुद्धा फिक्स झालं. 'परक्याचा पोर. ' इकडे गौरीच्या मुलाचा जन्म झाला आणि त्याच वेळी तिच्या कथेचाही जन्म झाला. 'परक्याचा पोर. '

तिच्या कथेची सुरुवात तिने अशी केली, पिंटूने ( जयंत - शुभाचा दत्तक मुलगा ) बोर्डिंग स्कूलमधून आईला लिहिलेले पत्र शुभा वाचते आहे. शुभा, गौरीच्या कथेची नायिका. पत्र वाचता वाचता तिला गहिवरून येतं. अनेक चांगल्या बातम्या लिहिता लिहिता त्याने लिहिलेलं असतं, 'आई रात्री तुझी खूप आठवण येते. ' शुभा कासावीस होते.

कथेचा शेवट करताना, शुभा पिंटूला बोर्डिंग स्कूलमध्ये ठेवायचा निर्णय का घेते, हे गौरीनं संगीतलय. शेवटी ती त्याला बोर्डिंग स्कूलमध्ये पोचवायला निघते, तेव्हा शेजारच्या शांताकाकू, सुशीलाबाईंना संगत होत्या, 'अहो, किती झालं, तरी परक्याचा पोर! त्याला का आपल्या मुलाची माया फुटणार आहे? आपला मुलगा झाल्यावर निघाल्याच ना त्याला बोर्डिंगमधे ठेवायला... '

फ्लॅश बॅक पद्धतीने गौरीने या कथेचा विकास केलाय.

शुभा आणि शरद यांचा सुखाचा संसार आहे. उणीव एकाच गोष्टीची आहे, ती म्हणजे, लग्नाला सात वर्षे होऊन गेलीत, पण तिला अजून मूल झालेले नाही. तिला तर लहान मुलाची अतिशय आवड. शेवटी ती अनाथाश्रमातून लहान मूल दत्तक घ्यायचं ठरवते. घरातल्या इतर नातेवाईकांना ते पटत नाही. विरोधाचा सूर उमटतो. ते अपेक्षितच होतं. अजून कुठे वय झालय तुझं? अजूनही होईल. त्यांचं म्हणणं. शरदलाही तसंच वाटतं. ती म्हणते ' पण नाहीच झालं तर?... आणखी वाट बघत बसलो, तर उशीर होईल. घेतलेल्या बाळाचं सगळं व्यवस्थित नको का व्हायला ? आपल्या अंगात बळ आहे, तोवर तो स्वत:च्या पायावर उभा राहिला पाहिजे. '

घेतलं जाणारं मूल अनाथाश्रमातलं. ती बहुतेक सगळी अनैतिक संबंधातून झालेली., म्हणून सासुबाईंचा विरोध असतो. त्यावर शुभा म्हणते, 'त्यात मुलांचा काय दोष? जसे त्यांच्यावर संस्कार होतील, तशी ती वाढतील. वागतील आणि आपल्या घरात त्याच्यावर चांगलेच संस्कार होणार ना? ' जाऊबाई म्हणातात, 'आज-काल

स्वत:ची मुले आई-बापांना सांभाळायची मारामार. हे तर 'परक्याचा पोर. ' त्यावर शुभा म्हणते, 'आम्ही मूल दत्तक घेणार, ते आमच्या हौसेसाठी. त्याने आम्हाला सांभाळावं, म्हणून नव्हे. '

'लोक काय म्हणतील, हा प्रश्न, इतरांना अस्वस्थ करतो, पण शुभा अविचल आहे. ती शरदला म्हणते, 'लोक काय म्हणतील, याची मला काळजी नाही. पण तू तरी मला मनापासून साथ देशील ना?'

'ते आत्ताच कसं सांगू? पण एवढं निश्चित की मी त्याला काही कमी पडू देणार नाही. '

शरदच्या एवढ्या आश्वासनानेही शुभा निश्चिंत होते.

मुलगा घ्यायचा की मुलगी यावरही दोघांचा थोडा वाद होतो पण शेवटी शरदच्या इच्छेप्रमाणे सगळी औपचारिकता पूर्ण होऊन, जयंत त्यांच्या घरी येतो. सगळे त्याला पिंटू म्हणतात. हळू हळू केवळ शरदच नव्हे, तर घरातले इतर सगळे नातेवाईकही त्याला स्वीकारतात.

**आणि एक दिवस** -

एक दिवस शुभाला काही वेगळं वाटू लागतं. ती शरदला म्हणते, ' पिंटू आता दादा होणार!'

'काय?' शरद एकदमा खूश होतो. 'माझं, माझ्या रक्ताचं, माझ्या वंशाचं मूल या घरात येणार!'

शुभा एकीकडे सुखावलीय, तर दुसरीकडे काहीशा अनिष्टाच्या शंकेने उदासलीयसुद्धा. 'अवेळी मिळालेला दैवाचा प्रसाद... ' तिच्या मनात येतं. आता निदान आपल्याला मुलगी तरी व्हावी, तिला वाटत राहतं. शरदला मात्र मुलगाच हवाय. त्याच्या रक्ताचा... त्याच्या वंशाचा... घराण्याचा कुलदीपक. दैवानेही शरदचीच साथ दिलीय शुभाला मुलगाच होतो. त्याचं नाव ठेवतात मिलींद.

मुलं मोठी होऊ लागतात. दोघांच्यात अवघं दोन वर्षाचं अंतर. घरातलं वातावरण मात्र कळत नकळत बदलू लगतं शरदच्या वागण्यातही हळू हळू आणि सूक्ष्मसा फरक पडत चाललाय. ते शुभाच्या लक्षात येतय आणि अधून मधून पिंटूच्याही.

पिंटू आता चौथीत आहे, तर छोटू दुसरीत. एक दिवस पिंटू, शेजारच्या शांताकाकूंच्या प्रकाशची तक्रार घेऊन घरी येतो. 'आई मी प्रकाशशी कट्टी केलीय. '

'का रे?'

'तो म्हणत होता, छोटू काही तुझा सख्खा भाऊ नाही. छोटूची आई काही तुझी खरी आई नाही.

'चल. खोटं बोतोय तो!'

'नाही ग आई! शप्पथ! शांताकाकूसुद्धा म्हणाल्या, 'छोटूची आई तुला नीट वागवते का म्हणून! नीट वागवते का, म्हणजे काय ग आई?' पिंटू भाबडेपणाने विचारात होता पण शुभाचं काळीज चर्र होतं. 'कशी थांबवायची ही बोलणी?'

एकदा पिंटू छोटूचं भांडण झालं. छोटूने पिंटूचा बॉल घेतला होता. तो म्हणाला 'बाबांनी माझ्यासाठी आणलाय. 'त्यावर छोटू म्हणाला, 'पण बाबा माझेच आहेत. तुझे नाहीत. मग बॉल भिरकवत म्हणाला, घे एकदाचा. गाढव.. मूर्ख... भिकारी कुठला.'

शुभाच्या मनात आलं, 'कुठे बोलायला शिकला हा असं. वेळेवारी ही कीड उपटून टाकली पाहिजे. पण कुणाकुणाची तोंडं धरणार आपण ?' तिला काळजी वाटू लागली.

एकदा शुभाने शरदला सरळ सरळ विचारलं, 'हल्ली असा का वागतोस तू पिंटूशी ?

'असा म्हणजे?'

'तू त्याच्याशी नीट बोलत नाहीस. खेळत नाहीस. माया करत नाहीस पाहिल्यासारखी. '

'पिंटू काय आता लहान आहे?'

'पण तुला वाटतो तेवढा मोठाही झालेला नाहीये तो. '

'मी त्याला काही कमी करतोय का?'

'प्रश्न कमी करण्याचा नाहीये. तुला त्याच्याबद्दल जिव्हाळा, आपलेपणा वाटत नाही. छोटूचे लाड करतोस, तसे याचे करत नाहीस. ' शरद विषय बदलतो.

एकदा पिंटू झोपेत बडबडतो, 'शांताकाकूंचंच खरं. आई खोटी. बाबा माझे नाहीत. ते मला रागावतात..... ' पिंटूचं बडबडणं ऐकून शुभाला आतून तुटल्या तुटल्यासारखं होतं. पिंटूच्या निरागस, भाबड्या मनावर असे सतत आघात होत गेले तर? त्याची मानसिक वाढ कशी चांगली होईल? त्याच्या कानावर सतत असलं बोलणं पडायला नको, म्हणून ती त्याला ५ वीत बोर्डींग स्कूलमधे ठेवण्याचा निर्णय घेते. ती चौकशी करते. फॉर्म भरते आणि मुंबईच्या एका बोर्डींग स्कूलमधे त्याचा नाव घालते. ती त्याला घेऊन पाचवायला निघालीय. त्याचं रडं बघून तिलाही निर्णय बादलावासा वाटतो. पण काळजावर दगड ठेवून ती त्याला पोचवायला निघते. ते पाहून शेजारच्या शांताबाई सुशीलाबाईंना म्हणतात, 'किती झालं तरी परक्याचं पोर.... स्वत:चं झाल्यावर याची अडचण झाली. निघाल्याच नं आता त्याला बोर्डींग स्कूलमधे ठेवायला. ' गौरीने कथेचा शेवट केला.

'हुश्श्यsss' झाली एकदाची कथा लिहून. गौरीने निश्वास टाकला. यथावकाश तिने ती कथा 'स्त्री' मासिकाकडे पाठवली. ती छापूनही आली. त्यानंतर वाचकांची कथा आवडल्याची अनेक खुषीपत्रे तिला आली. 'अच्छा! म्हणजे आपणही चांगली कथा लिहू शकतो तर... ' तिच्यात आत्मविश्वास आला. तिला मग कथा लिहिण्याचा नादच लागला आणि गौरी कथालेखिका झाली.

**सौ. उज्ज्वला केळकर** - 176/2 'गायत्री', प्लॉट नं 12, वसंत साखर कामगार भवन जवळ, सांगली 416416
मो. 9403310170

# पुस्तकावर बोलू काही - कलामांचं बालपण






श्री. गुरुनाथ चंद्रकांत ताम्हणकर

**लेखक - सृजनपाल सिंग.**

महान व्यक्ती अपघाताने निर्माण होत नाहीत. उत्तम शिक्षक, महान राष्ट्रपती, बुद्धिमान शास्त्रज्ञ, गुणवंत रॉकेट शास्त्रज्ञ, सर्वांच्या हृदयात स्थान मिळून राहिलेले डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम या महान विभूतीचे बालपण कसे होते, याविषयी या पुस्तकात सुंदर व माहितीपूर्ण वर्णन केलेले आहे. लहान मुलांसाठी प्रेरणादायक असे हे पुस्तक आहे.

**मध्यवर्ती कल्पना-** निधर्मी अशा रामेश्वरम गावात कलामांचा जन्म झाला. सर्वधर्मसमभावाचे बाळकडू त्यांना आपल्या जन्मगावीच मिळाले. त्यांचे शिक्षक शाळेत ज्या गोष्टी त्यांना सांगत, त्या गोष्टी स्वतः प्रयोग करुन पडताळण्याचा बालपणीपासूनच त्याना छंद होता. बोट बांधणीच्या साहित्याचे महत्त्व त्यांनी जाणले. आयुष्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात चांगल्या सवयी लावणाऱ्या साऱ्या शिक्षकांच्या ऋणात कलाम कायम राहिले. आपल्या यशाचे सारे श्रेय ते शिक्षकांनाच देतात.

भविष्यात छोटा कलाम जे उपग्रह आणि क्षेपणास्त्र उभारण्याचं काम करणार होता, त्याचा पाया त्याच्या बालपणीच्या निरीक्षण व अभ्यासात होता. पक्षी कसे उडतात हे प्रत्यक्ष किनाऱ्यावर निरीक्षणाची संधी देऊन शिकवणारे त्यांचे शिक्षक आणि बालमनातील त्यांचे कुतूहल यामुळे एक वेगळी भरारी त्यांना घेता आली.

आई जगात सगळ्यात जास्त त्याग करते. आया कायमच कनवाळू असतात ही शिकवण त्यांना बालपणीच मिळाली होती. स्वकष्टातून केलेली पहिली कमाई, वर्तमानपत्रे विक्रीतून कमाईसोबत वाचनाचा झालेला फायदा कलाम कधीही विसरले नाहीत.

बालपणी हिंदू मुस्लिम असा भेद त्यांना कुठेच दिसला नाही, ही एक चांगली गोष्ट त्यांच्या जीवनात घडली.

छोटा कलाम कुटुंबातल्या इतर मुलांपेक्षा वेगळा होता. शांत होता. बाहेर जाऊन खोड्या काढण्यापेक्षा वाचत बसायचं, विचार करायचा या गोष्टीमुळे भविष्यात त्याला पुढे फायदाच झाला. उच्च शिक्षणासाठी ज्यावेळी त्यांच्याकडे पैसे नव्हते, त्यावेळी त्यांच्या आईने आपले दागिने गहाण ठेवून उच्च शिक्षणाची सोय केली हा सुद्धा एक त्याग. हा त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा प्रसंग आहे. निबंध लेखनाच्या आवडीतून त्यांनी अंतर्मनाला मोकळी वाट करून दिली.

या पुस्तकात मोठ्या कलामांचा एक किस्साही सांगितला आहे. ज्यावेळी आपल्या प्रयोगशाळेतील एक शास्त्रज्ञ प्रयोगात गर्क होता. त्याला घरच्यांची आठवण नव्हती, त्यावेळी कलाम स्वतः त्याच्या मुलाला प्रदर्शनाला घेऊन गेले होते. हा प्रसंग कलामांच्या आपुलकीचा दाखला देतो.

**छोटे-मोठे संदेश -** या पुस्तकात लेखकाने अनेक संदेश बालवाचकांसाठी दिले आहेत. जीवनात ते नक्कीच उपयोगी पडणारे आहेत.

'शिक्षकांसाठी विद्यार्थी हा कुटुंबाचाच भाग. ' 'जर का आपल्याला बंध ने तोडायची असतील तर अशी परिस्थिती आपण सहन केली पाहिजे. '

'कडू सागाच्या लाकडातून एक धडा घेतला पाहिजे. जर तुम्हाला शत्रू असतील तर तुम्ही तुमच्यात असे गुण बनवून घ्या, त्यामुळे शत्रू तुम्हाला त्रास देऊ शकणार नाही. '

'जेव्हा तुम्ही संकटात असता, तेव्हा तुमच्या आत डोकवा. परमेश्वर तुमच्यात असतो. '

''मनाने कल्पना केली आणि त्यावर विश्वास ठेवला, तर आपलं मनही काहीही प्राप्त करू शकतो. '

'जेव्हा निराशा जनक वाटेल तेव्हा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कामाला सुरुवात करून त्यात झोकून देणे. '

**सामर्थ्य व उणिवा -** या पुस्तकात कलामांच्या बालपणातील अनेक प्रसंग आणि त्या प्रसंगातून विद्यार्थ्यांना द्यावयाचे जीवनात उपयोगी पडणारे संदेश अधोरेखित केलेले आहेत. कलामांनी बालपणी जे छंद जोपासले, जे गुण अंगीकारले त्याचा त्यांना भविष्यामध्ये अतिशय फायदा झाला. आणि त्यातूनच एक आदर्श भारतीय नागरिक बनण्यास त्यांना मदत झाली. त्यांच्या बालपणातील अनेक गोष्टी व प्रसंग या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणा-या आहेत. तसेच रामेश्वरम गावातील धार्मिक सलोखा हा सुद्धा या पुस्तकामध्ये मांडण्यात आलेला आहे. जी गोष्ट पुढे भारतीय राज्यघटनेने  स्वीकारली, ती धर्मनिरपेक्षतेची गोष्ट त्यापूर्वीही या गावांमध्ये होती ही गोष्ट गौरवास्पद आहे. यातूनच या पुस्तकाचे नाविन्य तसेच सामर्थ्य दिसून येते. रामेश्वरम ते राष्ट्रपती भवनापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास यात रेखाटला आहे.

या पुस्तकातले काही प्रसंग हे सलग नसल्यामुळे थोडीशी वाचताना जी क्रमबद्धता आवश्यक आहे, ती मिळत नाही. तरीही या पुस्तकांमध्ये आयुष्यभरासाठी मिळालेले धडे नक्कीच प्रेरणादायी ठरणारे आहेत.

**वैचारिक व भावनिक -** 'जळक्या पोळीने मन दुखत नाही, पण कठोर शब्दांनी मात्र मन दुखावलं जातं. ' हा साने गुरुजींच्या जीवनातील एक प्रसंगही त्यांच्या बाबतीत घडला आहे.

'समुद्र पक्षाला उन्हातानात आपलं घरट सोडून एकट्याने उड्डाण करावं लागतच ना?' या त्यांच्या वडिलांच्या संदेशाने नव्या जबाबदारीची त्यांना जाणीव करुन दिली.

'यश मिळाले ते माझ्या सर्व शिक्षकांमुळे. त्यांनी जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर मला मार्गदर्शन केले. ' ही त्यांची विनयशीलता येथे अधोरेखीत केली आहे.

**शिक्षक म्हणून कसं उपयुक्त / विद्यार्थ्यांसाठी?**

अभ्यासावरचं प्रेम, शिक्षकांविषयी आदर, आई-वडिलांविषयी जिव्हाळा, जिज्ञासा वृत्ती, कष्टाळू वृत्ती, स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास आणि आध्यात्मिक कृती या प्रेरणादायक गोष्टी विद्यार्थ्यांना सांगण्यासाठी हे पुस्तक नक्कीच उपयुक्त आहे.

**पुस्तक परिचय - श्री. गुरुनाथ चंद्रकांत ताम्हणकर** - मु. पो. माळगाव, बागायत, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. पीन - 416608 मोबा- 942038375



# कविता - अजब सोहळा

वारकरी जाती। विठ्ठल दर्शना। मनात मावेना। आनंद तो॥धृ. ॥

श्रीमती अनिता जयंत खाडीलकर

पाऊले चालती। पंढरीची वाट। आगळा हा थाट। भिमातिरी ।।१।।

जातीभेद सारे। मागे विसरून। तल्लीन होऊन। चाले वारी ॥२॥

आषाढी कार्तिकी। अखंडित वारी ।गाती वारकरी। हरीनाम ॥३॥

दिंडी ही चालली। तुका ज्ञानेशाची। पालखी प्रेमाची। खांद्यावरी ॥४॥

देहभान सारे। विसरून जाती। हाती टाळ घेती। भक्तगण ॥५॥

अजब सोहळा। भक्तांचा हा मेळा। भिमातिरी गोळा। झाला पहा ॥६॥

अनिता ही म्हणे। कृपा आम्हावरी। सदा ठेव खरी। विठुराया ॥७॥

**श्रीमती अनिता जयंत खाडीलकर** - सहयाद्री अपार्टमेंट, खाडीलकर गल्ली, बालगंधर्व नाट्यमंदिर समोर, ब्राह्मणपुरी, मिरज,जि. सांगली मो 9689896341



# कथा - ट्रिटमेंट

सौ. अंजली दिलीप गोखले

डॉ. निर्मला ताईंनी 75 वर्षे पूर्ण झाल्यावर प्रॅक्टिस पूर्ण बंद करायचे ठरवले होते. उद्यापासून या त्यांच्या कर्मभूमीवर त्या फिरणार नव्हत्या. एक मन शांत झाले होते, तर मनाचा एक कोपरा हळवा झाला होता. हॉस्पिटलचे काम गेली कित्येक वर्षे त्या अगदी मनापासून करत होत्या. त्यांचे पेशंट्स म्हणजे बहुतांश स्त्रियाच. त्यांचा चेहरा बघताच क्षणी तिचे दुखणे त्यांना समजत होते. तपासताना स्पर्शाने त्यांना अचूक निदान करता येत होते. अनुभवातून त्यांनी आपल्या औषध देण्याची योग्य दिशा ठरवूनच ठेवली होती.

पेशंटचे दुखणे पूर्ण निघून गेल्यावर पुढच्या वेळी ती आपल्या बहिणीला, जावेला किंवा मैत्रिणीला त्यांच्याकडे घेऊन येत असे. तिचा त्यावेळचा प्रसन्न चेहरा, दुखणे पळून गेल्याचा आनंद पाहून निर्मला ताईंना अपूर्व समाधान मिळत असे. त्या दुसऱ्या पेशंट बरोबर नंतर तिसरा पेशंट, अशी ती साखळी मोठी मोठीच होत जाई.

दवा खान्यात आल्यावर पेशंटची वाट अशी कधी पहावी लागली नाही त्यांना. त्या येईपर्यंत बाहेरचा व्हरांडा भरलेला असे. महिन्यामागून महिने आणि वर्षांमागून वर्षे कशी गेली, खरोखरच त्यांना समजले नाही.

अलीकडेच गावामध्ये एक मोठे हॉस्पिटल उभे राहिले होते. त्या ठिकाणी सगळे निष्णात डॉक्टर्स एकत्र आले होते. त्या सर्वांनी मिळून हे मोठे हॉस्पिटल चालू केले होते. इतर दवाखान्यांवर त्याचा जरूर परिणाम झाला होता. पेशंट कमी झाले, दवाखान्यातल्या नर्स इतर बाया त्या मोठ्या हॉस्पिटलला गेल्या. पण निर्मलाताईंच्या प्रॅक्टिसवर कोणताच परिणाम झाला नव्हता. त्या थकल्या, त्यांचे वय वाढले, कामाची गती कमी झाली पण महिला पेशंटचा ओघ काही कमी होत नव्हता.

गावातील सगळ्यांना त्याचे आश्चर्य वाटत होते. त्यांच्यानंतर कितीतरी जास्त पदव्या घेतलेल्या डॉक्टर्स आल्या, नवीन नवीन कोर्सेस, नवीन मशिनरी उपलब्ध झालेले दवाखाने उघडले गेले. पण निर्मला त्यांच्या प्रॅक्टिस वर त्याचा काही म्हणजे काही परिणाम झाला नाही. नक्की काय गोम आहे त्यांची ? कुणालाच समजत नव्हते.

निर्मलाताई प्रॅक्टिस पूर्ण बंद करणार ही बातमी कानोकानी गावभर फैलावली. कुणाला आनंद झाला तर पेशंट वर्गात नाराजी पसरली. इतक्या मनापासून तपासणाऱ्या, अचूक निदान करणाऱ्या, हमखास बऱ्या करणाऱ्या आणि हो विशेष म्हणजे पैशाचा तकादा मागे न लावणाऱ्या डॉक्टरीण बाई आता कुठे मिळणार होत्या ?

अलीकडे सर्व सामान्य लोकांना तब्येत बिघडल्यावर दवाखान्यात जायचे म्हटल्यावर पोटात गोळाच यायला लागला. हे आणखीन एक दुखणेच होऊन बसले. पहिल्यांदा गेल्यावर नाव नोंदवताना पैसे भरायचे. चिट्ठी लिहून दिलेली औषधे विकत घ्यायची. दुसऱ्या दिवशीच डॉक्टरने काही विचारायला यावे तर पुन्हा तेवढेच

पैसे भरा. म्हणजे भिक नको कुत्रे आवर अशी  परिस्थिती. यामुळे निर्मलाताई आता दवाखाना बंद करणार म्हंटल्यावर सगळ्यांना काळजी लागून राहिली.

निर्मला ताईंच्या नकळत त्यांच्या  आताच्या आणि आधीच्या स्टाफने त्यांना निरोप देण्याचा भावपूर्ण  समारंभ आयोजित केला. ही कुणकुण पेशंट्सना लागताच तेही त्यात सामील झाले. बघता बघता मोठी यादी तयार झाली. इतर डॉक्टर्सनी पण सत्कार करायचे ठरवले. मग काय ? मोठा हॉल ठरवला. त्यानंतर अल्पोपहार आलाच. हार, तुरे, भाषणं सगळा आखीव रेखीव कार्यक्रम ठरला. पत्रकारही उपस्थित रहाणार होते. निर्मलाताईना मात्र याची काहीच खबरबात नव्हती.

सकाळपासून निर्मलाताई भावूक झाल्या होत्या. स्वकष्टाने, स्वबळावर उभारलेला हा डोलारा दुसऱ्याच्या हातात सोपवायचा ही सोपी गोष्ट नव्हती. इथून पुढचे आयुष्य निवांतपणे घालवायचे त्यांनी ठरवले होते. राहून गेलेला प्रवास त्या आता करणार होत्या. चारधाम यात्रा, अमरनाथ यात्रा, कन्याकुमारी, रामेश्वर सगळे सगळे त्यांना साद घालत होते.

दवाखान्यातल्या स्टाफला त्यांनी पुढच्या महिन्याचाही पगार दिला. नर्सेस ना साड्या दिल्या. पुरुषाना शर्टपीस - पॅंटपीस दिले. सगळ्यांचे डोळे आत्ताच भरून वहायला लागले. आत्तापर्यंत त्यांनी सगळ्यांनाच खूप सांभाळून घेतले होते. सगळ्यांच्या कुटुंबाला विनामोबदला औषध पाणी केलं होतं. असा देव माणूस पुन्हा कधी भेटेल का ? सारा दवाखाना गदगदत होता.

ठरल्याप्रमाणे निर्मला त्यांची मैत्रीण संध्याकाळी बरोबर साडेचार वाजता गाडी घेऊन आली. निर्मलाताईना आश्चर्यच वाटले. " चला मॅडम, आता आजची संध्याकाळ तुम्ही माझ्या ताब्यात. " ती हसत हसत म्हणाली. " अग मॅडम काय म्हणतेस?'  निर्मलाताई म्हणाल्या.

"असू दे ग! आजच्या पुरती तू माझी मॅडम. चल बरं लवकर. ओझं उतरव आता हे दवाखान्याचं. मस्तपैकी बाहेर फिरून येऊ या. " आता मात्र निर्मलाताईंचा नाईलाज झाला.

गाडी सुरू झाली. निर्मलाताईंसाठी खास त्यांची आवडती मराठी गाणी लावली. गाडीत बसल्या बसल्या टपोऱ्या पांढऱ्या शुभ्र मोगऱ्याचा गजरा त्यांना दिला, तेव्हा वासाने त्या प्रफुल्लित झाल्या. मैत्रीण गाडी चालवत होती. निर्मला देवी तिच्या शेजारी मान टेकून आरामात गाण्याचा आस्वाद घ्यायला लागल्या. मोगऱ्याचा सुगंध त्यांना वेगळीच ऊर्जा देत होता. सुख सुख म्हणतात ते याहून दुसरे कोणते असणार ?

घरी जायच्या ऐवजी गाडी एका मोठ्या हॉल समोर येऊन थांबली. मोठ्या दरवाजासमोर त्यांचे सगळे असिस्टंट स्, इतर डॉक्टर मित्र-मैत्रिणी स्वागतासाठी उभे होते. "? हे काय ग" त्या मैत्रिणीला म्हणाल्या.

'अगं चल तर  खरं' या सगळ्यांनी खास तुझ्यासाठी पार्टी ठेवलीय' मैत्रीण गाडी लॉक करत म्हणाली. निर्मला ताईंनी पायऱ्या चढायला सुरुवात केली. टाळ्यांच्या कडकडाट करत सगळ्यांनी त्यांचे स्वागत  केले. आतमध्ये जाऊन पाहतात तो काय? आतला हॉल माणसांनी गच्च भरला  होता. पुन्हा एकदा टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत झाले.

या अनपेक्षित स्वागताने निर्मलाताई भारावून गेल्या. या अशा कौतुकाची त्यांनी अपेक्षा कधी केली नव्हती. पाठोपाठ स्वागत गीत, दीपक प्रज्वलन, सत्कार हे सगळे स्वीकारताना निर्मलाताई पुरत्या लाजून गेल्या. एवढ्यात कोणीतरी त्यांना त्यांचे मनोगत व्यक्त करायला सांगितले आणि एका प्रश्नाचे उत्तरही मागितले. त्यांच्या या यशाचे रहस्य काय? गमक काय? इतक्या यशस्वी त्या कशा होऊ शकल्या? या प्रश्नाचे उत्तर ऐकायला सगळा समुदाय कानांचे शिंपले करून लक्षपूर्वक ऐकायला लागला.

निर्मलाताई मृदू आवाजात म्हणाल्या "इथे जमलेल्या रक्ताच्या नात्याहूनही जवळच्या माझ्या मित्र-मैत्रिणींनो, खरं तर एवढा मोठा सत्कार स्वीकारताना मलाच कसे से होते आहे. मी माझ्या प्रोफेशनला साजेशी अशीच आयुष्यभर वागले. वेगळं असं काहीच केलं नाही. परमेश्वरानं मला बळ दिलं, बुद्धी दिली आणि आपण सर्वांनी विश्वास ठेवला याहून वेगळं असं काय केलं मी? नाही म्हणायला संपूर्ण प्रॅक्टिस मध्ये मी विज्ञानाची पुरेपूर मदत घेतली. विज्ञान अर्थात सायन्स याचा हात हातात घेऊन मी ट्रीटमेंट दिली. अर्थात म्हणजे मी नेमकं काय केलं? हे जाणून घ्यायची इच्छा माझ्या पेशंटपेक्षा मेडिकल फीड मधल्या माझ्या सहकार्यांना जास्त आहे, हे नक्की. बरं, विज्ञानाची ही वाट, ही ओळख नवीन आहे असे मुळीच नाही. वर्षानुवर्ष चालत आलेली सर्वांना माहिती असलेली थेरपीच मी वापरली.

माझे बहुतांश पेशंटस महिला होत्या. त्याही परिस्थितीने गरीब घरातल्या. या महिला स्वतःपेक्षा आपल्या घरातील इतर सदस्यांकडेच जास्त लक्ष देणाऱ्या आपली लहान मुले, घरातील सासू-सासरे, येणारे जाणारे नातेवाईक यांचे करण्यात आपला पूर्ण वेळ देणाऱ्या. स्वतःची तब्येत, आवड निवड, इच्छा सगळं बाजूला ठेवून फक्त आणि फक्त समर्पणाचे दान देणाऱ्या. त्यांचे स्वतःकडे इतके दुर्लक्ष की आयुष्याच्या मध्यावर आल्यावर म्हणजे वयाच्या पंचेचाळीशी नंतर त्यांच्या शरीरातील शक्ती पूर्ण निघून गेलेली असायची. मेनॉपॉजमुळे त्या गांजून गेलेल्या असत. अर्थात फक्त घरची काम करण्याची त्यांची ही अवस्था असायची असे नाही, तर नेमक्या त्याच वयात शरीरामध्ये हार्मोन्स तयार होण्याची प्रक्रिया संथ होत असे. महिलांमध्ये मुख्यत्वे इस्टोजेन आणि प्रोजेस्टिरॉन हे दोन हार्मोन्स स्त्रवतात जे त्यांच्या शरीराला अत्यंत आवश्यक आहेत. त्यांच्यातला उत्साह, टवटवीतपणा, ताजेपणा, काम करण्याची उर्मी सगळ्यासाठी हे अत्यंत आवश्यक असतात.

पुरुषांमध्ये टेस्टोस्टिरॉन हे हार्मोन त्यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक असे आहे. जे त्यांच्या वयाच्या ६० - ६५ नंतरही भरपूर असते. त्यांना ही नैसर्गिक रित्या मिळालेली देणगी आहे. आताच्या युगामध्ये महिला पुरुषांच्या बरोबरीने सगळी क्षेत्रं काबीज करत आहेत. कुठेच कमी पडत नाहीत हे १०० % खरे असले, तरी या हार्मोन्सच्या इनबॅलन्समुळे त्यांना आपल्यातील ही कमतरता कधीतरी नक्कीच जाणवते.

मी हे जे सांगते आहे ते सर्वसामान्य लोकांना नवीन वाटेल. पण आमच्या वैद्यकीय व्यवसायिकांना हे मामूली ज्ञान असतेच. मी फक्त त्याचा सुनियोजित वापर केला. आमच्या या ॲनिमिक, शाक्तिहीन महिलांना मी आयर्न, कॅलेशियम बरोबर टेस्टोस्टिरॉन हार्मोन इंजेक्ट करत होते. त्यांच्या कुवतीनुसार, त्यांना किती झेपेल? त्यांच्या शरीराला किती मानवेल याचा सूक्ष्म अभ्यास करून मी हा निर्णय घेत होते. त्याचा साईड इफेक्ट काही होणार नाही याची खबरदारी घेत होते. त्यांच्या घरच्यांनाही या ट्रीटमेंटची कल्पना देत होते.

माझा हा फॉर्म्युला कमालीचा यशस्वी झाला कारण या महिलांनी माझ्यावर टाकलेला विश्वास. मी जे करेन, ते त्यांच्या भल्यासाठीच असेल अशी त्यांनी दाखवलेली श्रद्धा आणि आत्ता आपण म्हणतो ते पॉझिटिव्ह थिंकिंग. मी सुद्धा ही मोठी जोखीम पत्करत आहे याची जाणीव ठेवून होते. मी जे करत होते ते मन लावून आणि अभ्यास करून. माझ्या या औषधोपचाराने साऱ्या भगिनी पन्नाशीनंतरही घरची कामे उमेदीने करू शकल्या. त्यांच्यातला उत्साह टिकून राहिला. गेलेला आत्मविश्वास आला आणि वाढला. अशक्तपणा निघून गेल्यामुळे त्या स्वतः आनंदी झाल्या आणि आपले घरही आनंदी ठेवू शकल्या. त्यांच्या या आनंदामुळेच मला सुद्धा माझ्या वाढत चाललेल्या वयाच्या विसर पडला आणि मी पंचाहत्तरी गाठू शकले.

बस! याहून जास्त काय सांगू? आज तुम्ही मंडळींनी माझा सत्कार करून मला तरुण बनवलं. तुमची ही ट्रीटमेंट सुद्धा परफेक्ट लागू पडली बरं !"

हसत हसत दोन्ही हात जोडून नमस्कार करत निर्मलाताई खुर्चीवर बसल्या.

पूर्ण हॉल टाळ्यांच्या गजराने पुन्हा दुमदुमून गेला.

सौ अंजली दिलीप गोखले - मो 8482939011

---

## कविता - दिवाळी



सौ. रंजना मधुकर लसणे

**सण वर्षाचा आला दिवाळी आनंद देऊ घेऊ या।**
**मना मनातील प्रेम ज्योतीने आसमंत हा उजळू या।।धृ।।**

**पूर्वग्रहाची धूळ साचता जग धूसर का जाणवते।**
**मतभेदाचे जळमट जाता स्पष्ट प्रतिमा दाखवते।**
**आपुलकीच्या ओलाव्याने घरे नव्याने उजळू या।।१।।**

**दुष्प्रवृत्ती नरकासूर तो पुन्हा नव्याने मारू या।**
**सन्मानाने पणतीलाही दिव्या संगती बसवू या।**
**अज्ञानाच्या अंधःकारा ज्ञान ज्योतीने पळवू या।।२।।**

**दीन, अनाथा, अपंग अबला हात अधारा देऊ या।**
**मुखी भरवुनी घास तायांच्या मानुसकीला जागू या।**
**सहकार्याचा दीप अंगणी प्रत्येकांच्या लावू या।।३।।**

सौ. रंजना मधुकर लसणे - **आखाडा बाळापूर, जिल्हा हिंगोली मो. 9960128105**



## कथा - त्या पिंपळाच्या साक्षीने

सौ. वंदना अशोक हुळबत्ते

मुंबईच्या आर्ट गॅलरीतील चित्र प्रदर्शन बघत असताना सगळ्यांच्या नजरा एका चित्रावर भिडल्या होत्या. चित्रकाराच्या अबोध मनातील अव्यक्त भावना कॅन्व्हसवर उतरल्या होत्या. त्या ॲबस्ट्रॅक्ट चित्रातील, रंग, छटा, प्रतिके, सारं सारं मनाला मोहून टाकणार होतं. चित्र बघणाऱ्याच्या नजरेत असत. चित्रासमोरून बाजूला जावे असे वाटत नव्हते. त्या चित्राजवळ गर्दी झाली होती. प्रेक्षकात कोणी तरी सांगत होते "हा चित्रकार बाप आहे. त्यांनी काढलेली चित्रे बघाल, तर डोळ्यांवर विश्वास बसणार नाही. रंगाशी असा खेळतो, संगीताच्या सूरावर रंगाचे भाव व्यक्त करतो. ग्रेट आहे तो. तो बघा... तो चित्रकार... राहूल. याच चित्राला बक्षिसही मिळाले आहे. " त्याच तोडीचे आणखी एक चित्र प्रदर्शनात होते. ते चित्र म्हणजे सौंदर्याची खाणच. त्या चित्रातील विलक्षण पिंपळ वृक्ष, त्याची पाने, पक्षी, व्यक्तीरेखा, वेगळ्याच प्रतिभेच्या होत्या. कला महाविद्यालयीन विद्यार्थी अभ्यासपूर्वक प्रदर्शन बघत होते. राहूल मित्रांच्या घोळक्यात अभिनंदन स्विकारत होता. पण त्याची नजर कुणाला तरी शोधत होती. आर्ट गॅलरीच्या लॉनमध्ये वेदा एकटी कॉफी पित होती. त्याने तिला पाहिले आणि तो तिथून निघून गेला.

सडपातळ बांध्याची, गौरवर्णाची, टपोऱ्या डोळ्यांची वेदा लेमन यलो रंगाच्या साडीत खुलून दिसत होती. ती राहूलच्या सक्सेस पार्टीला जाणार होती. तिने आरश्यात पुन्हा एकदा बघितलं. मनशी हसली. राहूलसाठी टपोऱ्या लाल गुलाबाचा बुके घेतला. राहूलला तो देऊन शेकहॅन्डसाठी हात पुढे केला. शेकहॅन्ड झाले तरी हातात हात गुंतलेलाच होता. मित्रांनी टाळ्या वाजवल्या तशी ती दोघे ओशाळली "वेदा... तुझे अभिनंदन! तुझे चित्र अप्रतिम झाले आहे. त्या चित्रातील प्रतिकांबद्दल मला उत्सुकता आहे. एकदा जाणून घ्यायचं आहे. सांगशील ना?" हे बोलत असताना तिचे लक्ष त्याच्याकडे होते. तो तिच्यावर फिदा होता. किती साधी व सुंदर आहे ही. या साडीत छानच दिसते.

"सांगेन हं! तुझे हार्दिक अभिनंदन!" म्हणत तिने हलकेच तिचा हात बाजूला घेतला. तरी मागे वळताना तिचा पदर त्याच्या बटणात अडकला. पुढे जाताना तिला हिसका बसला. मागे वळून पाहिलं तेव्हा समजलं. पदर ओढून घेतला आणि ती मित्र- मैत्रिणीच्यात मिसळली. तिच्या चित्राचेही सर्वांनी कौतुक केले. तिच्या चित्राप्रमाणे तिच्यातही साधेपणा ठासून भरला होता. आता पार्टीत सर्वजण राहूलच्या मागे-पुढे होते. तर ही नेहासोबत एका बाजूला बसली होती. राहूलचा अंदाज आज वेगळा होता. सुटात रूबादार दिसत होता तो. हसतमुखाने थाटात सर्वांना रिसिव्ह करत होता. सर्वांचे नाच गाणे, खाणे पिणे सुरू झाले. जसा उशीर होवू लागला तशी वेदा अस्वस्थ झाली. पण पार्टीतून मधून जाणे योग्य नाही म्हणून ती बसून राहिली. पार्टी संपली तेव्हा खूप उशीर झाला होता. वेदाची गाडी स्टार्ट होत नव्हती. आता घरी कशी जावू या विचाराने तिला घाम फुटला.

"मी... मी.. सोडू का तूला?" राहूलला 'होय' म्हणण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. साडी सावरत त्याच्या खांद्याचा आधार घेत ती गाडीवर बसली.

"नीट धरून बैस नाही तर पडशील बघ?"

"मी कशी पडेन? तेवढा तोल सांभाळता येतो मला. तू नीट घेऊन जा म्हणजे झाले. "

" मी किती प्यालो तरी माझा तोल सुटणार नाही. काळजी करू नकोस. " तो म्हणाला. तिला बाईकवरून घेऊन जायला मिळेल असं कधी वाटलं नव्हतं. इतकी ओळख असूनही मनातले भाव कधी व्यक्त केले नव्हते. तिच्या वागण्याचा अंदाज येत नव्हता. तिच्यासोबत जाताना भारी वाटत होतं. तिचे घर लवकर येवू नये. आपण असेच दूर जावे. असे वाटत असले तरी तिचे घर आले. जड मनाने राहूलने बाय केले.

वेदा सकाळी वेगळीच ऊर्जा घेऊन उठली. आज तिला पॉट पेंटिंग करायचे होते. हवा तसा  पॉट घरी नव्हता. गोदाक्काच्या घरी जाऊन तो आणावा म्हणून ती तिच्या घरी गेली. तिचे ते मातीने सारवलेले टुमदार घर तिला नेहमीच आवडते. दारातील जमिनीत कपबशीच्या, बांगडीच्या काचेचे तुकड्यातून सुंदर पाने फुले काढली होती तर कुडाच्या भिंतीवर चुन्याने चित्रे काढली होती. ती चित्रे पाहून वेदाने विचारले " गोदाक्का इतकी सुंदर चित्रे कुठे काढायला शिकलीस ग?"

"माज्या आजीकडून, आयकडून. त्या गाडग्या मडक्यावर लयी भारी चितर काढायच्या. आजी तर गोंदायची."

"तुला येते गोंदण काढायला. ?"

" नाय येत. आजी संग गेली कला. आयला आली असती तर मला बी गोंदलं असत बघा"

"आता शिकायचं आहे का?"

"आता शिकून शान काय  उपेग. आदीच्या बाया, बापय, हौसनं गोदून घ्याच्या. आता ही फॅशन नाय"

"तू ही कला शिकलीस तर दोन वर्षात नवीन पक्या घरात जाशिल. आज काल तरुणाईला याची चांगलीच क्रेझ आहे. त्यांच फक्त नाव वेगळे आहे. टॅट्यू म्हणतात त्याला."

"जमल मला?"

"एवढी सुंदर चित्रे काढतेस आहेस तू. तूला ते शिकणं काही अशक्य नाही. मी घेवून जाईन क्लासला. "

"ताय.. मला मातुर  मातीची गाडगी, मडकी कराया  आवडत्यती. इथ मला समाधान घावतय. ज्या कामातून  समाधान घावतय तेच काम करावं. माज काम भलं की मी भलं"

"नवीन पॉट तयार आहेत ना? मी एक घेवून जाणार आहे. नंतर बाकीचे आणून दे. आजीने बोलावलं आहे तुला येवून जा. तुझा विचार बदला तर सांग मी घेवून जाईन क्लासला. "

त्या नंतर या क्षणापर्यंत गोदाक्का माझ्याकडे आली नाही. जीवन जगण्यातला आनंद सापडलेल्या माणसाला मी का उपदेश करत आहे? आजूबाजूला खूप काही घडत असतं ते बघता आलं पाहिजे. काकी रोज सकाळी लवकर उठून पाने फुले घेऊन येते॰ किती सुंदर पुजा मांडते. कोण शिकवतं हिला आकार, रचना, रंगसंगती?

स्वतः आनंद घेते दुसऱ्याला देते. म्हणूनच तिला मंगळागौरीला, चैत्रागौरीला, सणासुदीला लोक हक्काने बोलावतात. ती तितक्याच भक्तीभावाने सगळं करते. आनंद पेरते. चैतन्याचा झरा वाहत ठेवणे हाच कलेचा खरा अर्थ आहे. आनंदाचे क्षण वेचता आले पाहिजेत. जपता आले पाहिजेत. जीवन सरळ होऊन जाईल.

वेदा पिंपळाच्या पारावर त्याच्याशी हितगुज करत बसली होती. आजीने खांद्यावर हात ठेवला. तिच्या हाताची ऊब मिळताच ती आजीच्या कुशीत शिरली. आजीने मायेने  थोपटले. डोळे मिटून म्हणाली, " मी बरोबर वागते ना? माझे काही चुकत नाही ना?"   "असं का विचारले तू? काही घडले का?"

"नाही ग. असंच विचारलं. काही घडलं असेल तर तूलाच पहिल्यादा सांगणार ना!"

"गुणांची पोरं माझी. " हिच्या डोक्यात काही तरी असणार त्या शिवाय ही असे बोलणार नाही. तिच्या कलाने जाणून घ्यायला हवं. हळवी आहे पोर. घरातून काकीने आवाज दिला " वेदू... तूला भेटायला कोण आलंय बघ"

वेदाची गाडी देण्यांचे निमित्त करून राहुल घरी आला होता. मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात  एका बाजूला हा चौसोपी वाडा दिमाखात उभा होता. शेणाने स्वच्छ सारवलेल्या अंगणात मधोमध तुळशी वृंदावन होते. हे पाहून त्यांचे मन प्रसन्न झाले.

" राहूल ये ना. " तिने दाखवलेल्या मोठ्या लाकडी खुर्चीवर तो बसला. पहिल्यादाच घरी येत असल्याने काहीसा संकोचला होता. चकचकीत तांब्याच्या भांड्यातून पाणी घेतले, तेव्हा वेदाने ओळख करून दिली.

"हि काकू आई, ही मोठी आई. काका शेतात गेले आहेत आणि हा माझा मित्र राहूल. छान चित्रे काढतो. मोठा आर्टिस्ट आहे. "

वेदा आपल्याल मित्र मानते हे ऐकून तो सुखावला पण हे 'काकू आई' काय प्रकरण आहे? मला आज खुप गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. थोड्या गप्पा मारल्या नंतर तो म्हणाला "मला तो वृक्ष बघायचा आहे. "

"चल ना. " वेदा सोबत तो परसदारात आला. अनेक झाडे होती. पक्ष्यांचा  किलबिलाट ऐकू येत होता. समोर हिरवागार डेरेदार पिंपळ उभा होता. त्याच्या पानांची सळसळ ऐकू येत होती. तो पारावर बसला. झाडाला निरखून बघू लागला. हे तर इतर झाडा सारखेच झाड आहे. हे झाड तिच्या चित्रात स्वर्गीय कसे दिसते? यात हिला वेगळे काय दिसते? काय गूढ आहे? त्याच्या मनातील घालमेल वाचून ती म्हणाली. "चल माझ्या सोबत. "एका वाड्यातील खोलीत ती त्याला  घेऊन आली. अनेक प्रश्न डोक्यात घेऊन तो सोफ्यावर बसला. तिने एक मोठा लाकडी पेटारा उघडला त्यातून चार, पाच वह्या काढल्या त्यातील एक वही हातात देत  ती म्हणाली "बघ. "

पाने उलटत असताना त्याला दिसले, त्यात पिंपळाच्या पानांपासून गणपतीची अनेक सुंदर चित्रे तयार केली होती. प्रत्येक आकार वेगळा होता. अनेक वेगळी चित्रे होती. पाने सुकली होती पण चित्रे स्पष्ट दिसत होती. " ही एकेक पाने म्हणजे  माझ्या गेलेल्या आईच्या कलेच्या उरलेल्या आठवणी. " हे सांगताना तिचे डोळे भरले होते.

"म्हणजे.... आई.. ?"

"मी आठ - नऊ वर्षाची असताना गेली ती. वडिलांचा चेहराही मी कधी पाहिला नाही. आजी आणि काका, काकूनी मायेने वाढवले. आईच्या बऱ्याच आठवणी या पिंपळा- सोबत आहेत. मला ती तिथेच खेळवायची. भरवायची. गोष्टी सांगायची. शिकवायची मी जमीनीवर पडलेली पाने जमा करून घरी आणे. कुणाला देत नसे. तेव्हा आईने ही चित्रे तयार केली. पुढे हा छंदच लागला मला. मी पण चित्रे तयार करी. पिंपळ पाने भिजवून ती जाळ्या बनवे त्यावर आम्ही चित्रे काढत असू. या बघ किती वह्या भरलेल्या आहेत. आईची प्रत्येक आठवण मी या वहीत ठेवली आहे. तिची उणीव भरून काढण्यासाठी मी पिंपळाजवळ जाते. मला आईची माया जाणवते. तिला भेटल्याचे समाधान होते. हे जे आकार डोक्यात बसले ते पुसले नाहीत उलट जास्त विकसित झालेत. गौतम बुध्दांना या वृक्षाखाली ज्ञान प्राप्त झाले म्हणून मी त्या ग्रंथाचे वाचन केले आणि माझ्या प्रतिमा अधिक प्रगल्भ झाल्या. "

"हे... हे.... फार वेगळं ऐकतोय मी. तू ग्रेट आहेस. " या क्षणाला तिला कवेत घ्यावे, तिला शांत करावे आणि थोडा धीर द्यावा. असे वाटले. तो पुढे सरसावला, पण..... ती तिच्या दुनियेत होती.

"बघ.. या पानाचा आकार हृदया सारखा आहे. तो मनात सामावून जातो. अनेक हृदयानी हे झाड धडधडते आणि प्राणवायू देवून अनेक हृदयाना धडधडत ठेवते. या झाडांशी माझी वीण घट्ट आहे. हे झाड चैत्र पालवीत विलक्षण देखणे दिसते. कोवळ्या प्रकाशात झाडावर पालवीचे लक्ष लक्ष दिप लावल्या सारखे दिसतात. किती तरी वेळा मला त्यातून प्रकाश झोत येताना दिसतो. ते झाड मला प्रेरणा देते. विषय देते. आकार सुचवते. माझ्या आयुष्य त्या झाडाचे स्थान अटळ आहे. "

"मी समजू शकतो तुझी मनस्थिती. तू धीराची आहेस. तुझ्या कल्पनेचे जग तुला धीर देते, प्रेरणा देते पण मला वाटतं आता तुला थोडं प्रॅक्टिकल झालं पाहिजे. म्हणजे त्रास कमी होईल. जग आपल्या सारखे नसते. काही वेळेस ते गैरफायदा घेऊ शकते. सॉरी.... मला तुला दुखवायचे नाही पण वस्तूस्थिती सांगणे माझे काम आहे. "


" सॉरी, म्हणून तू मला परकं करत आहेस आणि मी माझे प्रत्येक काम माझ्या समाधानासाठी करते. त्यातून मला मिळणारा आनंद महत्त्वाचा आहे. तुझे म्हणणे बरोबर आहे. वस्तूस्थितीचे भान हवे. पण या दुनियेमुळे माझे नुकसान झाले नाही. आणि..... आई गेल्यावर आज पहिल्यांदाच कुणाला तरी मी हे शेअर करते आहे. ते ही तुझ्यावर विश्वास आहे म्हणून.....

"या विश्वासाला साथ द्यायला आवडेल तूला?"

राहूलने मनातला भाव सहज बोलून दाखवल्याने ती थोडी गंगरली. दुसऱ्या क्षणाला सावरली आणि चक्क लाजली. त्या क्षणी त्याने तिला कवेत घेतले तेव्हा तिच्या हातातील पिंपळपान तिने घट्ट धरले होते.

**सौ. वंदना अशोक हुळबत्ते -** इंदिरा अपार्टमेंट बी-१३, हिराबाग कॉर्नर, खणभाग, सांगली. मो. ९६७७४९०८९२

## पुस्तकावर बोलू काही - दिगंतर (कथा संग्रह)




**लेखक:** पु. रा. रामदासी

**प्रकाशक:** ग्रंथाली प्रकाशन

**प्रथम आवृत्ती:** २५ डिसेंबर २०१९

**किंमत :** रु.२५०/_



**सौ. राधिका भांडारकर**

नुकताच पु. रा. रामदासी यांचा **दिगंतर** हा कथासंग्रह वाचला. या कथासंग्रहास गेल्याच वर्षी शरदचंद्र चिरमुले यांच्या नावाचा म. सा. प. पुणे शाखेचा उत्कृष्ट कथासंग्रह हा पुरस्कार मिळाला.

या कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत. वेगळे विषय, निराळे भवताल आणि नेमकी भाषाशैली यामुळे, या सर्वच कथा मनाला मोहून टाकतात म्हणूनच या कथांविषयी लिहावेसे वाटते…

**दिगंतर**…. ही पहिलीच शीर्षक कथा. काहीशी दोन पिढीं मधल्या विचारांची, विश्वासाची विसंगती या कथेतून जाणवते. वामनराव, भास्कर, आणि यामिनी या पिता, पुत्र, पत्नी यांच्या नात्यांवर, आधी गृहीत धरलेल्या आणि नंतर विस्कटत चाललेल्या संबंधांची ही सुरेख कथा!!

**कैद**… ही कथा मनोविश्लेषणात्मक आहे. कथेतलं वातावरण तुरुंगातलेच आहे. त्यात गुन्ह्याची शिक्षा भोगणारे कैदी आहेत. काही बेरड, अट्टल तर काही, क्षणैक क्रोधाचे बळी ठरलेल्या भिसे प्राध्यापकांसारखे, ज्यांच्या हातून बहिणीच्या प्रियकराची हत्या झालेली असते. पण कैद याचा अर्थ, तुरुंगाच्या पलीकडे जाऊन शोध घ्यायला लावणारी ही कथा आहे. मनुष्य स्वतःच्या विचारांच्याच तुरुंगात कसा कैद असतो, या मानसिकतेवर प्रकाश टाकणारी ही कथा… जातीभेद, उच्चनिचता, प्रतिगामीत्व आणि पुरोगामीत्व वयातल्या भेदाभेदाच्या भिंतींच्या तुरुंगातला, मुखवट्याच्या आतला माणूस कैदीच असतो, हे सांगणारी मनावर भीषण काळोख ठेवून जाणारी, एक वेगळीच कथा.

**संगम** …… संगम ही कथा एका वेगळ्याच दुनियेची आहे. मटका हा काहीतरी जुगाराचा प्रकार आहे, इतके अल्पज्ञान असलेल्या माझ्यासारख्या वाचकाला या दुनियेतला रांगडा काहीसा ओंगळवाणा गुन्हेगारीचा अनुभव या कथेत मिळतो. इथे जाणवते ते लेखकाचे निरीक्षण! त्या जगातली भाषा ही त्यांनी कशी काय अवगत केली असेल असा प्रश्न पडतो. तिकडम, संगम हे या शब्दांचे अर्थही नव्याने कळले. आपण या जगापासून कित्येक मैल दूर असलो तरी असेही जीवन असते हे ही कथा वाचल्यावर जाणवते.

**आयटीयन्स**…" मोठ्या भोकातून धान्य बुळूबुळू गळून गेलेल्या रित्या बारदानासारखा तो सोफ्यावर आडवा झाला. आलिशान फ्लॅटच्या उजेडातही तो स्वतः मात्र कभीन्न काळोखाच्या ठिपक्यासारखा दिसत होता…" यासारख्या वाक्यातून जाणवते, ती त्यांची लेखनाची आणि निरीक्षणाची ताकद. त्यांची वर्णन क्षमता अफाट आहे.

या कथेत वरवर सुंदर दिसणारे आयुष्य जगणारी, विसंगत माणसं एकत्र आली की आयुष्याची किती परवड होते याचं वास्तव दर्शन  घडतं. ही नव्या पिढीची, नव्या पिढीच्या मानसिकतेची आणि स्वतंत्रपणे जीवनाचा विचार करून निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या तरुणांची ही कथा आहे. ही कथा वाचताना, चूक काय बरोबर काय हे ठरवताना, वाचकही प्रत्येक भूमिकेच्या विचारांबरोबर सहज प्रवास करत राहतो. यात लेखकाच्या लेखन शैलीची आणि जसं आहे तसं लिहिण्याच्या क्षमतेची कमाल वाटते. ही कथा शोकांतिका नसून, एक सडेतोडपणे मांडलेल्या नव्या जीवनातलं सत्य आहे.

**बेवारस**... वाचकाला एका भयाण मानसिक दलदलीत घेउन जाणारी ही कथा. डबऱ्या नावाच्या एका मुलाची. कुठलंही रम्यपण त्याच्या आयुष्यात नव्हतं. बाप दारुडा. आईला दबादबा मारणारा आडदांड. आईचे ट्रक खाली चिरडून झालेलं मरण, आणि रस्त्यावर  पडलेला हा डबऱ्या नावाचा बालक. जीवन म्हणजे फक्त पोटातली  भूक एव्हढंच जाणणारा. त्यातूनच गुन्हेगारीकडे वळलेला हा डबऱ्या.. अत्यंत किळसवाणा.. हिंसक, पशुवत. त्याचं जगणं आणि मरणं सारंच बेवारस. या कथेत पहायला मिळतो ती बेवारस जीवनाचा वास्तववादी चिखल आणि नकळतच मनावर एक औदासीन्य येते.

**पाश...** अनिता दामले नावाच्या  प्रौढ तत्ववेत्त्या प्राध्यापिकेची  ही एक अंतर्मुख करणारी कथा. या कथेतले अनुताईंचे, सुनेशी, मुलाशी, भावाशी असलेले नाते आणि त्या नात्यांतून निर्माण झालेल्या संघर्षाला महत्व न देता, त्या पलीकडे जाऊन मनातली अवघड गुंतागुंत आणि त्यातून निर्माण झालेले, समाजबाह्य, रितीरिवाजबाह्य, परंपरा झुगारुन लावणारे पाश माणसाच्या जीवनाचा दृष्टीकोनच कसा बदलवून टाकतात, यावर प्रकाश टाकणारी ही अत्यंत वेगळी कथा.. ही कथा वाचताना मनात प्रश्न ऊभा राहतो नीतीची नक्की व्याख्या काय?काय गणित आहे नीतीमत्तेचं? निसर्गाच्या प्रवाहाबरोबर चालते ती नीती की समाजप्रवाहाबरोबर असते ती नीती... ?

अंतीम क्षणी माणूस आपल्या गतजीवनाचा एक चित्रपट, जाणीवे  नेणीवेपलीकडे जाऊन पाहतो. आपल्याच पावलांचे ठसे शोधत तो घुटमळतो. आणि कुठल्यातरी  क्षणी तो अचानक मुक्त होतो. अनुताईंच्या अंतीम प्रवासापासून सुरू झालेली ही कथा, जीवनाविषयीचे सारे मतप्रवाह ओलांडत वाचकाला गुंतवून ठेवते.

**बिट्ट्या...** परिपूर्ण कथेची ढोबळमानाने अशी व्याख्या केली जाते... 'एक नायक.. नायिका काही सहपात्रे आणि त्याभोवती गुंफत जाणारं एक सूत्रबद्ध कथानक. ' कथा सुखांतिका किंवा दु:खांतिका असते पण रामदासी सरांची बिट्यया ही कथा वाचताना जाणवते की अशा ठराविक सूत्रात ही कथा ओवलेली नाही. ही एका वातावरणाची कथा आहे. झोपटपट्टीतल्या लोकांच्या ओंगळ जीवनाच्या वातावरणाची ही कथा आहे. यात अनेक पात्रं आहेत. बनी, बिट्ट्या, दगडू, भीमा ही मुख्य आणि पारुआज्जी, चिंगी, महाद्या अशी इतर अनेक... गौण असली तरी. कथेला आधार देणारी.. पण बिट्या नायक नाही. बनी  नायिका नाही. एक भीषण दारिद्र्य, दु:खं निराशा  आणि अशा राड्यारोड्यातून नकळत रुजणारी काहीशी विमल स्वप्ने... चिखलातून चिखलाकडेच जाणारी... हे वातावरणच नायक नायिकेच्या रुपात या कथेतून पहायला मिळते.

आरोग्य, स्वच्छता, सुख, आनंद, रम्यता, सुविचार, सभ्यता हे सारे शब्दच इथल्या गलीच्छ काळ्या  चिखलात गाडून गेल्यासारखे वाटते. मनाला घट्ट पकडून ठेवते ही कथा.

सुकलेल्या विहीरीच्या कडा ओलसर व्हाव्यात तसे डोळे पाझरतात, हे लेखकाचे वाक्य संवेदनशील मनाचा वेध घेते..

आवडली.. नाही आवडली... अथवा छान आहे.. ठीक आहे.. खास नाही.. या कुठल्याही प्रतिक्रियेत ही कथा बसत नाही. या पलीकडची, मनुष्याच्या मानसिक अस्तित्वाची ही अथांग कथा आहे... या कथेतलं भावविश्व रांगडं, उघडं नागडं आहे. इथे कसले मुखवटे नाहीत. लेखकानी या कथेत वापरलेली भाषाशैलीही त्या वातावरणाशी जुळणारी असल्यामुळे कथेतलं वास्तव हुबेहुब समोर येतं.

**भवताल...** कचरा डेपोच्या घाणीनं त्रासलेली उच्चभ्रू माणसं, , आणि त्याच कचऱ्यातलं भंगार गोळा करून पोट भरणारी माणसं, यातली विसंगती या कथेत दिसते. याही कथेत असलेल्या पात्रांची एकमेकांशी असलेली नाती, कधी विकट, संघर्षाची, द्वेष मत्सराची, तर कधी आपलेपणाची, प्रेमाची, सहकाराची, समजूतदारपणाची आहेत. आणि लेखकाने हे नातेसंबध सहजपणे, जाता जाता, अत्यंत अकृत्रीमपणे प्रभावी लेखनशैलीतून उलगडले आहेत. शिवाय या निमीत्ताने त्यांनी भ्रष्ट, ढोंगी, सत्तालोलुप राजकीय नेते आणि त्यांचं राजकारण, यावरही प्रकाश टाकला आहे. ही कथा वाचून संपल्यानंतर मन सुन्न होतं, हळहळतं. वाचक स्वत:च्या सुखासीन आयुष्या पलीकडच्या या असह्य जीवनपद्धतीचा साक्षी भावाने अनुभव घेतो. पुन्हा एकदा, डोळसपणे, जागरुकतेने भवताल न्याहाळण्याची लेखकाची क्षमता आणि संवेदन शीलता मनाला थक्क करते.

**अनंतानंत तो**.. ही या संग्रहातील शेवटची कथा. कथेचा बाज, विषय वेगळा. या कथेतला भावार्थ, गर्भितार्थ उलगडून दाखविण्यास माझी बौद्धिक क्षमता अत्यल्प आहे. लेखकाचे चिंतनात्मक विचार आणि मला उमगलेला कथेचा अर्थ यात तफावत असू शकते. शाश्वत सुखाचा शोध घेत भटकण्याऱ्या एका युवकाच्या जीवनप्रवासाची ही कहाणी. प्रत्यक्ष दु:खाची, एका वृद्धाच्या रुपात भेट होउन त्याला आत्मभान कसे प्राप्त होते, याचे कथन करणारी चिंतनशील, तात्विक कथा. रुपकात्मक अध्यात्मिक कथा. भटक्या मानवासाठी जीवनातलं चिरंतन सत्य सांगणारी अप्रतीम कथा. सुखाचा शोध न घेणं हेच शाश्वत सुख याचा नेमका बोध देणारी ही कथा म्हणजे या सुंदर कथामंदिराचा कळसच जणू.. !! ही कथा वाचताना मला जीएंचीही आठवण झाली. कुठलीही तुलना करण्याचा माझा हेतु नाही. या कथेचं असं एक वेगळं सौंदर्य वादातीत आहे.

समारोपात मी इतकंच म्हणेन की, माणसाचे मन म्हणजे एक काळोखी डोह. अनेक विचार, भावभावना तिथे दडलेल्या असतात आणि संधी मिळताच त्या कशा उफाळून येतात याचा अनुभव या कथांमधून मिळतो.

या पुस्तकाचे मुखपृष्ठही सुंदर आणि अर्थपूर्ण आहे. दिगंतरात उडणारा पक्षी भटक्या मनुष्य वृत्तीचं प्रतिनिधीत्व करतो आणि हात उंचावून सुखाकडे झेप घेऊ पहाणाऱ्या माणसाला उगवत्या सूर्याच्या रुपात आत्मभान प्राप्त होते. संवेदनशील, रसिक वाचकांनी आवर्जून वाचावा असा हा दर्जेदार कथासंग्रह आहे.

**सौ. राधिका भांडारकर** - ई-८०५, रोहन तरंग, वाकड पुणे ४११०५७, मो. ९४२१५२३६६९, ईमेल - radhikabhandarkar@yahoo.com

## कथा - पिकलं पान



श्री रवींद्र पां. कानिटकर

त्या दिवशी पहाटे फिरायला जाताना लहान बाळाच्या रडण्यासारखा आवाज ऐकू आला. भास तर नाही ना असं वाटून तिने नीट कानोसा घेतला. वाटेतल्या बाभळीच्या झुडुपातून आवाज येतोयं असं वाटल्यानं ती तिकडं वळली. पाहते तर कायं!, काही दिवसांचं एक मूल तिथं कुणीतरी एक शापित माऊली, फाटक्या दुपट्यात ठेवून निघून गेली होती. काय करणार बिचारी? मनावर मणाचा दगड ठेवून निघून गेली असणारं! अशा  विचारात असतानाच, कधी त्या निरागस बाळाला तिने उचलून घेतलं, तिचं तिलाच कळलचं नाही. छातीशी धरल्यावर, थोडीफार ऊब मिळाल्यानं ते रडायचं बंद झालं. तडक तिनं पोलीस स्टेशन गाठलं. पोलीसी सोपस्कार पार पाडल्यावर, त्या बाळाला बाल केंद्रात देताना, तिचं अंतःकरण आतून गलबललं. पण एका तान्हया बाळाचं आज आपण रक्षणं केल, आता ते हळुहळू, आईविना असेना का, पण बाल केंद्रात सुखरूप राहील, या विचारानं, ती मनोमन सुखावली. तिने दाखवलेल्या  ममत्वामुळे, बाल केंद्रानेदेखिल, तिच्या विनंतीवरून, त्या चिमुकल्याचं नांव 'कर्ण, ठेवण्याचं मान्य केलं. अनपेक्षितपणे तिला ते छोटुकलं लळा लावून गेलं.

त्या अनाथ बाळाची प्रगती, बालकेंद्रात अधूनमधून जाऊन ती पहात होती. ते वर्ष-सव्वा वर्षाचं असताना, त्याच शहरातील एका मध्यमवर्गीय जोडप्याने, कायदेशीर बाबींची पूर्तता करुन, त्याला आपल्या घरी नेलं॰ त्यादिवशी बालकेंद्रातील वरिष्ठांनी तिला आवर्जून बोलावून घेतलं होतं त्यामुळे आता तिचं, त्या दांपत्याच्या घरी अधूनमधून का होईना, पण जाणं येणं होऊ लागलं.


बाळाची प्रगती छान सुरू होती. बाळ हळुहळू लहान गट, मोठा गट असं करत करत मोठ्या शाळेत जाऊ लागलं, त्या दांपत्याची माया त्याला मिळू लागली. त्यांच्या प्रेमळ संस्कारामुळं ते बाळं, अं हं, आता कर्ण, चांगलाच उंचापुरा होऊन कॉलेजकुमार झाला होता.

आता ती मात्र हळुहळू थकतं चालली होती, पूर्वीसारखं कर्णच्या घरी पटकन जाणं तिला होत नव्हतं. कर्णच्या पालकांनादेखील त्यांचा व्यापामुळे त्या ताईकडे वरचेवर जाणं जमत नसे. एके दिवशी, सकाळी, त्या ताई देवाघरी गेल्याची बातमी आली. कर्णनेच तिचे सर्व अंत्यविधी केले.



कर्ण आता जाणता झाला होता. त्याला त्याचा पूर्वेतिहास माहित झाला होता, नव्हे, जाणीवपूर्वक सांगितला गेला होता. आपल्या खऱ्या आई-वडलांचा शोध घेण्याची प्रबळ इच्छा आता त्याच्या मनात निर्माण झाली. त्यासाठी सुचतील ते सर्व पर्याय तो अजमावून पहात असे. आपण डिटेक्टिव्ह व्हायचेच हे ठरवून त्या अनुषंगानेगाने वेगवेगळ्या कोर्सेसची माहिती त्याने गोळा केली होती. घरच्यांना त्याने तसे सांगितलेही. घरुन कुणाचीच ना नव्हती, उलट पूर्ण सपोर्टच होता. संधी जणू कर्णची वाटच पहात होती म्हणाना!

बेंगलोर येथील एका प्रतिथयश कॉलेजमध्ये डिग्रीसाठी त्याला प्रवेशही मिळाला. डिटेक्टिव्ह एजन्सीच्या कामाची, धोक्यांची इतंभूत माहिती तो मनापासून घेत होता. डिग्रीच्या शेवटच्या वर्षी, प्रॅक्टिकल्स बरोबरच संशोधन प्रकल्पही असल्याने त्याच्या धेय्यपूर्तीसाठी त्याने "अनाथ बालकांच्या पालकांचा शोध- एक आव्हान" हाच विषय निवडला. या प्रकल्पासाठी त्याने स्वतःचा डिएनए तपासून घेतला. आपल्या तसेच आसपासच्मा गांवात रक्त तपासणी, रक्तदान शिबीर असे उपक्रम राबवत असतानाच त्या त्या संस्थांच्या पूर्वपरवानगीने त्याने अनेक स्त्री-पुरुषांचे डीएनए काळजीपूर्वक, महिनोंमहिने तपासले. कर्णच्या अविरत परिश्रमांना शेवटी एकदाचं यश आलं होतं. एका स्त्रीचा अर्धा डीएनए व त्याच गावच्या जवळच्या गावातील एका माणसाचा अर्धा डीएनए असा मिळून एक पूर्ण डीएनए हा अनेक जुळवाजुळवी अंती कर्णच्या डीएनएशी तंतोतंत जुळत होता. कर्णने त्या स्त्रीचा शोध घ्यायचं ठरवलं. अनेक प्रयत्नानंतर त्या स्त्रीच नांव, त्या पुरुषाचं नांव व त्यांच्या आसपासचा पत्ता मिळाला.



खूप चौकशी केल्यानंतर त्याला एका म्हाताऱ्या आजीचा शोध लागला. खूप आजारी होती ती. त्या स्त्रीची कर्णनं गाठ घेतली. ती खंगून खंगून तोळामासा झालेली अबला, एका जीर्ण झोपडीत रहात होती. तिला आपलं असं कोणीच नव्हतं. कोणीतरी, अधून मधून, भाकर तुकडा आणून देत होतं. अशक्तपणामुळं तिचा आवाज खोल गेलेला होता. या ना त्या तऱ्हेने तिच्याशी संपर्क करुन, तिला वरचेवर खायला प्यायला घालून, हळूहळू तिला कर्णने बोलतं केलं. आपल्या तथाकथित निर्दयी बापापेक्षा कर्णचा जीव त्या माऊलीत गुंतून गेला. तिची जीवन कहाणी ऐकून त्याचं मन सुन्न झालं. मोठ्या जिद्दीनं त्यानं तिला चांगल्या हॉस्पिटलमध्ये नेलं, उपचार केले. "कोण रे मुला तू ? का माझ्या सारख्या एका गरीबाला, पिकल्या पानाला मदत करतोयसं?, बाळा, तुझे उपकार कसे रं फेडू?" कर्ण मात्र अबोलचं राहिला. उपचाराअंती ती माऊली आता थोडीशी बरी झाली.

कर्णनं त्या माऊलीला, दत्तक पालकांच्या संमतीनं, आपल्या घरी आणलं. तिला विश्वासात घेऊन तिची हळुवारपणे चौकशी केली व तिला नकळतपणे बोलतं केलं. तिची कर्मकहाणी ऐकून कर्ण धायमोकलून रडू लागला. त्या माऊलीनं त्याला मायेनं कवटाळलं. आईची ऊब कर्णला जाणवली, तो आणखीनच तिच्या कुशीत शिरला. त्याचा तो स्पर्श तिला तिचं ममत्व पटवून गेला. हे बाळ आपल्यासाठी एवढं का करतयं याबद्दल तिची जणू खात्रीच पटली. कर्णला आणखीनच घट्ट मिठी मारुन तिनं जणू जन्मावेळी द्यायची राहिलेली ऊब त्याला द्यायचा केविलवाणा प्रयत्न केला.

**रवींद्र कानिटकर,** सांगली मो. - 9403725995



## कथा - पीळ

डॉ ज्योती गोडबोले

ती अगदी कोवळ्या वयाची. आनंदी, आयुष्याकडे अगदी हसत बघणारी, दोन्ही हात पसरून कवेत आयुष्य घेणारी. लाडकी लेक, बरेच दिवस एकुलती राहिली, म्हणून बापाची तर लाडकीच. दिसायला तर लाखात एक आणि तितकीच हुशार आणि गुणी. उमा, शाळेतही सर्वांच्या गळ्यातला ताईत. नाटक, गाणे, कोणतेही समारंभ उमाशिवाय व्हायचेच नाहीत.

देव एखाद्याला भरभरून देतो, तसे उमाला सगळेच देताना त्याने कसूर नाही ठेवली. तिने सहज काढलेली चित्रेही वाहवा मिळवत. ना कुठे शिकली, की क्लास लावले.

"आई, मी मराठीची प्रोफेसर होणार ग. मला भाषा किती आवडतात. माझे इंग्लिश पण मस्त आहे. माझे निबंध बाई नेहमी शो केसमधे लावतात."

"हो ग बाई, शीक तुला हवे ते," आई कौतुकाने म्हणायची. उमाला वडिलांनी कशात कमी पडू नाही दिले.

उमाला sscला सुरेख मार्क्स मिळाले. उमाने आर्टस् ला प्रवेश घेतला. सरांनी विचारले, " अग इतके सुरेख मार्क्स आहेत तुझे, आर्टस् ला कशी आलीस तू ?"

उमा म्हणाली, "सर मला नाही सायन्स आवडत. मला एकाच वेळी खूप गोष्टी करायला आवडतात. मी गाणे शिकते, ट्रेकला जाते, लेख लिहिते, चिक्कार वाचते. पोहणे तर माझा श्वास आहे. मी हे सगळे सायन्सला जाऊन कसे करू शकणार ?"

उमा कॉलेजची दोन्ही वर्षे पहिली आली. विजय नावाच्या तिच्या एका मित्राच्या ओळखीने तिची श्रीकरशी ओळख झाली. विजय तिला म्हणाला, " श्रीकर अतिशय हुशार आहे बर का. इंजिनीअरिंग तर करतो आहेच, पण तुझ्याचसारखा त्याला भाषा, कविता, वाचन यात खूप इंटरेस्ट आहे. छान आहे माझा मित्र."

उमाचे या गोष्टीत लक्षच नव्हते. तिला त्याच्यात काहीच इंटरेस्ट नाही वाटला. ती, तिच्या मैत्रिणी आणि तिचे अनंत उद्योग यातच ती सतत दनह असायची. एक दिवस सहज भेटण्याचे निमित्त करून, श्रीकर तिला कॉलेजमध्ये भेटायला आला. तिला म्हणाला, " चल कॉफी प्यायला जाऊ या ? " तिला हॉटेलची कॉफी खूप आवडायची. ती लगेच ' हो ' म्हणाली. खूप गप्पा मारल्या दोघांनी. त्याने आपल्या दोन कविताही तिला ऐकवल्या. श्रीकर खूपच चतुरस्त्र आहे, हे लक्षात आले उमाच्या. ती खूपच खूष झाली होती.

"मस्त करतोस रे कविता. पुढे काय करायचे ठरवले आहेस ?"

श्रीकर क्षणभर काहीच बोलला नाही, आणि मग म्हणाला, " अगं मी तुझ्यापेक्षा खूप वेगळ्या परिस्थितीत वाढलोय. आम्ही ४ भावंडं आहोत. वडिलांची अगदी सामान्य नोकरी आहे. मी त्यांचा सर्वात मोठा मुलगा, त्यामुळे पुढे घराची, भावंडांची सगळीच जबाबदारी माझ्या खांद्यावरच येणार आहे हे उघड आहे.

उमा म्हणाली, “ अरे ठीक आहे. तू ही परिस्थिती बदलू शकतोस की. हे बघ, तू एकदा डिग्री मिळवलीस, की सगळे चित्र बदलेल. उगीच आत्तापासूनच कशाला इतका गंभीर होतोस. तुला एकदा छान नोकरी मिळाली, की तू हे सगळे चित्र पालटू शकशील बघ.”

उमाच्या बोलण्याने श्रीकरला खूप हायसे वाटले. मग ते दोघे त्यांच्याही नकळत खूप वेळा भेटू लागले. हा कष्टाळू, जिद्दी, हळवा आणि हरहुन्नरी मुलगा उमाला कधी आवडायला लागला ते तिलाही कळलं नाही.

नंतर बऱ्याच वेळा तो घरीही यायला लागला तिच्या. बाबा म्हणायचे, “ तेज आहे मुलगा. त्याचे वाचन खूप आहे, जनरल  नॉलेजही वयाच्या मानाने जास्त दिसतंय त्याचं. ”

या अशा बाबतीत बायकांना एक इंद्रिय जास्तच असते बहुतेक. तिची आई म्हणाली, “उमा, हा मुलगा आहे चांगला, पण कुठेतरी दुखावलाय असं मला जाणवतं आहे. मोकळेपणाने बोलत नाही बघ तो. कुढा वाटतो.

आणि हो, किंचित नाही तर चांगलाच आढयतेखोर पण आहे. नेहमी मी बघते, तुझ्या कवितेबद्दल, लेखांबद्दल कधीच कसे विचारत नाही तो तुला ? तुझे तोंडभर कौतुक करताना कधी दिसला नाही ग तो. तुला सांगू का., गुणी असूनही, ज्या मुलांचे लहानपण चांगले जात नाही, ज्यांना  आई वडिलांची माया, लोभ मिळत नाही, ती मुले अशी होतात. हे बघ बाळा, तुझे आणि त्याचे upbringing खूप वेगळ्या प्रकारे, वेगळ्या वातावरणात झालंय, हे लक्षात घे.

गुंतू नकोस त्याच्यात. मित्र म्हणून ठीक आहे तो… पण बाकी – उमा, नवरा नेहेमी योग्य तिथे बायकोचे कौतुक करणारा असावा. बायकोने सतत  त्याचीच आरती करण्याची अपेक्षा करणारा नाही. तुला आत्ता कदाचित समजणार नाही, पण हे चूकही असतं आणि त्याहीपेक्षा फार त्रासदायक असतं हं. आणि अशा पुरुषांना आपल्याहून हुशार, बुद्धिमान बायको चालत नाही. “

उमा शहाणी होती, विचारीही होती, पण तिच्या कोवळ्या मनाला हा मित्र मनापासून भावला होता. काहीच कमी नव्हते त्याच्यात. हळूहळू उमा नकळत त्याच्यात गुंतत गेली.

उमा मनस्वी मुलगी होती. संवेदनाशील आणि हळवी. कौतुकाने एकदा श्रीकरला म्हणाली, “ श्री, माझा ड्रेससेन्स खूप छान आहे. मला ने ना एकदा शॉपिंग ला. तुला मस्त टी शर्ट्स, जीन्स असं काहीतरी घे की. किती गबाळा राहतोस रे. इंजिनीअरिंगची बाकीची मुले बघ. किती सुंदर कॅरी करतात स्वतः ला. ”

यावर श्रीकर अत्यंत तुसडेपणाने म्हणाला, “ मी आहे हा असा आहे. मला नाही आवडत असले काही घ्यायला. जीन्स म्हणे!! अगदी तू आणलेस ना तरी फेकून देईन मी. ”

उमा अतिशय नर्व्हस झाली. त्याचे हे असले बोलणे तिला अपेक्षितच नव्हते. हळूहळू तिला त्याचा स्वभाव समजू लागला होता. अलीकडे श्रीकरची आणि तिची खूप भांडणेही व्हायला लागली होती. इतक्या दिवसात त्याने तिला कधीही घरी बोलावले नाही. तिने विचारले तर म्हणायचा - “आमच्या घरी कसली येतेस तू – श्रीमंत लोक नाही आम्ही -तुमच्यासारखे !“

उमाच्या लक्षात येऊ लागलं होतं की  कधीही आणि कुठल्याही कारणाने वाद झाले, तर श्रीकर कधीही माघार घेत नाही. मग तो तिला भेटत नाही, फोन करत नाही- आणि असं वागणं तो कितीही दिवस ताणू शकतो. उमाला याचा अतिशय त्रास होऊ लागला होता. दरवेळी तिला वाटायचं ‘ जाऊ दे. नको तोडायला. कोणाचे का चुकलेले असेना, मला हा चांगला मित्र गमवायचा नाही आहे. ’

पण असं झालं की उमा दिवसचे दिवस अस्वस्थ असे. तिने माघार घेतल्याशिवाय  त्यांचा समेट होतच नसे. ती हजारवेळा मेसेज करायची, तेव्हा कुठे हा उत्तर द्यायचा. उमाला आश्चर्य वाटायचे, ‘ मी इतकी सुरेख लिहिते, हल्ली मासिकात माझे लेख येतात, मी कॉलेज मध्ये सतत पहिली येते. कधीही कसे श्रीकर तोंड भरून कौतुक करत नाही? आणि रोझ डे ला साधा गुलाबही देऊ नये त्याने ? कधीही भेटलो की हा माझी चौकशी अजिबात करत नाही. सतत मी-माझे- मला. मला कित्ती सांगायचे असते, ते राहूनच जाते. याचेच मी ऐकून घ्यायचे. याला चेष्टा केलेली खपत नाही. आणि हा मात्र मला जिव्हारी लागेल असे बोलणार. तू हुशार, स्कॉलर, श्रीमंत असे टोचून बोलणार.

उमा अस्वस्थ होत चालली. या मैत्रीची परिणती कशात करावी हे तिला समजेनाच. एकदा बोलता बोलता तो म्हणाला, “ माहीत आहे ग, मोठी आहेस  स्कॉलर. बापाने लावले असतील वशिले. मग काय, पहिली न यायला काय झालं... “ उमाला  हे जिव्हारी लागले. याला समोरचे कोणी हुशार वाटतच नाही का ? कौतुकाने विचारावे, ‘तुला कोणते लेखक आवडतात रे?’ तर हा म्हणतो, मी लोकांची पुस्तके वाचत नाही.

शी! ही कसली वृत्ती! कधी कसा, हा माझेही प्लॅन्स विचारत नाही. मला हा नावे  ठेवतो, आणखीही काही विनोदाने म्हणतो. पण हेच मी म्हणाले, की याचा अबोला सुरू.

उमा दिवस दिवस विचारात गुंतू लागली. असेच एकदा कडाक्याचे भांडण झाल्यावर तिला म्हणाला, “असे समजू नकोस की तूच एकटी मैत्रीण आहेस मला. तुझ्यापेक्षा हुशार आणि खूप शिकलेल्या मैत्रिणी आहेत माझ्या. आणि तुझ्यासारखे आखडून न धरता सगळे मला बिनधास्त देणाऱ्याही.”

उमाला डोक्यात सणकन दगड बसावा अशी वेदना झाली. दिवस दिवस याचे टेक्स्ट नाहीत, बोलणे तर नाहीच. उमा मनाने श्रीकरपासून दूर जाऊ लागली. श्रीकरला ती सबंध महिना भेटलीच नाही. असे ताणून धरणे, आणि ती बिचारी आली की सूक्ष्म विजयी हसू चेहऱ्यावर  आणणे, हे तर तो मुद्दाम करायचाच. उमाला हे सहन होईना.

श्रीकरला छान नोकरी लागली. उमाही कॉलेज मध्ये लेक्चरर म्हणून जॉईन झाली. Phd करता करता, हा जॉब चालूनच आला तिला. एकदा श्रीकरने तिला विचारले, “मग?? बाबा आता लग्नाचे बघत असतील ना?”

उमा गंभीरपणे म्हणाली, “ हो. आली आहेत मला दोन तीन मुले सांगून. भेटणार आहे मी त्यांना. चांगलीच आहेत रे!

एक तर अमेरिकेचा आहे, पण मीच विचार करतेय, त्याला भेटावे का नाही. ”---श्रीकरच्या मनाचा अंदाज घेत उमा म्हणाली.

“हॅट. काहीही ! तुला कशाला अमेरिकेचा मुलगा हो म्हणेल?? तुला कोण हो म्हणणार?” तुच्छतेने श्रीकर म्हणाला.

आता मात्र उमा संतापून उठली. म्हणाली, “ फार ऐकून घेतले रे तुझे. मी किती खाली आले तुझ्यासाठी. पण तू तसाच ताठ राहिलास. माझ्यात काय कमी आहे रे?? दर वेळी हिणवतोस, काहीही कारण नसताना. हे बघ श्रीकर ! आता तू एकदा नीट ऐकून घेच माझे. तुला माझ्यासारखी तेज मुलगी, बायको म्हणून चालणारच नाही. हुशार बायको मिळाली तर तू तिला सतत तुच्छ लेखणार. घालून पाडून बोलणार. तिने बिचारीने याच परीक्षा देत बसायचे का? आणि तुझे सततच होणारे मूड swings सुद्‌धा सांभाळायचे तिने ? तुझे बालपण गेले असेल वाईट. पण मी काय करू त्याला?

किती दिवस तेच उगाळणार तू? किती तुझ्या मनात कडवेपणा रे! मला हे झेपणारच नाही श्रीकर ! या कारणाने मी रात्र रात्र  तळमळून काढलीय. पण तुला त्याचे काहीही वाटत नाही. किती गृहीत धरशील तू मला? उलट मला तर असं वाटायला लागलंय, की, ’ कशी ही आपल्या पायाशी येते ‘ हाच पुरुषार्थ वाटतोय् तुला. हे बघ. तू माझ्यासारखी टॉपर, , हुशार, , सेल्फमेड  मुलगी करूच नकोस. मी फार वेगळ्या, मोकळ्या वातावरणात वाढलेय. एक सल्ला देते बघ तुला. न मागता -  माझ्यासारखी महत्वाकांक्षी मुलगी करूच नकोस तू. तिचे जिणे हराम करशील तू कुचके बोलून आणि वागून. तू अशी मुलगी बायको म्हणून कर, की जी अतिशय सामान्य असेल-दिसायला, बुद्‌धीनेही आणि

तिची समजही बेताबेताचीच असेल. जिला तू म्हणजे बृहस्पती, आणि  देव वाटशील, अशी सामान्य कुवतीची बेताची मुलगी कर तू. तरच तुझा निभाव  लागेल. सॉरी श्रीकर. मी तुझ्या साठी नाही. मी खूप खूप प्रयत्न केला तुझ्या जवळ यायचा. पण  तुझ्या स्वतःवर आणि फक्त स्वत:वरच असलेल्या प्रेमामुळे तू इतर कुणावर प्रेम करूच शकत नाहीस. Sorry, I am not for u !” उमा निघून गेली.

श्रीकरला त्याचे कितपत वाईट वाटले, तो तिच्या साठी थांबला का नाही, हे बघायला सुद्‌धा ती क्षणभरही थांबली नाही. आई म्हणाली ते तिला आठवले. ‘ उमा, हा मुलगा दुसऱ्याचा विचार करूच शकणार नाही. बघ बाई, नीट विचार कर. ’--’ किती खरे होते आईचे. वेळीच सावध झालो आपण. ’  उमा शांत मनाने घरी गेली. तिच्या मनाची घालमेल पूर्ण थांबली. यापुढे श्रीकरला फारसे भेटायचेच नाही, आणि महत्व तर बिलकुल द्यायचे नाही, हे तिने ठरवून टाकले.

‘बाबांना सांगून टाकूया, आता- बाबा, तुम्ही म्हणाल, त्या मुलांना मी भेटायला तयार आहे. ’ उमाच्या मनातली खळबळ शांत झाली.

शेवटी, श्रीकरचे अति टोकाला गेलेले पीळ, त्याचा  पराकोटीचा स्व आणि आत्मकेंद्रित स्वभाव, त्याला लाभलेले  उमाचे प्रेम –या कशाचाच विचार न करता तो क्षणार्धात दूर गेला तो गेलाच।

**डॉ ज्योती गोडबोले**

## कथा - मायेची सावली



सौ. अर्चना सुरेश देशपांडे

आज सकाळपासून घरातलं वातावरण शांत व निरस होतं की मलाच वाटत होतं कोण जाणे? सर्वजण आपली नित्य कर्मे उरकीत होतो मात्र कोणीच कोणाशी बोलत नव्हते. ऐन तारुण्यात नीताने, माझ्या बहिणीने पाहिलेली स्वप्ने, हौसेने थाटलेला संसार, दोन छकुल्यासह असलेला तिचा सुखी संसार आज उध्वस्त होणार होता. तिच्या सुखी संसाराचा शेवट आज अटळ होता. नजर वारंवार घड्याळाकडे जात होती अकरा वाजूच नयेत, असे वाटत होते पण वाटणे आणि प्रत्यक्ष घडणे यात फरक होता. घड्याळ आपले प्रामाणिकपणे काम बजावत होते. साडेदहा वाजले. मी नीताला हाक मारली, " नीता, आपल्याला कोर्टात जायचे आहे. तयारीला लाग."

एवढे एकच वाक्य मी तिच्याशी बोलले.

"हो, ताई" तिच्याकडून उत्तर आले. मला गलबलून आले. तिचा चेहरा मलूल होता. तिचे डोळे पाण्याने डबडबले होते. मी सुद्धा एक स्त्री होते, स्त्रीचे मन जाणत होते. मी तिला जवळ घेऊन म्हटले "मला तुझे दुःख समजतंय ना बाळा. जे होणार आहे ते टळणार नाही, प्राक्तनात जे भोग आहेत ते भोगूनच संपवले पाहिजेत. आणि जे होतंय ते तुझ्या चांगल्यासाठीच होतंय असं समज. "कोर्टात जायचं म्हणून मीही जरा बऱ्यापैकी साडी नेसले. तीनंही साधा ड्रेस चढवला. आम्ही घराच्या पायऱ्या उतरून बाहेर आलो. कोपऱ्यावर रिक्षा करून कोर्टाच्या दारात पोचलो. कोर्टाच्या पायऱ्या चढताना नीताच्या डोळ्यापुढे अंधारी आली. तिचा कंठ दाटून आला कोणत्याही क्षणी डोळे वाहू लागतील अशीच तिची अवस्था झाली पण कोर्टात बरीच गर्दी होती. लोक येत जात होते. काळया कोटाच्या वकिलांची गडबड सुरू होती. पायऱ्या चढताना डोंगर चढतो की काय एवढे माझे पाय जड झाले होते. आम्ही एकमेकींच्या आधाराने कशाबशा पायऱ्या चढून एका कोपऱ्यातील खुर्चीवर बसलो. आता मात्र तिला अश्रू आवरेनात. माझ्या गळ्यात पडून ती रडू लागली. तिच्या दुःखाचा आवेग कमी होताच ती स्वच्छ तोंड धुवून आली. तिची भिरभिरती नजर तिच्या छोट्या छकुल्यांना शोधत होती. ती मला म्हणाली, "ताई, जाई जुई, कुठे दिसल्या तर मला सांग. जाई जुई तिच्या जुळ्या लेकी, मला त्यांना एकदा डोळे भरून पाहू दे ". पण ते सुखही बहुतेक तिच्या नशिबी नव्हते. आम्ही येण्यापूर्वी मंदार फॉर्म वर सही करून गेला होता.

थोड्या वेळाने वकिलाने हाक मारली, " नीता देशमुख या आणि या फॉर्मवर या ठिकाणी सह्या करा. " नीता मन घट्ट करून उठली. वकीलांनी सांगितलेल्या ठिकाणी थरथरत्या हाताने फॉर्मवर सह्या केल्या आणि तो फॉर्म वकिलांच्याकडे सुपूर्द करून पटकन जाण्यासाठी वळली. मीही तिच्या पाठोपाठ जड पावलांनी चालत राहिले. रिक्षामध्ये बसताच तिचा बांध फुटला, ती हमसून हमसून रडू लागली. मी काहीही न बोलता तिला थोपटत राहिले आज तिच्या वैवाहिक जीवनाचा खेळ, सही बरोबर संपला होता, तिचं घरकुल तिच्या एका सहीने जमीनदोस्त झालं.

आम्ही दोघीं घरी आलो. आमची वृद्ध आई, डोळ्यात प्राण आणून आमची वाट पाहत दारासमोरील खुर्चीत बसली होती. आम्हाला पाहताच थरथरत्या पायांनी ती उठली आणि चहा करण्यासाठी स्वयंपाकघराकडे वळली.

थोड्याच वेळात चहाचे भरलेले कप घेऊन ती बाहेर आली. चहाचा कप पुढे करताच नीता म्हणाली, "आई मी ठीक आहे, आता तुम्ही दोघी चहा प्या। मी जरा  आत जाऊन पडते. मी उठल्यावर चहा घेईन"अन् ती  आतल्या खोलीत निघून गेली आणि तिने दार लावून घेतलं. तिच्या घटस्फोटामुळे खचून गेलेली आई तिला हाक मारण्यासाठी उठली पण मीच तिला खुणेने शांत बसण्यास सांगितले. साधारणपणे दोन तासांनी नीता दार उघडून बाहेर आली. तिचा चेहरा थोडा शांत दिसत होता. बाथरूम मध्ये जाऊन ती स्वच्छ तोंड धुवून आली. आता मात्र तिच्या चेहऱ्यावर ठाम निर्णय दिसत होता.

दुसऱ्या दिवशी तिचे नातेवाईक, शेजारीपाजारी येऊन सहानभूती दाखवून गेले आणि तिच्या जखमेवरची खपली काढून गेले, तर काही जण नको तो सल्लाही देऊन गेले, दुःखावर डागणी देण्याची एकही संधी त्यांनी सोडली नाही.

पण खोलीतून बाहेर येताना तिनं ठरवलं होतं की आता हार मानून झुरायचं नाही॰  माहेरच्या लोकांवर अवलंबून राहून जगायचं नाही. आपल्या जीवनाचा मार्ग आपण शोधायचा. स्वावलंबी व्हायचं. अगदी मिळेल ते काम करायचं.

दुसऱ्या दिवसापासून नोकरीसाठी ती वर्तमानपत्र चाळू लागली. एक दिवस तिने जाहिरात पाहिली. "आधार "या अनाथाश्रमाला अनाथ मुलांना सनाथ करणारी माता हवी.... गरजूंनी खालील फोन नंबर वर संपर्क साधावा' अशी ती जाहिरात होती. त्या फोन क्रमांकावरून तिने पत्ता जाणून घेतला. ती जाहिरात मला दाखवून ती म्हणाली, "ताई, मी या पत्त्यावर जाऊन भेटण्याचं ठरवलं आहे. " मी ती जाहिरात वाचली. माझ्या मनात आलं, 'एम. ए. शैक्षणिक पात्रता असलेल्या मुलीला इथं काम मिळेल का? पण मी माझा विचार व्यक्त केला नाही, काहीही झाले तरी मला नीता कुठेतरी रमायला हवी होती. तसं पाहिलं तर आमचं सुखी चौकोनी कुटुंब होतं. आई बाबा आणि आम्ही दोघी बहिणी. नीता आमच्या घरातलं शेंडेफळ, थोडी लाडवलेली, कोड कौतुकात वाढलेली सुशील अल्लड, गोड मुलगी. मी लग्न होऊन सासरी गेले. त्यानंतर ती स्वतः आनंदी असायची आणि इतरांनाही आनंदी ठेवायची. आपल्या आई-वडिलांची प्रेमाने विचारपूस करायची. कुशाग्र बुद्धिमत्ता असलेल्या  नीताला साहित्याची आवड होती. बारावीला चांगले गुण मिळवून तिने कला शाखेत प्रवेश घेतला आणि एम. ए. उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली. लगेच तिला महाविद्यालयात अध्यापिकेचे नोकरी मिळाली. नाकासमोर पाहणे आणि प्रामाणिकपणे काम करणे हेच तिचे ध्येय होते. थोडक्यात शेवटपर्यंत मानानं आणि सुख समाधानात राहावं एवढीच माफक तिची अपेक्षा होती. त्याचवेळी तिच्या जीवनात मंदार आला. तिचे साधे वागणे व अप्रतिम सौंदर्य यामुळे तो तिच्याकडे आकर्षित झाला. त्याने नुकतीच इंजिनिअरिंगची पदवी घेतली होती व वडिलांचा स्वतंत्र व्यवसाय सांभाळत होता. उमदं व्यक्तिमत्व असलेल्या मंदार मध्ये नकार देण्यासारखे काहीच नव्हते. नीतालाही तो आवडला होता. त्यानं मागणी घालताच तिने होकार दिला. तिच्याकडून होकार मिळतात मंदारने रीतसर नीताला तिच्या घरी जाऊन मागणी घातली. तिच्या वडिलांनी काही आढेवेढे न घेता जनरीती प्रमाणे लग्न लावून दिले. नीताचे एक घर सुटलं आणि जगरहाटी प्रमाणे तिने दुसरं घर जवळ केलं. राजा राणीचा संसार सुरू झाला. लग्नानंतर दोन वर्षांनी दोन जुळ्या मुलींच्या जन्माने संसार आनंदमय झाला. बहरला नीता मुलींच्या कोड कौतुकात रमत होती. त्यांचे दुडुदुडु धावणे, बोबडे बोलणे तिला मोहवीत होते. त्याच काळात मंदारच्या व्यवसायाची भरभराट झाली. मंदारच्या आई-वडिलांना त्याच्या कर्तुत्वाचे कौतुक होते पण मंदार सतत काम काम आणि काम आणि बिझनेस मीटिंग

यात गर्क होता. मिळणाऱ्या यशाचा कैफ चढत होता त्याला. घराकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. घरकाम आणि मुलींचे संगोपन अशी नीताची तारेवरची कसरत सुरू होती. नीता काही सांगायला गेली की तुझं तू बघ, मला उद्याच्या मीटिंगची तयारी करायची आहे. तुला एवढं हँडल करता येत नाही का ? असा डाफरायचा. ते मऊ दाट साईचे दिवस भुरकन उडून गेले. घरचे वातावरण गढूळ बनू लागले होते. दोघांच्या मध्ये खटके उडू लागले. होते एक दिवस निता चिडून म्हणाली, " मुली काय फक्त माझ्या एकटीच्या आहेत? तुला एवढा व्यवसाय प्रिय होता तर मुलींना जन्म का दिलास?" हे ऐकताच मंदार संतापला, " तुला माझ्या मुलींना सांभाळणे जमत नसेल तर घरातून चालती हो. माझे आई-वडील माझ्या मुलींना सांभाळायला समर्थ आहेत" अशी टोकाची भूमिका त्यांने घेतली. त्या दिवसापासून तिच्याशी अबोला धरला, निष्कारण अबोला धरण्याने संसार सुखावर परिणाम होतो, हे तिने समजावण्याचा खूप प्रयत्न केला. तुझ्या वाचून काहीही अडणार नाही, तू खुशाल निघून जा. माझे आई-वडील माझ्या मुलींना सांभाळतील. या वाक्प्रहाराने ती घायाळ झाली. कालांतराने त्याच्याशी बोलणे, त्याच्यासोबत राहणे, त्याचा स्पर्श या सगळ्याची नीताला उबग आली आणि अशा स्थितीत आपला संसार टिकणे अशक्य आहे अशी तिची खात्री झाली.

एक उच्चशिक्षित, संवेदनशील, सतत नवीन शिकण्याची आवड असलेल्या माझ्या बहिणीचे, नीताचे मला कौतुक वाटे आणि अशा मुलीच्या आयुष्यातून उठण्याची वेळ यावी, याचे मला वाईट वाटले. तडजोडीचे सर्व दरवाजे आम्ही ठोठावले पण काहीच उपयोग झाला नाही. कडेलोट झाला, आता माघार नाही अशी स्थिती येताच नितानं वेगळं होण्याचा निर्णय घेतला. दोन दिवस ती सैरभैर होती. तिने बहिणीचं घर गाठलं. नंतर तिने वकिलांच्या सल्ल्याने पुढचे पाऊल उचलले आणि सकाळी जाऊन घटस्फोटाच्या कागदावर सही करून आली.

चार दिवसांनी ठरल्याप्रमाणे ती आधार संस्थेच्या कार्यालयात तिथल्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेली. तिथल्या अधिकाऱ्यांनी तिची चौकशी केली. तिची शैक्षणिक पात्रता पाहून "ही नोकरी तुमच्या शैक्षणिक पात्रतेसाठी योग्य नाही असे आम्हाला वाटते. तुम्हाला कुठेही चांगली नोकरी मिळेल. तुम्ही थोडा विचार करून निर्णय दिला तरी चालेल, ते म्हणाले. ठीक आहे मी तुम्हाला माझा निर्णय कळवते " असे सांगून नीता आश्रमातून बाहेर पडली.

नीता घरी येताच तिने आपला मानस आमच्याकडे बोलून दाखवला. आम्हीही तिच्या इच्छेविरुद्ध काहीही बोललो नाही. नीताला कोणाची सहानुभूती नको होती. तिला गरज होती कामाची आणि कामातून होणाऱ्या अर्थाजनाची. तिने स्वावलंबी होण्याचे ठरवले होते. तिने निश्चय केला की काहीही झाले तरी त्या आश्रमातच राहायचे. कोणतेही काम पडले तरी पर्वा करायची नाही. आपल्या मुलींचे कौतुक करणे नशिबात नाही, तर इथल्या मुलांची आई होऊन त्यांचे लाड पुरवायचे. त्यांची आई होण्यातच समाधान मानायचे असे मनाशी घट्ट ठरवले. तिने नोकरीसाठी होकार दिला. दुसऱ्या दिवशी ती आपल्या सामानासह आश्रमात हजर झाली. तिला आश्रमातली एक खोली दिली गेली आणि पाच मुलांची जबाबदारीही. नवीन जबाबदारी, नवीन चेहरे, नवीन वातावरण यात पहिला दिवस पटकन निघून गेला. रात्री मात्र तिला सर्वांची आठवण येऊ लागली. त्या आठवणीपासून दूर जाण्याचा ती निकराने प्रयत्न करत होती. आई तर संध्याकाळच्या गाडीने गावाला निघून गेली होती. ती रात्र तिने तळमळून काढली. पहाट होताच सगळा व्यवहार सुरू झाले. तिचा नवीन चेहरा पाहताच प्रथम मुलं थोडी बिचकली.

तिथल्या प्रमुखांनी तिची ओळख मुलांना करून दिली. तिथली छोटी मुले हळूहळू सरावली, धिटाईने बोलू लागली. एक छोटीशी परी" ये "म्हणताच हात पसरून तिला बिलगली. तिथल्या निष्पाप, निरागस मुलांच्या जीवनातले प्रसंग, त्यांच्या जीवन कथा जेव्हा नीतानेऐकल्या तेव्हा तिला वाटले की या मुलापेक्षा आपण कितीतरी सुखी आहोत. उगीचच आपण नशिबाला दोष देत होतो. मला घरदार आई, बहीण आहेत पण यांना मायेची सावली देणारे कोणीच नाही आणि तिने ठरवले की इथल्या मुलांना माया प्रेम सुख द्यायचे. जीवात जीव असेपर्यंत त्यांची मायेची सावली होऊन राहायचे. त्यातच आपलं सुख समाधान मानायचं आणि शेवटी दुसऱ्याच्या दुःखावर फुंकर घालणं हेच आयुष्य तिने निवडले.

**सौ. अर्चना सुरेश देशपांडे** - पुणे, मो. ९९६०२१९८३६

---

## कवितेचा उत्सव - चंदन जळले



**श्री अशोक श्रीपाद भांबुरे**

आयुष्याची झाली माझ्या बघ रांगोळी
चंदन जळले प्रेताखाली कुठे दिवाळी

सारा सागर होता माझ्या रे बापाचा
फेरा चुकला कुणास आहे हा नशिबाचा
जाळ्यामधली आज जाहले मी मासोळी
चंदन जळले प्रेताखाली कुठे दिवाळी

ग्रीष्म ऋतूचा कंटाळा ना कधीच केला
घामाचे हे अत्तर पुसले या देहाला
मेघ बरसले कधीतरी मग संध्याकाळी
चंदन जळले प्रेताखाली कुठे दिवाळी

वर्षा झाली आज निघाले पुरती न्हाउन
दुःखांचे गाठोडे नेले त्याने वाहुन
जीव जाळला तेव्हा तेव्हा झाली होळी
चंदन जळले प्रेताखाली कुठे दिवाळी

दिशा उजळल्या घरात माझ्या सूर्य न आला
सोबत केली कशी सोडु मी काळोखाला
मिठी मारली अंधाराने कातरवेळी
चंदन जळले प्रेताखाली कुठे दिवाळी

श्री अशोक श्रीपाद भांबुरे - **धनकवडी,** पुणे ४११ ०४३. मो. ८१८००४२५०६, ईमेल - ashokbhambure123@gmail.com



## कथा - माहेरचे घर

**श्री उदय गोपीनाथ पोवळे**

प्रणवदादा आणि सुनंदा वहिनी असे का वागत आहेत हे अर्पिताला कळत नव्हते. ज्यांनी आजपर्यंत तिला काहीच कमी केले नव्हते तो प्रणवदादा आज तिच्याकडे गावाला असलेली वडिलोपार्जीत जागा त्याच्या नावावर करण्यासाठी तिचे ना हरकत पत्र सही करण्यासाठी घेऊन येत होता.

बाबांचे लवकर देहावसान झाल्याने घराची सगळी जबाबदारी प्रणववर पडली आणि ती त्याने व्यवस्थित पेललीही. स्वतः दिवसभर कामे करून त्याने त्याचे आणि अर्पिताच्या कॉलेजचे शिक्षण पुरे केले. गावाला असलेला अर्धा एकराचा पडका वाडा हा एकच काय तो वडील त्यांच्यासाठी सोडून गेले होते. त्या गावातल्या जागेत प्रणवच्या वडिलांना प्रणव आणि अर्पितासाठी चांगले दोन मजली घर बांधायचे होते आणि त्यांनी कित्येकदा तसे बोलूनही दाखवले होते. त्यासाठी त्यांचे काही आराखडे तयार होते पण देवाच्या मर्जीला ते काही मंजूर नव्हते. पुढे कित्येकवेळा ती जागा विकायची वेळ आली होती पण प्रत्येकवेळा प्रणवच्या आईने खो घातला. त्या जागेत दोन मजली घर उभे केल्याशिवाय ह्यांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही असे तिचे मत होते त्यामुळेच गेले कित्येक वर्षे ती जागा तशीच पडीक राहिली होती. अर्पिता आणि कुशलचे लग्न ठरविले तेंव्हाही पैशाची चणचण होतीच पण तेंव्हाही आईने तिचे जुने सोन्याचे दागिने विकायला काढून वेळ निभावून नेली पण गावची जागा काही विकायला दिली नाही. तिचे एकच घोषवाक्य असायचे गावाला दोन मजली घर बांधायचे. ती जिवंत असे पर्यंत तरी गावाला घर बांधून होईल असे तिला वाटत होते पण तिच्या हयातीत ते काही झाले नाही. सध्याच्या ह्या महागाईच्या जमान्यात जिथे घरखर्च करणेच मेटाकुटीला येते तेथे शिल्लक ती काय रहाणार आणि म्हणूनच प्रणवकडूनकित्येक वर्षे तशीच गेली तरी ते गावाकडचे घर काही बांधून होत नव्हते.

अर्पिताचा नवरा कुशलची नोकरीही काही खूप पगार देऊन जाणारी नसल्याने त्याचाही एक डोळा त्या गावातल्या जागेवर होताच. त्या जागेचे अर्धे पैसे अर्पिताला मिळाले की त्याने स्वतःचे एक हॉटेल चालू करायचे आपल्याच मनाशी पक्के केले होते पण ती जागा काही विकायचे ठरत नव्हते.

प्रणव नोकरीतून निवृत्त झाला आणि त्याच्या भविष्य निर्वाह निधीचे पैसे त्याला मिळाले तेव्हा त्याने आणि सुनंदाने ठरविले आता गावच्या जागेचा विस्तार करून आई बाबांचे दोन मजली घर बांधायचे स्वप्न पुरे करायचे. त्या विचारानेच तो अर्पिताकडे आला होता. वडिलोपार्जित जागा असल्याने तेथे घर बांधण्याआधी खूप काही सोपस्कार करायला लागणार होते आणि अर्पिताचे ना हरकत पत्र मिळाले तरच त्या सगळ्या गोष्टी सहजतेने करता येण्यासारख्या होत्या.

अर्पिताची तशी काही ना हरकत पत्रावर सही करून द्यायची हरकत नव्हती पण कुशल त्या गोष्टीला तयार नव्हता. कुशलचे एकच म्हणणे होते. ' त्या गावातील जागेमध्ये आम्हांला काही रस नाही. त्या जागेचे जी काही किंमत होईल त्याचे अर्धे पैसे आम्हाला द्या आणि तुम्हाला जे काही घर बांधायचे आहे ते बांधा. '

प्रणवने त्याचाही विचार केला पण अर्पिताला अर्धे पैसे दिले तर पुढे दोन मजली घर बांधायला पैसे कुठून आणणार? पेचात पडलेल्या प्रणवला काहीच मार्ग मिळत नव्हता आणि म्हणूनच तो अर्पिताला एकटीला भेटून तिला ना हरकत पत्रावर सही करण्यासाठी मागे लागत होता.

दोन तीन वेळा अर्पिताने प्रणवदादाला सही देण्याचे टाळले. काही ना काही कारणे पुढे करून तिने वेळ निभावून नेली. प्रणव दादाचे लहानपणीपासूनचे तिच्यावर असलेले प्रेम तिने अनुभवले होते. सुनंदा वाहिनीने पण तिला कधी काहीच कमी पडू दिले नव्हते. खर तर दादा वहिनीला सही न देण्याचा कुशलचा हट्ट तिला पटत नव्हता पण काही वेळेला कुशलचेही तिला योग्य वाटे. वडिलोपार्जित जागेमध्ये आपला हक्क असताना दादा वाहिनी असा आपला हक्क सोडायला का सांगतात हे काही तिला समजत नव्हते. खूप विचारांती अर्पिताने ठरविले आता दादा सही मागायला आला की त्याला सरळ तोंडावर सांगायचे, 'हे काही आम्हांला पटत नाही आणि मी काही सही करणार नाही. दोन दिवसांनी प्रणवदादाचा फोन आला तसे अर्पिताने त्याला दुसऱ्या दिवशी भेटायला बोलाविले. त्या रात्री अर्पिताला काही झोप लागली नाही.

उद्या जेव्हा दादा येईल आणि आपण सही द्यायला नकार दिला की आजपर्यंतचे माहेरचे जे संबंध होते, ते तुटणार, ह्या एकाच विचाराने तिला घेरले होते आणि तो दुसरा दिवस उजाडला.

ठरल्याप्रमाणे प्रणव दुपारच्या जेवणाच्या वेळेलाच अर्पिताकडे आला. कुशल कामावर गेला होता. अर्पिताने आधी प्रणवला जेवायला बसविले. त्याच्या आवडीची अळूची भाजी आणि तिच्या हातचे गुलाबजाम त्याला खूप आवडतात म्हणून केले होते. ताटातले पदार्थ बघूनच प्रणव खुश झाला. आजचा दिवस खूप चांगला आहे ह्याची त्याला खात्री पटली. भरपेट जेऊन झाल्यावर गप्पांच्या ओघात प्रणवने विषय काढला आणि सही करण्यासाठी ते पेपर्स तिच्यासमोर धरले. अर्पिताने ते आपल्या हातात घेतले आणि मी ह्या कागदांवर सही करणार नाही आणि ह्यापुढे कधीही माझ्याकडे सहीसाठी येऊ नकोस असे त्याला सांगणार असतांनाच तिने दादाच्या डोळ्यांत बघितले. तिला त्याच्या डोळ्यांत एक वेगळ्या प्रकारची चमक दिसली. दादाचा तिच्यावरचा विश्वास त्याच्या डोळ्यांतून ओसंडून वहात होता आणि तिचा विचार बदलला. तिने ते पेपर्स घेतले आणि काही न बोलता त्या, ना हरकत पत्रावर सही केली. दादाचा चेहरा समाधानाने फुलला होता. त्याने अर्पिताचे आभार मानले आणि 'आता मला खूप कामे आहेत', असे सांगून तो अर्पिताकडून निघालाही.

तो दिवस अर्पितासाठी खूप काठीण होता. कुशल घरी आल्यावर कुशलला तिने दादाला सही दिल्याचे सांगितले आणि कुशलने आकाशपाताळ एक केले. रागारागाने अर्पिताला तो खूप काही बोलला आणि तिने ते मुकाटपणे सगळे ऐकून घेतले. तिलाच समजत नव्हते तिने सही केली, हे चूक होते की बरोबर होते.

त्या दिवशी अर्पिताकडून सही घेऊन गेलेल्या प्रणवने पुढचे सहा महिने अर्पिताला नुसते भेटायचेच टाळले नाही तर तिला एकदाही फोन केला नाही. सुनंदावाहिनीने सुद्धा अर्पिताची एकदाही चौकशी केली नाही. अर्पिताने एकदा- दोनदा प्रणवदादाला फोन लाऊन बोलायचा प्रयत्न केला पण त्याच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नव्हता.

अर्पिताला आता कुशलने काही सांगितलेल्या गोष्टी पटायला लागल्या होत्या. दादाने आपल्या वाटणीची जागा हडप केली असेच आता तिलाही वाटायला लागले होते.

एक वर्षानंतर श्रावण महिन्याच्या सुरवातीलाच प्रणवदादा आणि सुनंदावहिनी अर्पिताच्या दारात हजर झाले. गावावरूनच आले होते. खूपच थकलेले दिसत होते. दादा तर एक वर्षात खूपच बारीक दिसत होता. त्याचा चेहराही काळवंडलेला होता. अर्पिताने दोघांना जरा आराम करायला सांगून त्यांच्या जेवणाची सोय करायला आत गेली.

संध्याकाळी कुशल कामावरून आला तसे दादा आणि वाहिनीने त्यांना गावाला त्याने नवीन घर बांधले त्याचा गृहप्रवेश, पूजा करून, ह्या राखीपोर्णीमेला करत आहोत, तरी दोघांनी गावाला या आणि त्याच दिवशी राखीपौर्णिमा असल्याने अर्पिताकडून राखी बांधून घेता येईल असे सांगितले.

कुशलचा राग अजून तसाच होता. त्याने 'मला जमणार नाही आणि मी येणार नाही' हे लगेच प्रणवला त्याच्या तोंडावर सांगितले. दादाने अर्पिताला तू तरी नक्की ये मी तुझी वाट बघतो असे आवर्जून सांगितले. प्रणवदादा गावाला येण्याचे आमंत्रण देऊन गेला पण अर्पिताच्या मनात खूपच घालमेल चालली होती. कुशल गावाला यायला तयार नसतांना आपण एकटे गावाला दादाकडे जायचे का ह्या प्रश्नाशीच ती घुटमळत होती.

राखीपोर्णीमेच्या दिवशी अर्पिता गावाला पोचली. आपल्या जुन्या जागेवर दोन मजली घर उभे राहिलेले तिला दिसले. दारातच तिच्या स्वागताला प्रणवदादा आणि सुनंदावहिनी उभे होते. अर्पिताला बघून दोघेही खुश झाले होते. वाहिनीने दिवा ओवाळून त्या घरात तिचे स्वागत केले आणि घरात घेतले. दादाने घर खरंच खूप प्रशस्त आणि सुंदर बांधले होते. दादा वाहिनीने सगळे घर तिला दाखविले पण दुसऱ्या मजल्यावर काही तिला नेले नाही. अर्पिताने स्वतःच दुसरा मजला बघायची मागणी केली तेंव्हा दोघांनीही काही ना काही कारणे काढून ते दाखवायचे टाळले.

गृहप्रवेशाची पूजा झाल्यानंतर प्रणवदादाने अर्पिताला राखी बांधायला सांगितले. अर्पिताने राखी बांधून झाल्यावर प्रणव आणि सुनंदाने अर्पिताला दुसऱ्या मजल्यावर नेले. त्या दुसऱ्या मजल्यावरच्या दारात तिला उभे करून त्या रूमची चावी आणि काही पेपर्स तिच्या हातात ठेवले. हे काय आहे, ते अर्पिताला प्रथम कळलेच नाही.

दोघांनी तिला दरवाजा उघडायला सांगितले. अर्पिताने दरवाजा उघडून आतमध्ये प्रवेश केला आणि प्रणवने सांगितले, 'अर्पिता नवीन घरातला हा दुसरा मजला तुझा स्वतःच्या हक्काचा, तुझे स्वतःचे माहेरचे घर. आई बाबांच्या मनात येथे दोन मजली घर बांधायचे होते. म्हणजेच एक मजला तुला आणि एक मजला मला. कुशलच्या मतानुसार जागा विकून तुम्हाला अर्धे पैसे दिले असते तर येथे दोन मजली घर बांधणे कठीण झाले असतेच पण तुझे स्वतःचे माहेरचे घर तुला मिळाले नसते आणि त्याच एका कारणासाठी मी तुझ्याकडून सगळे हक्क घेऊन, जे काम आपल्या बाबांना आपल्या मुलीसाठी करायचे होते ते मी आपल्या बहिणीसाठी करायचे ठरविले. हे सगळे तुला आधी सांगितले असते तर तू काही ह्याला कबूल झाली नसतीस म्हणूनच तुला काही न सांगता तुझ्या रागाला सामोरे जात हे काम मी केले पण आता तुला तुझ्या माहेरच्या घरी यायला ह्या प्रणवदादाची आणि सुनंदावहिनीची दोघांचीही गरज नाही. आता तुझे स्वतःचे आपले माहेरचे घर असेल.'

अर्पिताच्या डोळ्यांत पाणी आले होते. प्रणवदादाने आज तिला खूपच अनोखी अशी रक्षाबंधनाची भेट तिच्या प्रणवदादाने दिली होती. तिचे स्वतःचे माहेरचे घर.

**श्री उदय गोपीनाथ पोवळे** - ठाणे, मोबा. ९८९२९५७००५

## कथा - वळणवाटा



**श्री अरविंद लिमये**

आयुष्यातली वाटचाल म्हणजे वळणवाटांवरचा प्रवास. कांही वळणं अकल्पितपणे प्रगतीपथावर नेऊन सोडणारी, तर कांही उध्वस्त करु पहाणारी. कांही झोकदार तर कांही टोकदार. प्रत्येक वळण एक अनुभव. कायम लक्षात रहाणारा, समृध्द करणारा, किंवा आठवायलाही नको वाटणारा. अनुभव प्रत्येकवेळी स्वत:च घ्यायला पाहिजे असं नाही. इतरांच्या बाबतीतला एखादा अनुभवही आपल्याला अस्वस्थ करुन जातो. इंग्रजीच्या पुराणिकबाईंचा अनुभवही असाच विलक्षण.

विभाच्या आयुष्यातलं ते उध्वस्त करणारं वळण तिचीच नव्हे तर तिचे आई-वडील आणि तिच्या लाडक्या पुराणिक बाईंचीही कसोटी पहाणारे होते.

अशा वळणांवर दबा धरुन बसलेली सगळीच संकटं काही आर्थिक नसतात. तरीही ती उध्वस्त करणारी असतात. अशा वेळी स्वत:लाच मनोमन सावरणं महत्वाचे असते. अशा परिस्थितीत कोलमडून जाणारेच अधिक. तोल सावरणारे मोजकेच. अशाच एका अपवादात्मक घराची ही गोष्ट.. !

विभाचे आईवडिल जेमतेम शिकलेले. दोघेही कष्टकरी. विभावरी त्यांची मोठी मुलगी. पंधरा वर्षांची. धाकटी बारा वर्षांची. दोघीही दिसायला तरतरीत. अभ्यासात हुषार. विभाचे सगळेच विषय चांगले होते. त्यामुळे दहावीच्या जाणिवपूर्वक तयारीसाठी शाळेतील सर्व शिक्षकांचे या नववीच्या वर्षापासूनच तिच्यावर लक्ष केंद्रित झालेले होते. इंग्रजीच्या पुराणिक बाईंची तर तिच्यावर खास मर्जी. त्यांच्या मनातला एक हळवा कोपरा त्यानी या हुषार, चुणचुणीत मुलीसाठी राखून ठेवलेला होता. इतर मुलींच्या तुलनेत बेताची आर्थिक परिस्थिती असूनही अभ्यासावर जाणिवपूर्वक लक्ष केंद्रित करणाऱ्या या गोड मुलीचं तर त्यांना विलक्षण कौतुक वाटायचं..!

दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळा पुन्हा सुरु झाली त्या पहिल्या दिवशीच नव्हे तर पुढेही तीन-चार दिवस विभा शाळेत आली नाही तशा पुराणिक बाई अस्वस्थ झाल्या. तिच्या वर्गशिक्षिका असणाऱ्या साठेबाईंनी तर वेगळीच बातमी दिली. विभानं शाळा सोडायचा निर्णय घेतलाय आणि आता ती पुन्हा कधीच शाळेत येणार नाहीय हे साठेबाईंच्या तोंडून ऐकलं तेव्हा त्यावर विश्वास ठेवायला त्यांचं मन तयार होईना. पण ते खरं होतं. त्यावर शिक्कमोर्तब झालं ते पुराणिकबाईंनी मुद्दाम ठरवून तिचं घर शोधून तिला भेटायचा प्रयत्न केला तेव्हा.!

खरंतर तळागाळातल्या मुलींचीच संख्या जास्त असणाऱ्या या शाळेत विद्यार्थिनींची अशी गळती ही तशी सर्वसाधारण बाबच होती. पण पुराणिकबाईंच्या दृष्टीने विभाची गोष्ट वेगळी होती. म्हणूनच त्या तिला आवर्जून भेटू पहात होत्या. तिच्या घरी पोहोचेपर्यंत अनेक कुशंकानी त्यांचं मन अस्वस्थ झालं होतं. 'काय झालं असेल' या मनातल्या प्रश्नाला अनेक फाटे फुटत होते. विभा तर वाह्यात वागणारी नव्हतीच. तरीही वयाच्या या अवघड निसरड्या वाटेवरुन पाय न घसरु देता तोल सावरत चालणं सोपं नसतं. हा विचार मनाला शिवताच बाईंनी तो ठामपणे नाकारुन झटकून टाकला.

बाई तिच्या घरी गेल्या तेव्हा विभाचे वडील डोक्याला हात धरुन बसले होते. आईच्या डोळ्यांना खळ नव्हता. बाईंची चाहूल लागताच तिथंच गुडघ्यांत मान घालून बसलेली विभा झरकन् उठून दुसऱ्या खोलीत निघून गेली आणि तिने आतून कडी लावून स्वत:ला कोंडून घेतलं. बाईनी परोपरीने विनवलं पण तिने दार उघडलं नाही. आईने विनतवाऱ्या करुनही विभाचं रडवेल्या स्वरातलं 'मला कुणालाही भेटायचं नाहीय'हे ठाम उत्तर बाईना पेचात टाकणारंच होतं. त्या विभाच्या आईजवळ टेकल्या. आईनी डोळ्यांना पदर लावला. "आता या पोरीपुढं डोस्कं फोडून घ्यू का सांगा बरं"

"थोडं तिच्या कलानं घ्यायला हवं आपल्याला. नेमकं झालंय काय सांगाल का.. ?"

तिच्या आईकडून ऐकलं ते सगळं विभाबद्दलची काळजी कमी करण्याऐवजी वाढवणारंच होतं. विभाला सावरायला हवं, समजवायला हवं असं बाईना तीव्रतेने वाटलं खरं पण ती बोलायलाच काय भेटायलाही तयार नव्हती. सगळंच अशुध्द न् अवघड होतं. काय करावं बाईना सुचेचना. आईना धीर देण्यासाठी बाई कांही बोलणार तोवर थोपवून  ठेवलेला आईच्या मनाचा बांध फुटलाच.

"या पोरीसाटी जीव तुटतोय वो बाई माजा. पन काय कराव त्येच सुधरत न्हाई. दोनी पोरीच जाल्या तवा बी आमी नशीबाला बोल लावला नव्हता बगा. दोन पोरांचं वज्जच आपल्यानला पेलवंल कसं तरी त्यापरास जास्तीचं नाईच पेलवनार ह्ये वळखून पोरगा हुईल ही हाव बी धरली नवती आमी. आमी काय शिकल्याली हाव की पैकंवाली सांगा की पन तरी बी ह्ये शानपन पक्कं मनात रुजीवलं अन् तवापास्न फकस्त या पोरींच्या सुकाचाच ईचार करीत आलो आमी. मंग नशिबानं तरी हे.. हे असलं वाईट वंगाळ दान माज्या सोन्यासारक्या पोरीच्याच पुढ्यात का टाकायचं सांगा की. तिला कसं समजवावं त्येच उलगडत न्हाई बगा. समजलं तवापासून घराभाईर बी पडल्याली न्हाई ती. जीवाचं काई बरं वाईट करुन घील अशी भ्या वाटतीय बगा  म्हणून आमी तिगंबी डोळ्यांत तेल घालून राखनीला बसतोय पन असं किती दिस ओढायचं तुमीच सांगा. समदं अंधारुन आल्यावानी झालंय बगा बाई... "

कधीकाळी अंगावर उमटलेला पण कुणालाच न दिसलेला कोडाचा टिंबाएवढा बारीक डाग हां हां म्हणता मोठा होत विभाच्या मानेवरुन चेहऱ्याकडे सरकला. प्रथम लक्षात आलं त्या क्षणापासून विभा हळूहळू खचतंच चालली होती. पण चेहराही काबीज होत चालला, तशी ती बिथरली. आरशात स्वत:चं तोंडही पहायला घाबरू लागलेली ती खचून, कोलमडून गेली. स्वत:चाच तिरस्कार करू लागली. हे असलं तोंड घेऊन बाहेर जायचं नाकारत राहिली. स्वत:ला असं जगापासून तोडत अंधारात चाचपडत जगापासून दूर पळत राहिली.

त्या विचित्र मन:स्थितीतही त्यावेळी सुचले ते शहाणपणाचे चार शब्द बोलून, विभाच्या आईबाबांना धीर देऊन त्या दिवशी पुराणिकबाई विभाच्या घराबाहेर पडल्या ते तिचीच विवंचना सोबत घेऊन. खरं तर विभाची शाळा यापुढे बुडून चालणारं नव्हतं. नववीचे अभ्यासाचे महत्वाचे दीड-दोन महिने आधीच फुकट गेले होते. दहावीचं महत्त्वाचं वर्ष हाकेच्या अंतरावर उभं ठाकलं होतं. आता तातडीने काय करावं ते सुचत नव्हतं आणि गप्प बसूनही चालणार नव्हतं. 'तुमचा निरोप येईल तेव्हा मी पुन्हा येईन, तिला समजावीन' असं बाई निघताना म्हणाल्या होत्या खरं पण विभाच्या आईकडून आठ दिवस उलटून गेले तरी कांही निरोपही नव्हता. मग बाईंनी मन घट्ट केलं न् तोंडाला कुलूप लावून टाकलं. शाळेत स्टाफरुममधे तर कुणालाच कांही बोलायचं

नाही हे मनाशी पक्कं ठरवलं. कारण विभानं शाळा सोडायचं ठरवल्याचं प्रथम समजलं तेव्हा हळहळण्यापलिकडं जास्त कुणाच्याच प्रतिक्रिया फारशा उत्साहवर्धक नव्हत्या. त्या कुणाजवळ मन मोकळं करणं म्हणजे गावगप्पांना विषय पुरवण्यासारखं होतं. ते बाईना नको होतं. आजच संध्याकाळी आता निरोपाची वाट न पहाता आपण शाळा सुटल्यावर विभाच्या घरी जायचं आणि कांही झालं, तरी अगदी बंद दाराआडून का होईना तिच्याशी बोलायचंच, तिला समजवायचं असा विचार करीत त्यादिवशी पुराणिकबाई शाळेजवळ पोचल्या तर खाली मान घालून दफ्तर सावरत, रडून डोळे सुजलेली विभा शाळेकडेच येत असल्याचं त्यांना दुरुन दिसलं. त्यांचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. जवळ जाऊन तिच्याशी बोलावं, तिची विचारपूस करुन तिला धीर द्यावा, असं त्यांना उत्कटतेने वाटलं पण बाईनी स्वत:ला सावरलं. ती जवळ येईपर्यंत त्या शाळेच्या दारातच घुटमळत उभ्या राहिल्या. दोघींची नजरानजर झाली आणि आपले भरुन आलेले डोळे विभानं नजर चुकवत खाली वळवले. बाईंनी तिला हलक्या हाताने थोपटलं. 'बरं झालं, आलीस!' असं म्हणतानाही त्यांचा आवाज भरून आला होता.

वर्गात मुली तिच्याकडे टकामका पहात एकमेकींशी कांहीबाही कुजबुजत होत्या. विभा कुणाशीच न बोलता खाली मान घालून बसली होती. ही अशी अबोल, दुर्मुखलेली विभा बाईना अनोळखी होती. बाई तिच्या मन:स्थितीचा विचार करून शाळा सुटल्यावर तिच्याशी बोलू असं ठरवून गप्प होत्या. त्या वर्गावर शेवटचा तास त्यांचाच होता पण तास संपताच विभा थांबलीच नाही. तडक बाहेर पडली न् निघून गेली. तिची अस्वस्थता, घुसमट बाई समजू शकत होत्या पण विभाच्याच अननुभवी वयाच्या तिच्या वर्गमैत्रिणींच्या ते आकलनापलिकडचं होतं हे बाईनी ओळखलं. दफ्तर आवरुन बाहेर निघालेल्या मुलींना त्यांनी थांबवलं. दोन मिनिटं बसायला सांगितलं. विभाबद्दल समजुतीच्या चार गोष्टी त्यांना सांगितल्या. 'तिला इथं पुन्हा रुळायला, सावरायला, मैत्रीण म्हणून तुम्हीच मदत करायचीय, तिला आधार द्यायचाय' हे त्याना समजेल अशा भाषेत सांगितलं. त्याचा अपेक्षित असा योग्य परिणाम व्हायला वेळ लागला नाही. विभा हळूहळू रुळायला लागली. हसू, बोलू लागली. नैराश्याचे मनावरचे टाके थोडे उसवत चालले. बुडालेला सगळा अभ्यास मैत्रीणींच्या आणि बाईंच्या मदतीने ती भरून काढू लागली आणि लवकरच दहावीच्या महत्त्वपूर्ण वर्षाचं जबाबदारीचं आव्हान स्विकारायला ती आत्मविश्वासाने ताठ मानेने उभी राहिली. ती अशी मोकळी झाली तसं बाईंशी एक दिवस मोकळेपणानं बोलली सगळं. तिला कुणी कसं सावरलं, शाळेत यायला उद्युक्त कसं केलं, ही उत्सुकता बाईंच्या मनात होतीच पण जे जसं घडलं ते विभाच्या तोंडून ऐकताना तिच्या अल्पशिक्षित, गावंढळ आईबाबांबद्दलच्या अभिमानानं बाईंचा ऊर भरुन आला.

पुस्तकी ज्ञान फारसं नसूनही, अनुभवाचे चटके सोसत शहाण्या झालेल्या या दोघानी जगण्याचं तत्त्वज्ञान मात्र या अवघड वळणावर भेदरुन उभ्या असलेल्या आपल्या लेकीच्या गळी, आपल्या मोडक्या तोडक्या भाषेतही पुरेपूर उतरवलं होतं. हे असे अंगावरचे डाग हा कांही तिने केलेला गुन्हा नाहीय की तिनं तोंड लपवून बसून रहावं, हे समजावलं. अंधारात कोंडून घेऊन घुसमटत जगण्याऐवजी ते अवघड वळण अलगद ओलांडून उघड्या डोळ्यांनी जगाकडे पहायला प्रवृत्त केलं. लुळीपांगळी, आंधळी, मूकबधीर, मुलं - माणसंही जिद्दीनं व्यंगावर मात करताहेत, तर हातीपायी धडधाकट असणाऱ्या हिने तर ते करायलाच हवं हे तिच्या कलानं, तिला पटवून सांगितलं. 'तुझ्या या अशा शरीरामुळं नाही तर तुला बसलेल्या धक्क्यामुळं तुझं मन

कमकुवत झालंय' अशी तिला जाणिव करुन दिली. या डागांनी तिची हुशारी, तल्लख बुध्दी, शाळेत होणारं कौतुक या सगळ्याची कांहीच हानी झालेली नाहीय हे तिच्या मनांत उतरवलं, रुजवलं आणि मुख्य म्हणजे घरच्या परिस्थितीचा विचार करता तिने शिकून मोठ्ठं होणं, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होणं याची निकड तिच्या मनावर अचूक ठसवली. एखाद्या कौन्सिलरलाही जे प्रयत्नपूर्वक करावं लागतं तेच सगळं या फाटक्या, अशिक्षित पालकांनी आपल्या मोडक्या-तोडक्या भाषेत पण योग्य पध्दतीने केलं होतं. परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल होती. आर्थिक स्वास्थ्य नव्हतं की उभारी वाटावं असं भवितव्यही आणि तरीही विभाच्या आईवडिलांनी जबाबदार पालकांचं कर्तव्य अचूक बजावलं होतं. विभा सावरली होती. अवघड, अंधाऱ्या वळणवाटेवरचं अडखळलेलं पाऊल हिंमतीने पुढे टाकायला लागणारा आधार त्यानीच तिला दिला होता. आता भविष्यकाळाच्या दिशेने वाटचाल करताना ती कधीच मागे वळून पहाणार नव्हती आणि पुराणिक बाईही तिच्या पुढच्या वळणवाटेवरच्या प्रवासाच्या सहृदय साक्षीदार रहाणार होत्याच.

**श्री अरविंद लिमये -** 'त्रिदल', ४थी गल्ली, विनायकनगर, हरिपूर रोड, हरिपूर, जि. सांगली ४१६४१६ मोबा. - ९८२३७३८२८८



## कथा - वेळ



**सौ. सुजाता काळे**

त्या दिवशी पहाटेच माईंना धाप लागली. त्यांना श्वास घेण्यास त्रास झाला. एवढया पहाटे दवाखाने बंद.... काय करावे?

मॉर्निंग वॉकला निघालेल्या स्नेही डॉक्टरांनी तपासले. दवाखाना उघाडल्यावर ताबडतोब ॲडमिट करायवयास सांगितले. माईंच्या सुनेने रेवतीने कसं बसं बळजबरीने त्यांना चहा बिस्किटे खायला घातली. ते शेवटचे होते असं त्यावेळी तिच्या कल्पनेतही नसणारं.....

सकाळी दवाखाना उघडल्याबरोबर माईंना दवाखान्यात नेलं. डॉक्टरांनी त्यांना ॲडमिट करून घेतलं. लगबगीनं तपासलं. सगळया तपासण्या झाल्या आणि डॉक्टरांनी माईंची शेवटची स्टेज आहे असं घोषित केलं. रेवतीने डॉक्टरांशीच वाद घातला. 'काहीही बडबडू नका' म्हणाली...... नाडी तपासली तर ठोके खूप कमी. बी. पी. कमी..... 80-52...... तो नंतर कमी कमीच होत गेला..... आधीच त्यांना लो बी. पी. चा त्रास. डॉक्टर म्हणाले की किडनी फेल झालीय. रक्त चढवावं लागेल. प्लाज्मा पण दयावा लागेल. धावाधाव सुरू झाली होती..... नाईलाज..... त्यांना श्वास घ्यायला त्रास होत होता म्हणुन वेंटिलेटर लावले. कोण जाणे त्यावेळी रेवतीला वेंटिलेटर जणु देवच भासला. तिच्या मते वेंटिलेटर वर ठेवलं म्हणजे माई नक्कीच वाचणार. तिने आशा सोडली नव्हती.....

गेल्या दोन - तीन वर्षांत माईंच्या पोटात पाणी होत होते. त्यांच्या मुलीने व डॉक्टर जावयाने मोठया दवाखान्यात नेऊन खूप वेळा उपचार केले. पण वय साथ देत नव्हते. त्यात आप्पा गेल्यापासून त्या शरीराबरोवर मनानेही खचल्या होत्या. गेली बारह पंधरा वर्षे त्यांनी सोरायसिस सारखं असाध्य दुखण सोसलं होतं. त्यात संधीवाताचा त्रास. हालता चालता नीट येत नव्हते. आयुष्यभराच्या काबाड कष्टाचा आवाज आता चलता चालता हाडांतून येत होता. तितक्यात डॉक्टरांनी "नातेवाईकांना बोलावून घ्या" असे सांगितले. माईंच्या धाकटा लेकानं 'हाय' खाल्ली. त्याला रडु आवरेना. काय कराव सुचेना पण कळवावं तर लागणार होतं. माईंच्या मुलीला कळवलं. तर मुलगी व जावई लगेचच निघाले. खरचं मुलीची माया जगवेगळी असते. दोन अडीच तासात दोघेही हजर. माई नेहमी म्हणायच्या की डॉक्टर भुंग्यासारखी गाडी चालवतात.....

डॉक्टरांनी येऊन रिपोर्ट पाहीले. त्यांना कळुन चुकले की आता माई काही वाचणार नाहीत. पण माईंचा जीव कुठेतरी दुसरीकदेच अडकला होता. त्यांच्या दादामधे. 'दादा' त्यांचा मोठा मुलगा. तो वयाच्या तेराव्या वर्षी शिक्षणासाठी घराबाहेर गावाबाहेर पडला. तो पुन्हा कधीच घरचा झालाच नाही. खरं तर शिक्षणासाठी गेलेली मुले क्वचितच खेडयात माघारी येतात किंवा बहुधा पाहुणा म्हणुनच घरी येतात. माईंचा मुलगाही गेला तो परगावचाच झाला. त्याचे शिक्षण, नोकरी, लग्न, मुले सगळं काही शहरातच झालं. माई पूर्वी कधी कधी वर्षा दोन वर्षातून त्याच्याकडे जायच्या. नंतर नंतर तेही बंद झालं. शहरी संस्कृती बरोबर गावची संस्कृतीचं पटत नाही हे त्यांना कळुन चुकले होते. माईंचे यजमान आप्पा त्यांच्या भावा- बहीणीच्या जबाबदारीचे आझे पेलता पेलताच गेले. त्यामुळे स्वतःच्या संसाराकडे व मुलांकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. आणि माईंच्या मनात कायमचा

खेद राहिला की त्यांचा मुलगा त्यांच्यापासून कायमचा दूर गेला. त्या नहेमी त्यांच्या मैत्रिणींबरोबर बोलत असत की एकदा माझ्याजवळ  येऊ दे गं.... मला त्याच्याशी मन भरून गप्पा मारायच्या आहेत. जो गेला तो गेलाच. नेहमी आला की लगेच निघुन जातो. राहातचं नाही. असे म्हणत म्हणत चाळीस वर्षे निघून गेली.

आणि माईंना त्यांच्या मनातले काही बोलता आलेच नाही. त्या आयुष्यभर झुरतच राहील्या. नंतर नंतर त्रागा करू लागल्या की"आता मला त्यांचे तोंड देखील पहायचे नाही. माझ्यासाठी त्याच्याकडे वेळ नाही. त्याला म्हणावं की मी मेल्यानंतरही येऊ नकोस. मला अग्नी पण देऊ नकोस. एक दोनदा तर दादांना फोन वर बोलतनाही अश्याच रागावल्या.

माणसाचं काय असतं, हे कधी कधी कळतचं नाही. जे हाती नसतचं त्याचा हव्यास असतो.

बरे असो..... अशा माईंच्या, साहेब झालेल्या मोठया मुलाला रेवतीने फोन केला व म्हणाली ¸ " दादा माईंची तब्येत खूप गंभीर आहे. त्यांना दवाखान्यात ॲडमिट केलं आहे. डॉक्टरांनी नातेवाईकांना बोलवून घ्यायला सांगितले आहे' पण..... दांदानी नेहमीसारखी यावेळीही येण्यासाठी अनिच्छा दाखवली. "मला वेळ नाही. खूप अर्जंट कामे करायची बाकी आहेत. उदया आलो तर नाही का चालणार?'

रेवती म्हणाली की दादा डॉक्टरांनी लास्ट स्टेज सांगितली आहे. मी माझे सांगायचे काम केले. तुम्ही काय ते ठरवा, असे म्हणत रेवतीने फोन ठेवला. मी विचार केला की सोशल मीडियाने माणसांना जोडल आहे की तोडल आहे. पूर्वी लग्न पत्रिका महीना महिना आधी लोकं पाठवत असत. नातेवाईक कार्यक्रमास हजर होत. पण मृत्यु पावलेल्यांच्या बातमीचे पत्र सर्व विधि उरकले तरीही मिळत नसे. पण आता तर तस नाही.....

तर काय..... माईंच्या दादांना कळवण्याचे कर्तव्य रेवतीने केले. आता 'वेळ' दादांची होती कर्तव्य पार पाडण्याची. त्या दिवशी संध्याकाळ होत आली तरी माईंची तब्येत काही स्थिर होत नव्हती. रेवती व विभाताई दिवसभर माईंच्या जवळचं होत्या. दिवसभरात माईनी अनेक वेळा दादाबद्दल विचारलं. सकाळी बोलत होत्या तोपर्यंत बोलल्या नंतर इशा-याने विचारू लागल्या.

त्या दोघी काय बोलणार. त्यांच्याकडे त्यांच्या प्रश्नाचे उत्तर नव्हते. त्यांना या क्षणीही त्यांच्या दादाशी बोलायचे होते. मनातलं साठवलेलं सगळं बोलायचं होत. राग, प्रेम ब झुरणारा झरा वाहू दयायचा होता. पण हळूहळू त्यांची स्थिती खालावत गेली. शरीरातील एक एक अंग काम करेनासं झालं. संध्याकाळी ब्लड प्रेशर अगदी लो झालं. आता त्यांना खाणाखुणा पण करता येत नव्हत्या. वाचेने साथ सोडली होती.... त्राण नव्हतं..... 'वेंटीलेटर काढ' म्हणुन त्यांनी रेवतीला वारंवार सांगितले. पण तिच्या हातात काही नव्हते. त्यांना रक्ताच्या बाटल्या व प्लाज्मा देऊन काही उपयोग झाला नव्हता. देवाची प्रार्थना करण्याशिवाय दूसरा पर्याय नव्हता.

आणि.......... संध्याकाळी माईंचा दादा आला. आल्या आल्या माईंची चौकशी केली व आय सी यू मधे भेटायला गेला. माईंना हाक मारली. आम्ही सगळे खुष होतो की माईंना आनंद होईल. पण..... हे काय माईंनी चक्क मानच फिरवली. दादांचा चेहराही पाहीला नाही. आम्हा सगळयांना आश्चर्य वाटले की हीच ती

माई आहे का? जी आयुष्यभर दादाशी पोटभर बोलायचं म्हणत होती. आज काय झालयं? दादांनी तीन चार वेळा हाक मारली. पण माईंनी फिरवलेली मान पुन्हा वळवली नाही. आज काय झालय माईला?

कारण वेगळचं होतं..... त्यावेळी माईंकडे वेळ होता पण दादाकडे नव्हता. आज माई मरणाच्या दारात आहे आणि दादा दवाखान्याच्या दारात..... आज दादाकडे वेळ आहे पण माईंकडे नाही. मी समजू शकले की माईंना वाटले असेल की अंतिम क्षणी भेटायला आला आहे. पण आता बोलणचं अशक्य झालय. आता त्या बोलण्याच्या स्थितित नव्हत्या.

पहाटे पहाटे माई गेल्या..... त्यांचे अंत्यसंस्कार झाले. अग्नि देताना वर्षानुवर्षीचा दादाचा उमाळा दाटून आला.....

दादाने हबंरडा फोडला..... माई..... माई तू माझ्याकडे एक वेळ पाहीलं नाहीस..... एक वेळ..... फक्त एक वेळ..... पण त्यांना कुठे माहित होतं की माईची ती ‘वेळ..... आता टळून गेली होती.

**सौ. सुजाता काळे** - पाचगणी, महाराष्ट्र, मोबाईल 9975577684





## कथा - रिचार्ज

सौ. गौरी गाडेकर

बेल वाजली, तेव्हा प्रतिमाला वाटलं, 'हेच असणार. विसरले वाटतं काहीतरी. थांबू देत थोडा वेळ. होऊ दे उशीर.'

बसूनच राहिली ती. पण लगेचच दुसऱ्यांदा-तिसऱ्यांदा बेल वाजली नाही. म्हणजे हे नसणार. मग ती उठली.

दार उघडलं, तर शेजारच्या मावशी.

"अगं, कामात होतीस का?"

"सॉरी, मावशी. मला वाटलं, हेच आले परत. म्हणून लगेच दार नाही उघडलं. "

"रागावलीयस त्याच्यावर? गेलाय कुठे तो? मी फिरून आले, तेव्हा दिसला. शिटी वाजवत थांबला होता, रिक्षासाठी. तू नाही गेलीस?"

"मी नव्हते ना बरोबर, म्हणून तर शिट्ट्याबिट्ट्या.... "

"एवढी चिडलीयस त्याच्यावर?"

"चिडू कशाला मी? प्रत्येक जण स्वतंत्र आहे, हवं तसं वागायला. "

आता मात्र मावशींना हसू आवरेना.

"तुम्हीही हसा मला. "

"अगं, तुला नाही हसत मी. तुझ्या बोलण्याची गंमत वाटली मला. मी ह्यांच्यावर चिडले ना, की मीपण त्यांना हेच सांगत असते. म्हणून हसू आलं मला. ते जाऊ दे. एकटीच असशील घरात, तर आमच्याकडे ये. हे गेलेत बहिणीकडे. मस्त चहा वगैरे घेऊ या."

तसा प्रतिमाला या मावशींचा खूप आधार वाटायचा. विशेषतः श्रेयस एम. एस. करायला यू. एस. ला गेल्यावर जाणवणाऱ्या एकटेपणात त्यांनी खऱ्या मावशीच्या मायेने प्रतिमाला जपलं होतं.

आल्याच्या चहाचा गरमगरम घोट घशातून उतरताच प्रतिमाच्या मनाची कवाडं खुलली.

"ह्यांच्या इंटरच्या वर्गाचं रियुनियन आहे आज. तिकडे गेलेत ते."

"जुने मित्र भेटणार, म्हटल्यावर..... "

"मित्रच नाही, मैत्रिणीसुद्धा. "

"अच्छा! म्हणून बाईसाहेब अस्वस्थ आहेत तर. "

"त्रेपन्नावा वाढदिवस आहे पुढच्या महिन्यात. आणि हे गेलेयत चट्टेरीपट्टेरी टीशर्ट घालून, केस डाय करून. पंचविशीच्या तरुणाच्या उत्साहात. "

मावशी कौतुकाने हसल्या.

"आणि मावशी, गेले दहा-बारा दिवस फोनवर याच गप्पा-'अमकी येणाराय का? हिरॉइन येणार ना? शर्मिला टागोरचा फोन लागला की नाही?' मी त्यांना विचारलंसुद्धा - ही एवढी नावं घेताय तुम्ही, त्या मॅरीड आहेत की सिंगल?"

"अगं, असा अविश्वास दाखवू नये, आपल्या माणसावर. शेवटी भेटला एखाद दिवस कोणाला, बोलला कोणाशी, म्हणून काय तो संसार थोडाच मोडणारय!"

"पण अशा गोष्टींची सुरुवात अशीच होत असते. "

"असा नकारात्मक विचार नको करूस. "

"तुम्ही बघायला पाहिजे होतं, मावशी. गेले आठ-दहा दिवस तर ते शिंगं मोडून वासरात शिरल्यासारखे वागतायत. आणि आज तर काय? अगदी गद्धेपंचविशीत शिरलेल्या...... "

"नवरा खूश असेल तर घरातलं वातावरण चांगलंच राहतं. हो की नाही?"

"ते तो का खूश आहे, यावर अवलंबून असतं. त्या टवळ्यांना भेटायचं, म्हणून यांना आनंदाच्या उकळ्या फुटत असतील, तर मला रागावण्याचा हक्क नाही का?"

"नक्कीच हक्क आहे. पण तो बजावलाच पाहिजे, अशी सक्ती तर नाही ना?"

"तुम्ही काय उलटसुलट बोलताय, मावशी? मला तर कळतच नाही, तुम्हाला नक्की काय म्हणायचंय, ते. "

"तू शांतपणे विचार कर. मग तुला कळेल, मी काय म्हणते, ते. "

"मला काहीच सुचत नाहीय. "

"हे बघ. तो एवढ्या आनंदात, उत्सुकतेने सगळ्यांना भेटायला गेलाय. तिकडे तो धम्माल करणार. त्या मजेशीर आठवणी घेऊन हसतनाचत घरी येणार. "

"तुम्ही नक्की कोणाच्या बाजूने बोलताय? त्यांच्या की माझ्या?"

"अर्थात तुझ्याच. आता बघ हं. तो आनंदात चिंब होऊन, हवेत तरंगत घरी येणार आणि मग तू त्याला तासणार. त्याच्या मैत्रिणींवरून त्याला टोमणे मारणार. "

"मला राग येणं साहजिकच आहे ना!"

"साहजिक आहे, तसं म्हटलं तर. पण टाळताही येऊ शकतं ना. "

प्रतिमा काहीच बोलली नाही.

"तर तू चिडचिड केलीस, तर त्यामुळे त्यालाही तुझा राग येणार आणि मनाने तो त्याच्या मैत्रिणींच्या आणखी जवळ जाणार. "

"मग तुम्ही माझ्या जागी असता, तर काय केलं असतं?"

"ते महत्त्वाचं नाही. तू आता काय केलं पाहिजेस, ते ऐक. "

"दोन्हींचा अर्थ एकच ना?"

"मी काय सांगते, ते ऐक. तो पंचवीस वर्षं मागे गेलाय ना? मग तूही जा. "

"म्हणजे?" प्रतिमाचा चेहराच एक मोठ्ठं प्रश्नचिन्ह झाला.

" म्हणजे....... घरीही त्याच आनंदाची अनुभूती तू त्याला दिलीस तर? "

"म्हणजे? मी नाही समजले. "

"म्हणजे तो तिकडे पंचवीस-तीस वर्षांपूर्वीच्या काळात जाऊन येणार ना? मग घरीही त्याला पंचवीस वर्षं मागे ने. म्हणजे तूही पंचवीस वर्षं मागे जा. "

" म्हणजे? नक्की काय करायचं मी?"

"सांगू? आता पार्लरमध्ये जा. केस काप. फेशिअल करून घे आणि छानसा नवा ड्रेस घेऊन ये. आणि लग्न झाल्याझाल्या सुरुवातीच्या दिवसांत त्याची वाट बघायचीस, त्याचं स्वागत करायचीस, तसं कर. "

"डोंबलाचं स्वागत ! तेव्हा ते घरी यायचे, तेव्हा मी किचनमध्ये घामाघूम झालेले असायचे. सासूबाई आणि नणंद या दोघी करायच्या त्यांचं स्वागत. मला किती वाटायचं....... "

"अगं, मग तेव्हा जे करावंसं वाटायचं ;पण करायला जमलं नव्हतं, ते आज कर. "

प्रतिमाला एकदम 'कशी करू स्वागता' आठवलं आणि खुदकन हसू आलं.

स्वागत म्हटल्यावर प्रतिमाला मागे दाराला लावण्यासाठी आणलेली घुंगरं आठवली. आणली, तेव्हा घरी आल्यावर त्यांचं भांडण झालं होतं. पुढे तर ती घुंगरं आणल्याचं विसरूनच गेली होती. एकूण काय, तर ती घुंगरं दाराला लावायची राहून गेली होती.

प्रतिमाने लगेचच ती घुंगरं शोधून काढली आणि दरवाजाला लावून टाकली. दरवाजा उघडून, बंद करून बघितला, तर त्या मंद किणकिणीने तिच्या मनाला गुदगुल्या झाल्या. मग ती लॅचची चावी घेऊन आली. बाहेर जाऊन तिने दरवाजा बंद केला, उघडला. दोन-तीन प्रयत्नांनंतर नक्की केवढ्या जोरात दरवाजाची उघडझाप केली, तर घुंगरांची किणकिण बाहेर स्पष्ट ऐकू येते, ते तिच्या लक्षात आलं.

साडेसातच्या सुमाराला प्रवीण घरी आला, तो आनंदाच्या, तारुण्याच्या लाटेवर स्वार होऊनच.

बेलवर हात ठेवला आणि खाडकन त्याची धुंदी उतरली. तो गुणगुणत असलेलं गाणं अर्धवटच राहिलं. आता त्या चंडीला सामोरं जायचंय, या विचाराने त्याच्या अंगावर काटा आला.

मग त्याने चेहऱ्यावरचं हसू, आनंद खसखसून पुसून टाकलं. प्रतिमाने कितीही टोमणे मारले, तरी आपण गप्प राहायचं, शांत राहायचं, मनातल्या आनंदावर अजिबात परिणाम होऊ द्यायचा नाही, असा त्याने निश्चय केला. चेहरा गंभीर केला आणि बेल दाबली.

दार उघडलं. घुंगरांची नाजूकशी किणकिण कानावर आली आणि समोर...... समोर चक्क त्याची स्वप्नपरी. त्याने 'होकार' कळवल्यानंतर लग्नापूर्वी फिरायला जाताना दिसायची, तशी प्रतिमा. मोकळे सोडलेले केस. लोंबतं कानातलं. त्याच्या आवडीच्या निळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस. त्याच्या ओठातून निसटती शिट्टी बाहेर पडली. तेव्हा तिला मिठीत घेऊन तिच्या केसांवर ओठ ठेवायचा मोह त्याला अनावर व्हायचा. पण आता तर ती त्याची बायको होती. हक्काची. त्याने तिला जवळ घेतलं.

"थांबा, थांबा. दरवाजा तरी बंद करू द्या. "

"तुला सांगू, प्रतिमा? आपलं लग्न झालं, तेव्हा मी ऑफिसातून घरी यायचो ना, तेव्हा अशीच स्वप्नं बघत यायचो. तू दार उघडतेयस आणि मी तुला.... पण कसलं काय आणि कसलं काय!दार आईच उघडायची नाहीतर चिंगी. माझे डोळे तुला बघायला आतुर झालेले असायचे. पण या मायलेकी तिथेच काहीतरी बडबडत बसायच्या माझ्याशी. "

'म्हणजे, यांनाही असं वाटायचं?' प्रतिमाला आश्चर्यच वाटलं.

'पुढे श्रेयस झाला. मध्यंतरी चिंगीचं लग्न झालं. सासूबाई, सासरे गेले. पण नात्यातला रोमँटिकपणा कधी, कुठे हरवून गेला, कळलंच नाही. '

"हनी, आपण बाहेरच जाऊया जेवायला. "

प्रवीणच्या तोंडून निघालेल्या 'हनी'ने प्रतिमाला जेवढं आश्चर्य वाटलं, तेवढंच आश्चर्य प्रवीणलाही वाटलं. आणि आनंदही.

हॉटेलमध्ये जेवता जेवता प्रवीण म्हणाला, "अगं, पूर्वीही वाटायचं, तुला घेऊन बाहेर जावं. पण असं काही म्हटलं, तर आईने चिंगीलाही मागे लावून दिलं असतं आणि वर म्हणाली असती -तिलाही शिकू दे नवऱ्याला मुठीत कसं ठेवायचं, ते. "

"बोलला नाहीत, ते कधी?"

"माझी हिंमतच नाही व्हायची तेव्हा. उगीच सासू -सुनेत, नणंद -भावजयीत भांडणं नको व्हायला. आणि आई गेल्यानंतर तर काय, रिलेव्हन्सच नाही राहिला. पुढे पुढे तर आपलं जेवायला बाहेर जाणं, हे घरी जेवण्याएवढं नॉर्मल झालं. त्याचं अप्रूप वगैरे राहिलंच नाही. "

तेवढ्यात त्या 'शर्मिला टागोर'चा फोन आला, तर प्रवीणने तिला 'सॉरी. इम्पॉर्टन्ट मिटिंगमध्ये आहे, 'असं सांगून फोन कट केला आणि चक्क स्विच ऑफ केला.

रात्री घरी येईपर्यंत उशीरही झाला होता आणि प्रतिमा एवढ्या रोमँटिक मूडमध्ये होती, की त्यावेळी तिला मावशी-बिवशींची  आठवण होणं शक्यच नव्हतं.

दुसऱ्या दिवशी प्रवीण ऑफिसला निघाल्याबरोबर प्रतिमा मावशींकडे धावली.

"तू काही बोलायच्या आधीच, तुझा चेहरा बघूनच कळतंय, आपला प्लॅन शंभर टक्के यशस्वी झालाय, ते. "

"दोनशे टक्के, मावशी. "

"तू काल विचारत होतीस ना, तुझ्या  जागी मी असते, तर काय केलं असतं?"

"तुम्ही अशाच वागायच्यात ना, मावशी? काका किती लकी आहेत, त्यांना एवढी समजूतदार बायको मिळाली!"

"नाही गं बाई. माझ्यावर अशी वेळ आली की, मीही तुझ्यासारखीच चडफडायचे आणि त्यांच्याशी भांडून त्यांना हैराण करायचे. त्याचा त्रास अर्थात मलाही व्हायचाच. किंबहुना मलाच जास्त. कारण हे आधी तरी मजा करून आलेले असायचे. मी मात्र तेव्हाही घरात चडफडत असायचे. पण काल तुला बघितलं आणि त्रयस्थपणे विचार केला, तेव्हा माझ्या चुका माझ्या लक्षात आल्या. म्हणून मी तुला सावध केलं. "

"थँक यू, मावशी. खरंच. अगदी मनापासून आभारी आहे मी तुमची. तुम्ही आमचं नातं रिचार्ज केलं. "

"प्रतिमा, एक गंमत सांगू? आता तुमच्यापासून धडा घेऊन मीही आमचं नातं रिचार्ज करते. "

**सौ. गौरी गाडेकर -** 1/602, कैरव, जी. ई. लिंक्स, राम मंदिर रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई 400104. फोन नं. 9820206306

## मुलाखत -



सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई

# श्री. प्रताप रघुनाथ चिपळूणकर (लोकाभिमुख, कृतिशील, कृषी तज्ञ)

लोकाभिमुख, कृतिशील, कृषी तज्ञ श्री. प्रताप रघुनाथ चिपळूणकर यांची मी घेतलेली ही मुलाखत सर्वांसाठीच माहितीपूर्ण आणि उपयुक्त ठरेल अशी खात्री वाटते.

ही मुलाखत घेतांना मला एका निरक्षर आणि शेतकरी अशा कवयित्री बहिणाबाई यांच्या, गोडवा असणाऱ्या आणि वास्तव असणाऱ्या कवितेच्या ओळी आठवल्या –

**धरतीच्या कुशीमधी  बीय, बियान निजली**

**वऱ्हे पसरली माती, जशी शाल पांघरली.**

पुढे त्या असंही म्हणतात–

**कसे वाऱ्यान डोलती, दाने आले गाडी गाडी**

**दैव गेल रे उघडी, देव अजब गारोडी.**

या ओळी  ऐकतांना आपल्या डोळ्यासमोर, डोलणारं शिवार आणि त्यातून येणारं गाडी गाडी पीक, असं चित्र उभं  रहातं. अशाच धर्तीवर २०२३ साल हे ‘ जागतिक श्री धान्यवर्ष ‘ म्हणून घोषित झालं आहे. अनादी काळापासून भारतभूमी आपल्याला अनंत हस्ते धनधान्य देत आली आहे. त्यावर अनेक प्रयोग आजही होत आहेत.

– तर असे शेतीत प्रयोग करणारे, संशोधन करणारे, अनेक अनुभवातून नवीन शोध घेणारे, पुण्याच्या कृषी विद्यापीठातून कृषी पदवीधर झालेले, कोल्हापूर येथील श्री प्रताप रघुनाथ चिपळूणकर यांच्याशी गप्पा मारता मारता त्यांच्या कार्याचा जो जवळून परिचय झाला तो या लेखातून सर्व वाचकांसाठी सादर करत आहे.

प्रथम मी त्यांना या क्षेत्रात मिळालेले पुरस्कार सांगू इच्छिते. त्यावरून त्यांचा अभ्यास आणि संशोधन याविषयी आपल्याला उपयुक्त अशी माहिती मिळेल.

१)  बळीराजा मासिक, पुणे, लेखन पुरस्कार- हा दोन वेळा मिळाला आहे.

२) जलमित्र पुरस्कार. धुळे.

३) कृषी साहित्यरत्न पुरस्कार.

४) कृष्णा काव्य गुंजन मंच, सांगली.

५) प्रयोगशील शेतकरी पुरस्कार. आणि आठवे अखिल भारतीय कृषी विज्ञान केंद्र अधिवेशन, बेंगलोर (2013) येथे आदर्श शेतकरी पुरस्कार.

६) ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी पुरस्कार.

७) पैसाफंड शेतकरी सहकारी बँक, हुपरी– आदर्श शेतकरी पुरस्कार.

८) शेतकरी राजा पुरस्कार - ग्रामीण साहित्य मंच, जिल्हा कोल्हापूर.

९) एबीपी माझा- कृषी पुरस्कार.

१०) वसंतराव नाईक ग्रामीण विकास प्रतिष्ठान, मुंबई.

११) कोल्हापूर ' सकाळ ' प्रयोगशील शेतकरी पुरस्कार.

१२) महाडिक कृषी प्रदर्शन पुरस्कार --प्रयोगशील शेतकरी.

१३) छत्रपती संभाजी राजे कृषी पत्रकारिता लेखन पुरस्कार.

१४) कृषी लेखन साठी किसान सवयी.

असे छोटे-मोठे बरेच आणखी पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. याशिवाय गेली चार वर्षे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे 'अधिसभा सदस्य' म्हणून शेती विभागातून त्यांची राज्यपाल पुरस्कृत निवड झाली आहे.

नुकताच 20 मे 2022 रोजी एस. आर. टी. तर्फे "शून्य मशागत शेती तंत्राबद्दल" पुणे येथे "जीवन गौरव" पुरस्कार प्राप्त झाला आहे.

आपण त्यांचे पुरस्कार ऐकले. आता आपण त्यांच्याशी गप्पा मारुया. -----

प्रश्न--- प्रथम मला असं विचारावस वाटतं की, तुम्ही कोल्हापूरसारख्या मोठ्या शहरात रहात असताना, शेती या विषयाकडे कसे काय वळलात?

प्रतापराव--- शेती हा पारंपारिक व्यवसाय नसतानाही, वडिलांनी नवीन शेती व्यवसाय सुरू केला. वडिलांची इच्छा अशी की, मुलांनी कृषी विषयी शास्त्रीय शिक्षण घेऊन शेती करावी. काही अंशी आवड निर्माण झाली होती. त्यामुळे कृषी महाविद्यालय पुणे येथून पदवीधर होऊन परत आलो. आणि शेतीला सुरुवात केली. (1990). आवडीचे रूपांतर प्रयोगशीलतेकडे व्हायला लागले. त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, एका कृषी शिक्षण घेतलेल्या मित्राकडे, या विषयावर ग्रंथालय होईल इतकी पुस्तके होती. ग्रंथवाचनाच्या आवडीला खत पाणी मिळालं. आणि तो एक छंद झाला. भरपूर वाचन झालं.

प्रश्न---- अनुभव नसताना तुम्ही हा व्यवसाय सुरू केला, तेव्हा तुमच्या शेतीची परिस्थिती कशी काय होती? काही अडचणी होत्या का ?

प्रतापराव---- कृषी महाविद्यालयीन शिक्षण आणि प्रत्यक्ष व्यवसाय यामध्ये खूप अंतर असतं. त्यावेळेला माझी सर्वात मोठी कठीण परीक्षाच होती, असं म्हणायला हरकत नाही. काही अंशी कर्ज असल्याने प्रचंड आर्थिक ओढाताणीतच सुरुवात झाली. थोडी मानसिक चलबिचल झाली. पण अडचणीतून पार पडतानाच माणूस बरंच काही शिकतो, असं म्हणून त्याचा एक आव्हान म्हणून स्वीकार केला. आणि मग कृषी शिक्षण घेतलेल्या शास्त्राचा अवलंब करायला सुरुवात केली. हळूहळू  सावट दूर झालं. कर्जफेडही झाली.

प्रश्न--- कर्जाची परतफेड झाल्यानंतर उत्साह आला असेल ना ? पुढे प्रगती कशी कशी होत गेली ?

प्रतापराव--- कर्जाची परतफेड तर झालीच. उलट आनंदाची गोष्ट म्हणजे, पंधरा-वीस वर्षात आणखी नवीन बरीच गुंतवणूक केली. शेती उत्पादन उत्तम यायला लागलं. आपण यशस्वी झाल्याचा आनंद झाला. पण तो आनंद फार काळ टिकला नाही. कारण काही काळाने उत्पादन पातळी हळूहळू घसरायला लागली. पुन्हा आपली परीक्षा चाललीय असं वाटायला लागलं. उत्पादनाची पातळी कमी का होतीय, याचा शोध घेण्याच्या वाटचालीत, जमिनीतील सूक्ष्म जीवांच्या कामकाजामुळे शेती पिकते याचा शोध लागला. सूक्ष्मजीव पहिल्यासारखे काम का करत नाहीत ? यावरील उपायांचा विचार सुरू झाला. ही वाटचाल करत असताना, भू - सूक्ष्मजीवशास्त्र या विषयाची खूप मदत झाली. आणि लक्षात आलं की सूक्ष्मजीवांची खाद्याची योग्य तरतूद झालेली नाही हे नक्की.

प्रश्न---- सूक्ष्मजीवांच्या खाद्याची तरतूद करायची म्हणजे काय करायचं?

प्रतापराव--- सूक्ष्म जीवांचे खाद्य म्हणजे सेंद्रिय कर्ब, अशीच विचारधारा सर्वत्र होती. पारंपारिक सेंद्रिय खत व्यवस्थापन आणि त्यातील मर्यादा यांचा अभ्यास केला. आणि लक्षात आले की, या मार्गाने गरजेइतका सेंद्रिय कर्ब कधीच पुरवणे शक्य होत नाही. मग नवीन मार्गाचा शोध घ्यायला सुरुवात केली. प्रयोग करत राहिलो. आणि 'पशुपालनातून जमिनीची सुपीकता' हा विषय कालबाह्य झाल्याचे मनाने पक्के ठरविले. आजही या विषयात भरपूर संशोधन झालं आहे. ग्रंथ संपदाही भरपूर उपलब्ध आहे. दहा पंधरा मोठ्या ग्रंथांचा मी अभ्यास केला. आणि शेतीला एक नवीन दिशा दिली.

प्रश्न--- असे ग्रंथ दिशादर्शक असतील तर त्याचा वापर सर्वसामान्यपणे कितपत केला जातोय ? त्याचा वापर का केला जात नसावा?.

प्रतापराव--- हे ग्रंथ म्हणजे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संदर्भ ग्रंथ- असेच त्याचे स्वरूप झाले आहे. खरंतर शेतीत प्रगती करण्यास ते खूप उपयोगी आहेत. तरीही जगभरातील कृषी शिक्षण अभ्यासक्रमात आजही त्याचा समावेश नाही. कारण या शास्त्राने शिकविलेले नवीन विषय हे प्रचलित विचारसरणीच्या पूर्णपणे विरुद्ध विचारसरणीचे आहेत. त्यामुळे परंपरागत शेतकऱ्यांना ते स्वीकारणे अडचणीचे वाटते. पण माझा अनुभव असा की, या ज्ञानाने माझे शेतीतील जवळपास सर्व प्रश्न सोडवले. आणि खूप फायदा झाला. गळ्याबरोबर गाळात बुडालेल्या मला या ज्ञानाने  परत स्थिरस्थावर केले.

प्रश्न--- यापुढची तुमची नवीन संशोधनाची वाटचाल कशी सुरू झाली आहे?

प्रतापराव__आमच्या शेतात आम्ही ऊस आणि  भात ही पिके घेतो. ऊस तोडून झाल्यानंतर त्याची पाने जागेलाच कुजविण्याचे प्रयोग केले. पण सुपीकतेत फारसा फरक पडला नाही असे दिसले. म्हणून जमिनीखालील अवशेष  कुजवून त्याचे खत करण्याचा निर्णय घेतला.

प्रश्न-----जमिनीखालील अवशेष कुजवणे- म्हणजे ती पद्धत कशी काय आहे ?

प्रतापराव-----जमिनीखालील अवशेष कुजविण्यासाठी ऊस आणि भात ही पिके आलटून पालटून, (जमीन न नांगरता) घेण्याचा निर्णय घेतला. आणि आश्चर्य म्हणजे उत्पादन पातळी 50% वाढली. सेंद्रिय खत तयार करण्यासाठी जमिनीखालचा भाग सर्वात चांगला, हा नवीन शोध लागला. (2005 साली). बिना नांगरणीने शेती जास्त चांगली पिकते. तसेच तणनाशकाच्या द्रावणात काळे मीठ वापरल्यास कार्यक्षमता वाढवून 25 ते 30 टक्के ते कमी पुरते. शास्त्रीय जगतात असा संदर्भ कोठेही सापडणार नाही. पण हा माझा स्वतःचा अनुभव आहे. या शोधामुळे शेतीत नांगरणी बंद केली.

प्रश्न-----काँझर्वेशन ॲग्रीकल्चर म्हणतात ती हीच का?

प्रतापराव-----हो बरोबर. कमीत कमी संसाधनांचा वापर करून केलेली शेती तीच ' कॉन्झर्वेशन ॲग्रीकल्चर ' म्हणजेच मराठीत ‘ संवर्धित शेती ‘ असं म्हटलं जातं.

प्रश्न-----सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशा काही पर्यायांचा आपण विचार केला आहे का ?

प्रतापराव----हो नक्कीच. नवीन पर्याय शोधत असताना काही बंधने  घालून घेतली. शक्यतो उत्पादन बाजारातून आणावे लागू नये, वाहतुकीचा खर्च करावा लागू नये, कमीत कमी मजूर, यंत्र, पैसे, (खर्च ) वेळ, आणि  सुलभता याचा विचार केला. नांगरणी, सेंद्रिय व्यवस्थापन यावरचा खर्च शून्य किंवा कमी म्हणजे, पूर्वी एक रुपयात होणारे काम आता 50 पैशात होत असेल तर तेथे न थांबता, ते 25 पैशात कसे करता येईल, याचा प्रत्येक खर्चाच्या बाबतीत शोध घेण्याचा अभ्यास सुरू आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती आली तरी नुकसान पातळी कमी होते. फक्त जमिनीची सुपीकता वाढत जाते.

प्रश्न----तुम्ही अभ्यास आणि संशोधन करून मिळविलेल्या ज्ञानाचा प्रसार कशा पद्धतीने करता?

प्रतापराव----हे  तंत्र सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे असे मनोमन वाटते. हेच तंत्र केवळ ऊस आणि भात शेती बरोबर कोकणातील वरई, नाचणी, तसेच घाटावरील ज्वारी, बाजरी, अगदी भाज्यांसाठी सुद्धा उपयुक्त ठरले आहे. या तंत्राचा सर्वांना उपयोग व्हावा म्हणून आकाशवाणी, दूरदर्शनवरून व्याख्याने दिलेली आहेत. दैनिक ॲग्रोवन, तसेच कृषी विषयावरील मासिके, नियतकालिके, मेळाव्यांमधून मार्गदर्शन, इत्यादी मार्गाने सातत्याने लेखन करत असतो. किरकोळ अपवाद वगळता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात वावर करण्याची मला संधी मिळाली. सध्या कोरडवाहू शेतीतील अशाश्वतता कमी करून शाश्वत शेतीत रूपांतर करण्यासाठी काय काय करता येईल यावर प्रयोग चालू आहेत.

प्रश्न---हे सर्व करत असताना, त्यात तुमच्या पत्नीचा व इतरांचा वाटा कितपत असतो?

प्रतापराव----पत्नीला अर्धांगी म्हणतात ते खरं आहे. माझी पत्नी उज्वला हिचा यामध्ये खूप मोठा वाटा आहे हे आवर्जून सांगावेसे वाटते. मुलगा ऋषिकेशही हाच व्यवसाय आनंदाने सांभाळतोय. एकत्र कुटुंब असल्याने, सर्वांचा सहभाग नक्कीच आहे. दर्जेदार असा रसायनविरहित गूळ, काकवी, बासमती तांदूळ याची विक्री करण्याचे काम सर्वजण करतात.

प्रश्न-----तुमच्या संशोधनाबद्दल तुमचे लिखाण चालू आहे असे तुम्ही म्हणालात. तसेच अनेक पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत, ती कोणती त्याबद्दल थोडे सांगाल का ?

प्रतापराव----प्रत्येक नवीन तंत्रज्ञानानुसार मी पुस्तक लिहीत गेलो. ती अशी–

१) जमिनीची सुपीकता--- या पुस्तकामध्ये जमिनीची सुपीकता फुकटात मिळविण्याचे मार्क सांगितले आहेत.

२)  शून्य मशागतीची शेती--- यामध्ये नांगरणी विना, बैल, ट्रॅक्टर अशा संसाधनाऐवजी सूक्ष्मजीव मशागत फुकटात व चांगली  कशी  याचा अनुभव आहे.

३) कमी खर्चाची ऊस शेती----प्रत्येक खर्च कमी करून उत्पादन जास्त आणि दर्जेदार कसे मिळवावे याबद्दलची माहिती या पुस्तकात दिली आहे.

४) उसाचे शरीर शास्त्र----उसात साखर कमी तयार होते याचा अभ्यास केल्यास, खर्चात बचत आणि अधिक उत्पादन कसे घेता येईल याची माहिती आहे.

५) तण  देई  धन. -----शेतकऱ्यांमध्ये  ' तण  खाई धन ' अशी म्हण आहे. पण शेतीत तणासारखे, धन देऊन मदत करणारे दुसरे संसाधन नाही असे मी म्हणतो.

६) फायदेशीर भात शेती----मजुरांअभावी भात शेती कठीण झाली आहे. रोप चिखलणी, लावणी बंद करून थेट टोकन पद्धतीने भात शेतीबद्दल या पुस्तकात सांगितले आहे.

७) चिपळूणकर तंत्रज्ञान---- हे तंत्र फळबागांसंबंधी कसे वापरावे, यावर प्रबोधन केले आहे.

– आता आठवे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर आहे..

प्रश्न---कृषी व्यतिरिक्त आणखी काही अभ्यास केला आहात का?

प्रतापराव----कृषी या विषयाव्यतिरिक्त योगोपचार, तसेच ॲक्युप्रेशर उपचार पद्धती याचाही अभ्यास केला आहे.

प्रश्न----आता आपण शेवटच्या प्रश्नाकडे वळूया. तुम्ही सर्वसामान्य शेतकऱ्यांना काय सल्ले द्याल किंवा देता?

प्रतापराव----मी अनेक ठिकाणी व्याख्यानांना जातो. तेथे सांगतो की, ’ तुम्ही कोणत्याही क्षेत्रात जा. त्यातील उच्च तंत्रज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. अभ्यास हा शालेय  किंवा महाविद्यालयीन अभ्यासक्रमाबरोबर संपत

नाही. सतत विद्यार्थी राहून कालसापेक्ष सुधारणा स्वीकारण्याची प्रवृत्ती ठेवायला हवी. शेतीमध्ये अनेक अडचणी येतच राहणार. त्याचा शोध घेतल्यास उत्तर सापडू शकते. निराशा  ही जाण्यासाठीच आलेली असते. त्यासाठी सर्जनशील राहायला हवे. केवळ सरकारला दोष देत राहणे खरे नाही. शेतीमध्ये शाश्वतता आली की, अनेक समस्या सुटू शकतील.

भारतमाता भरभरून अन्नधान्य देत आली आहे. अशीच आणि याहीपेक्षा जास्तच देत राहू दे, अशी प्रार्थना करूया.'

– धरणीमाता ही वात्सल्याने सर्व भूतमात्रांना प्रेरणा आणि ऊर्जा देते. बळीराजा अन्नधान्य पिकवतो. म्हणून तर तुमचे आमचे दिवस आनंदाने उगवतात, आणि समाधानाने मावळतात.

आज आपल्याला श्री प्रताप रघुनाथ चिपळूणकर या कृषी संशोधकांनी कृषी विषयी खूप खूप आणि छान माहिती दिली आहे. त्याचा सर्वांना निश्चितच उपयोग आणि फायदा होईल यात शंका नाही. तेव्हा त्याबद्दल आपण त्यांचे शतशः आभार मानूया. धन्यवाद.

त्यांच्याशी जर कोणाला संपर्क साधावयाचा किंवा शंका विचारायच्या असतील तर त्यांचे मोबाईल नंबर मुद्दाम इथे देत आहे –

**श्री प्रताप चिपळूणकर - ८२७५४५००८८.**

**सुश्री उज्वला चिपळूणकर - ८२७५४५००८०.**

**सौ. पुष्पा नंदकुमार प्रभुदेसाई -** बुधगावकर मळा रस्ता, मिरज. मो. ९४०३५७०९८७



## नाटिका - दिव्या दिव्या दीपत्कार



सौ. दीपा नारायण पुजारी

दिपू : अगं, तेजूदी, अगं थांब थांब. थांब जरा.

तेजू : नाही हो, मी मुळीच थांबायची नाही.

दिपू : कसली ग एवढी घाई तुला?

तेजू : कसली काय विचारतेस? अगं, दिवाळी नाही का आली? सगळा आसमंत उजळून नको का टाकायला? घरोघरी प्रकाश देऊ. चल चल तू पण चल बरं लवकर.

दिपू : हो... शेवटी माझी आठवण झाली म्हणायची.

तेजू : वा ग वा! तुला कशी विसरेन मी? आणि कुणाला विसरु देणारही नाही.

दिपू : तू नाही ग विसरणार मला. पण तुझा वेग मला नाही हो झेपायचा.

तेजू : अगं, तुझ्याशिवाय मी अपूर्ण आहे. अपूर्ण नाही, माझं अस्तित्वच मुळी तुझ्या वर अवलंबून आहे.

दिपू : अगदी असंच काही नाही बरं. या जगात तूच तर पहिले आलीस. माझा जन्म तुझ्यानंतरचा. त्याअर्थी तूच माझी ताई, हो ना?

तेजू : हो ग बाई हो. माणसाला माझाच शोध आधी लागला. माझ्यातील ऊर्जेनं मला स्वस्थ बसूच दिलं नाही.

दिपू : बाई बाई काय ती एनर्जी!! खरं तर तेजूदी, माणसाला तुझा शोध लागला असं म्हणणं जरा चुकीचंच ठरेल हं. तुझ्यातल्या प्रखर उष्णतेमुळे तुला लपता येतच नव्हतं.

तेजू : माणसानं मला जंगलातून गुहेत आणलं हे खरं ना? त्याच्या बुद्धीला सलाम केलाच पाहिजे. ऊर्जा कोठे ठेवायची

हे त्याला काही कळत नव्हतं. पण मग त्यानं दगडाची खोलगट ऊखळी केली. मी तिथं राहू लागले.

दिपू : नंतर मातीला आकार देता येतो हे त्याला कळलं. आणि माझा जन्म झाला.

तेजू : हो. तेव्हा पासून आपली जोडी जमली ती आजतागायत. काय ग तू किती रुपं बदललीस? किती वेष धारण केलेस? अगदी कोटी कोटी रुपे तुझी.... what a flexibility !!!

दोघी एकमेकींना टाळी देऊन हसतात.

दिपू : माझं तेव्हाच नाव होतं पणती. but don't tell me हं! तू काय कमी नखरे करतेस? तूही तेवढीच flexible आहेस. म्हणून जोडी टिकून आहे आपली. बाकी आपलं जोडनाव झकास आहे नै? दीपज्योती!!

तेजू : पणती ते इलेक्ट्रिसिटी ते ऑप्टिक फायबर आणि सध्याचं नॅनो तंत्रज्ञान असा हा प्रवास. या सगळ्यासाठी माणसाच्या बुध्दीलाच नमस्कार.

दिपू : हो नं.... तुला आठवतं ; कशा होतो आपण आपल्या भूतकाळी? बाई ग ऽ ऽ.. काय तो धू ऽ ऽ र.. ती काजळी... चिक्कट चिक्कट तेलकट मिचमिचीत अंग...

तेजू : कोणासमोर जायची म्हणून सोय नव्हती.

दिपू : या माणसांनी मात्र आपला भाव ठेवला हं टिकवून. चाकाचा शोध लागला. लहानमोठ्या आकारात मी दिसू लागले. नक्षीकामानं सजले. चरबीची जागा तुपानं, तेलानं घेतली.

तेजू : तुला माहितेय; धातूच्या दिव्यांचा शोध सत्तर हजार वर्षांपूर्वी लागला.

दिपू : हो ना! त्यापूर्वी दगड, माती वापरून पणती केली जाई. अगं, आणि गंमत म्हणजे त्याहीपूर्वी शिंपल्यांचा वापर देखील केला जाई बरं दिवे लावण्यासाठी!!

(पणती स्वतः शीच हसते. )

तेजू : काय गं, हसलीस ते!

दिपू : काही नाही गं. असंच आठवलं बघ; एक आजी तर दिवाळीत पणत्या आणायला नको म्हणून घरातल्या डब्यांच्या खोलगट टोपणातच मला नटवत.

तेजू : वेदांमध्ये, पुराणांमध्ये, रामायण महाभारततातही काही प्रकारच्या दिव्यांचा उल्लेख केला गेला आहे.

दिपू : हो, म्हणजे थोडक्यात काय.. ज्योत महत्त्वाची, प्रकाश महत्त्वाचा!! तो कोणत्या दानीतून बाहेर पडला हे काही महत्वाचं नाही.

तेजू : झालं का तुझं सुरू.... ( मान मुरडून लवलवते).. तर मुद्दा काय होता.. धातूचा शोध लागल्यावर चांदी, पितळ, कासे आणि बरं का, सोन्यापासूनही दिवे बनवले जाऊ लागले.

दिपू : हो गं. सोळाव्या सतराव्या शतकाच्या सुरुवातीस आकारानं दिवे लहान होते. उजेड दूरवर जाण्यासाठी ते स्टॅण्डवर ठेवू लागली माणसं. त्याला दिवठाण म्हणत असत. हळूहळू त्यावर कोरीव काम केलं जाऊ लागलं. आणि मग दिमाखदार समईचा जन्म झाला.

तेजू : तरीही पणती या नावानं आजही घराघरात, तुळशीवृंदावनासमोर दिवा लावला जातो. दिव्या दिव्या दिपत्कार..              असं म्हणत.

दिपू : हो, बरोब्बर! यानंतर बहुधा निरांजनाची निर्मिती झाली असावी. तुपाचा दिवा आणि देवघर... शांत, प्रसन्न प्रकाश देणारं निरांजन, थोडक्या वेळासाठीच, तरीही वेगळी वातावरण निर्मिती, श्रध्दा भाव निर्माण करतं.. नकळतच नतमस्तक होतं कोणीही.

तेजू : पूर्वीच्या काळी एखाद्या लढाईला जाताना किंवा विजयी होऊन आल्यावर कुरवंडी करण्यासाठी निरांजनच वापरली जात असत.

दिपू : हॅलो, आणि बरं का गं, आजही बर्थडेला केक कापला, मेणबत्त्या फुंकल्या तरी औक्षणाचं महत्त्व देखील टिकून आहे हं!

तेजू : अगदी लाखाचं बोललीस बघ. भारतीय संस्कृतीत दिव्यांना खूप महत्त्व आहे. अनेक मंगल कार्यात, देवदेवतांच्या पूजेवेळी दिव्यांची पूजाही केली जाते.

दिपू : अगं मंगल कार्यात तर आहेच; झालंच तर सण समारंभामध्ये दिव्यांचा दिमाख काही औरच असतो नाही?

तेजू : तशी ही माणसांची जात उत्सवप्रिय हं! आपल्यासाठी सुद्धा एक सण साजरा केला जातो. दिव्याच्या अमावस्येला आपला खास सण साजरा करतात.

दिपू : हो ना! काय तो थाटमाट!! लाल पाट, रांगोळी, फुलांची सजावट, गूळ खोबऱ्याचे कानोले !! अगदी आनंदी आनंद!!

तेजू : बाळाच्या आगमनाप्रित्यर्थही देवापाशी समई लावली जाते. (लहान आवाजात )- मृत्यूनंतर सुध्दा घरात पणती लावली जाते. गेलेल्याचं अस्तित्व इतकं सहज पुसता येत नाही. पणतीच्या रुपात, दिव्याच्या रुपात त्या व्यक्तीला एक प्रकारे आदरांजली वाहिली जाते.

दिपू : अहं! अशी इमोशनल होऊ नकोस बाई. अगं, आत्ताच तू समई म्हणालीस ना? मी तिला दिव्यांची महाराणी म्हणते. तिची मिजास सुरवातीपासूनच राजमहाल, राजवाडे, त्यातील दिवाणखाने, शय्यागृहं.. अश्याच ठिकाणी !

तेजू : हो हो, समई भक्तीभावानं देवळात, मंदिरात देखील तेवते बरं, विसरलीस की काय? बाळाबाई, तुला माहित आहे? समईमध्ये तेल घालतात त्या भागाला काय म्हणतात?

ज्योती : मला नाही माहित. तूच सांग तेजूदी

तेजू : त्या भागाला चाडा म्हणतात. त्या खोलगट भागाच्या मधोमध कलश, घुमट तर काही वेळा मोर, लक्ष्मी यांचं कोरीव नक्षीकाम केलेलं असतं.

दिपू : आ हा हा! काय तो तोरा!! पितळी समयांचा तो रुबाब! त्यांचा तो डौलदार घाट. अगदी एवढुशा वितभर उंचीच्या असोत वा दहा पंधरा फूट उंच असोत, त्यांनी नजरबंदी झालीच पाहिजे.

तेजू : कधी त्या हत्तीवरून येतात, कधी कासवाच्या पाठुकली बसतात, हसून म्हणते, परवा अगं... म्हणजे, गणेशोत्सवात उंदरांच्या हातात समई, पणती बघितली मी.

दिपू : उंदीरमामाच्या हातात? (ती ही हसते.) धन्य आहे या माणसाची!!

तेजू : बाकी काही म्हणा, त्याच्या या कलागुणांमुळेच एक वेगळा, नाविन्यपूर्ण आविष्कार तयार झाला.. लामणदिवा.

दिपू : समईचं प्रतिरूप जणू! पण थोडासा बसका, लहानसा असतो हं हा दिवा. छानशा साखळीनं देवघरासमोर टांगला जातो हा दिवा. काय भारी वाटतं ना!

तेजू : निरांजन, समई जसे आले तसं एकच ज्योतवाल्या पणतीचं रूप बदलत गेलं हं. तिला अनेक ज्योती मिळाल्या. आता ती झाली पॉलीज्योती!! दे टाळी !

(दोघी एकमेकींना टाळी देतात.)

दिपू: जसा घरातल्या देवघरात लामणदिवा आला तसा देवळात नंदादीप तेवू लागला. प्राचीन काळी नंदादीप दगडी असे. दगड कोरून तो बनवला जाई. नंदादीपाच्या प्रकाशात मंदिरातील गाभारा कसा शांत वाटे आणि मूर्तीही प्रसन्न दिसे.

तेजू : अरे, हो हो.. मला आधी सांग दिव्यांचे प्रकार आहेत तरी किती?

दिपू: दोनशे पन्नास

तेजू: क्क.. क्क.. क्काय?

दिपू : हो हो दोनशे पन्नास. त्यांची नावं देखील खूप सुंदर आहेत बरं. गणेश दीप, दीपवृक्ष, अर्चना दीप, कुबेर दीप..

तेजू : थांब थांब थांब. मला आठवली काही.... कामाक्षीदीप, कृष्णदीप, दीपस्तंभ, दीपलक्ष्मी.

आजही दक्षिणेकडील देवळात हे दिवे दिसतात. ओरिसातल्या मंदिरात देखील दिसतात.

दिपू: भारतीय दिव्यांची जडणघडण विविध संप्रदायांशी जोडलेली दिसते. उदा. शैव संप्रदायी म्हणजे शीवसंप्रदायी दिवे शाळुंका, नंदी, नाग यांच्या आकारांचे असतात. वैष्णव संप्रदायी दिव्यांमध्ये शंख, चक्र, गदा, पद्म गरूड, गजलक्ष्मी इ. प्रतिकृतींचा वापर केलेला आढळतो. गाणपत्य संप्रदायी गणपती, गज, मूषक सर्प, शिवलिंग, ऋध्दिसिध्दि अशा प्रतिमा दिवे बनवताना करतात.

तेजू: यानंतरचा टप्पा म्हणजे तुला माझ्यासकट काचेच्या महालात ठेवण्यात आलं.

दिपू : आपल्याभोवती पितळेचा किंवा धातूचा महाल बांधण्यात आला. त्यामुळं वाऱ्यापासून संरक्षण मिळालं बरं! चिमणी, दिवटी, कंदील, बत्ती, हंड्या, झुंबरं.. अशा अनेक रूपात तेजूदी आपण सजलो. कधी झोपडीतला अंधार नष्ट करतो, कधी महाल, दिवाणखाना सुशोभित करतो. तर कधी वराती, मिरवणुकीत सहभागी होतो. धगधगत्या मशाली होऊन स्फूर्ती देतो.

तेजू : छोटुली आहेस तू. एवढुशी असलीस तरी माझ्यापेक्षा जास्त माहिती आहे की तुला. सांग बरं आता या जगात माणसांसाठी आपल्या दोघीत कोण श्रेष्ठ?

दिपू : शू... शू .... अगं बोलू नकोस... त्या बघ तिथं तुळशीसमोर त्या आजी दिवा लावतायत. त्यांची गोड नातंही आहे. आपण त्या त्यांच्या गप्पा ऐकू.

छोटी : ग्रॅनी, काय गं हे तुझं- रोज रोज तुळशीसमोर दिवा लावायला सांगतेस?

आजी : नुसता दिवा नाही, शुभंकरोती म्हणायची आहे हं. तुझे ते ट्वेंटीपर्यंतचे टेबल्स म्हणून दाखवायचे आहेत.

छोटी : नाही हं ग्रॅनी, मी नाही जा. मला तो कार्टून शो बघायचाय. अंगणात लाईट तर लावलाय. डॅडनं लाईटच्या माळा लावून डेकोरेट केलंय. तो बघ टेरेसवर उंच कसला लॅंटर्न टांगलाय. मग पुन्हा ती एवढुशी पणती कशाला?

आजी : वेडाबाई, दिवाळी आहे ना. म्हणून रोषणाई केलीय तुझ्या बाबांनी. आणि तो साधासुधा लँटर्न नाही बाळा, त्याला आकाशकंदील म्हणतात.

छोटी : आकाशकंदील?

आजी: हो, ये बघू आता; आपण पणत्या लावूया. मग मी या लाडोबाला पणतीची, दिवाळीची स्टोरी सांगेन.

छोटी: स्टोरी!! ग्रॅनी I also want chakali and ladoo !!

(छोटी उड्या मारत, टाळ्या वाजवत म्हणते)

आजी : हो हो, द्यायचा ना- सगळा खाऊ देणार माझ्या बाळीला. पणत्या लावूया आणि मग करूया फराळ. बघ तरी या ज्योती. अगं, बघ कसं शांत वाटतंय. नमस्कार कर आणि आता त्या लाईटच्या दिव्याकडं बघ बरं.

छोटी : (नमस्कार करते लाईटकडं बघून हात डोळ्यांवर घेते. डोळे बारीक करते. त्या लाईटकडं बघताना डोळ्यांना त्रास होतो आजी. ( ग्रॅनीच्या जागी आजी हाक ऐकून, आजी गालात हसते)

आजी: हो ना, म्हणूनच या शांत प्रकाशात थोडा वेळ बसायचं. शुभंकरोती म्हणायची. टेबल्स ज्याला पूर्वी परवचा म्हणत बरं का, म्हणायचा.

छोटी आजीच्या मांडीवर बसते. हात जोडते. शुभंकरोती म्हणू लागते.

**"दिव्या दिव्या दिपत्कार**

**कानी कुंडल मोती हार"**

तुळशीवृंदावनाच्या देवळीतली ज्योत मंद, शांत, पवित्र प्रकाश पसरवत राहते. तिचं तेजस्वी, ओजस्वी रूप इवल्याशा मातीच्या पणतीतून ओसंडत राहतं.

**"तिळाचे तेल कापसाची वात**

**दिवा जळू दे सारी रात ..... "**

**सौ. दीपा नारायण पुजारी -** इचलकरंजी मो 9665669148 ईमेल deepapujari57@gmail.com

## लेख - अनुभवांची दिवाळी



**सुश्री प्रभा सोनवणे**

महाराष्ट्र साहित्य परिषदेत एक मिटींग होती एका कार्यक्रमाच्या संदर्भात.... ती मी साफ विसरून गेले होते... कोल्हापूरहून भाची आली होती पुण्यात, म्हणून भावाकडे जायचं होतं ! मग लक्षात आल्यावर, मिटींग आटोपल्यावर तिथून परस्पर भावाकडे विमाननगरला जायचं ठरवलं... काही केल्या टिळक रोडवर रिक्षा मिळेना.. बरोबर असलेली मैत्रीण "ओला"ची रिक्षा बोलवून गेली सुद्धा ! ते "ओला" प्रकरण मला फारसं जमत नाही... म्हणताना रिक्षा बघत बघत नारायण पेठेत पोहोचले. तिथे रिक्षा मिळाली.

रिक्षाचालक म्हणाला, " मीटरपेक्षा वीस रूपये जास्त द्यावे लागतील " रिक्षा मिळतच नव्हती, हा यायला तयार झाला हेच खूप झालं ! एकतर पाऊस रिमझिमत होता... घरातून बाहेर पडताना लख्खं ऊन होतं..... क्षणात येते सरसर शिरवे.... हा तर श्रावण महिना ! राखी पौर्णिमेनिमित्त आम्ही सर्वजण एकत्र येणार होतो... सात आठ महिन्यांपूर्वी धाकट्या बहिणीशी काही तात्विक मतभेद झाले होते. माझी भाची अपर्णा आदल्या दिवशीच म्हणाली होती, “आत्त्या तुम्ही दोघी बोलत नाही हे चांगलं नाही वाटत. तुमच्यामधे जे काही झालंय ते सोडून द्यायचं !” तिने धाकट्या आत्याला पण बोलवलं होतं, हे मला माहित नव्हतं ! माझ्या वहिनीने आणि भाचीने ही निर्माण झालेली तेढ मिटवण्याचा प्रयत्न केला. आम्ही राखी पौर्णिमेचा सोहळा खूपच सुंदर साजरा केला ! मेंदी, पक्वान्नांचं जेवण, औक्षण, रक्षाबंधन.... आणि या सगळ्याचा विडिओ या आठवणी जपण्यासाठी !

आयुष्य जगत असताना, प्रत्येक नात्यात मतभेद होतच असतात. जिने दोन्ही आत्यांमधे समझौता घडवून आणण्याचा प्रयत्न केला त्या माझ्या भाचीच्या लग्नाच्या वेळेस माझे भावाशी संबंध इतर नातेवाईकांनी पसरवलेल्या गैरसमजांमुळे बिघडले होते... आणि त्यावेळेस कुणीही आमच्यातली तेढ मिटवण्याचा प्रयत्न केला नाही. उलट काही नातेवाईक माझ्या डायनिंग टेबलवर बसून जेवताना माझ्या भावा- वहिनीच्या विरोधात मला भडकावून देत होते, त्यांचं माझ्याशी बिनसल्यावर माझ्या भावाकडे जाऊन मी जे काही बोलले नाही ते वाईट साईट सांगून मेजवान्या झोडत होते.

असे प्रकार आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात घडत असतात आणि आपण ज्यांना वडिलधारे समजत असतो अशीच माणसे आपल्याबद्दल गैरसमज पसरवित असतात, अपशब्द वापरत असतात. परस्परसंबंध चांगले असावेत पुढच्या पिढ्यांमध्ये सामंजस्य असावं, असे प्रसत्न आमच्या आधीच्या पिढीतल्या लोकांनी कधीच केले नाहीत. अपर्णा.. माझी भाची आमच्या पुढच्या पिढीची. म्हणूनच तिच्यातल्या या प्रगल्भ जाणिवेचं कौतुक वाटलं !

खरंतर अलीकडच्या काळात राखीपौर्णिमेला भाऊ माझ्याकडे यायचा आणि भाऊबीजेला मी त्याच्या घरी जात असे... पण राखीपौर्णिमेला वहिनीने सांगितले, भाऊबीजेलाही असंच एकत्र यायचंय सगळ्यांनी मला आयुष्यातल्या प्रत्येक बिकट प्रसंगी माझ्या वहिनीने साथ दिली आहे.

जगरहाटी, मनुष्यस्वभाव आणि अनेक चमत्कृतीपूर्ण आयुष्य या सा-यातून "कम्फर्ट झोन" निवडणं आणि त्यात जगणं अवघडच ! तरीही नाती जपण्याचा आपला प्रयत्न– केवळ नात्यातच नाही तर मैत्रीतही असे प्रकार घडत असतात. भावाकडे असतानाच एका मैत्रिणीचा फोन आला - एका सिनियर मैत्रिणीला मी एक घटना सांगितली नव्हती आणि तिनं बिनदिक्कत माझं नाव घेतलं " मला प्रभाने सांगितलं "

मी लगेचच त्या मैत्रिणीला फोन केला, (मैत्रीण असली तरी वयाने मोठी असल्यामुळे मी त्यांना अहो जाहो करते) म्हटलं, " अहो मी कधी तुम्हाला ही गोष्ट सांगितली ?" मग त्यांनी दुस-या मैत्रीणीचं नाव घेतलं आणि मला बरंच गोलमाल केलं ! मग मी ज्या मैत्रीणीनं सांगितले होते तिला विचारलं तर ती म्हणाली, " बोलले असेन माझ्या लक्षात नाही " आणि नंतर बोलली असल्याचं तिला आठवलं ! ही पंधरावीस दिवसांपूर्वीच घडलेली गोष्ट होती, न आठवायला काय झालं??दोन्ही मैत्रिणी अठ्याहत्तर वर्षाच्या आहेत.... मग त्यांच्याशी मैत्री तोडायची का ? या मैत्रिणी गेली पंचवीस तीस वर्षे या अशाच स्वभावानिशी स्वीकारलेल्या !

आयुष्य म्हणजे " रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग " ! हे अनुभव येतच असतात.. वाईट अनुभवांबरोबर चांगले अनुभवही गाठीशी असतातच की. --- अपर्णाची पाच वर्षांची मुलगी श्रीजा आणि भाचा रणजितचा चार वर्षांचा मुलगा हृदवीर यांची अवतीभवतीची किलबिल आणि ते दाखवत असलेली आपुलकी या वयात सुखावणारीच!

जीवनात ही अनुभवांची होळी दिवाळी नेहमीच येत असते. आता असं ठरवलंय की या वयात फक्त अनुभवांची दिवाळीच साजरी करायची...... तसंही होळी साजरी करणं मी आता सोडून दिलंय !

कारण आयुष्याची क्षणभंगुरता आजच अनुभवली ! काल ज्या मैत्रिणीचा शाळेच्या व्हाॅटस ॲप ग्रुप वर वाढदिवस साजरा केला.... ती आज हृदयविकाराने गेली.... खूपच गोड स्वभावाची मैत्रीण होती ! कडूगोड अनुभवांची साखळी जोडत आयुष्य पुढे पुढे सरकत असतं ! ब-याचदा आपण एखाद्या गोष्टीकडे कसं पहातो यावरच आपले आनंद अवलंबून असतात. त्रासदायक माणसं आयुष्यात येतच असतात. पण ते देत असलेले त्रास आपण स्वतःला करून घ्यायचे का हे आपणच ठरवायचं ! एका ठराविक वयानंतर ही स्थितप्रज्ञता यायलाच हवी ! ती कशी मिळवायची हे ज्याचं त्याने ठरवायचं !

हे विचारमंथन गेले आठ दिवस माझ्या मनात सुरू आहे. वयाची पासष्टी ओलांडली..... हा त्याचाच परिणाम का?.... मिटींग असल्याचं विसरून जाणं... "ओला " चं ॲप हाताळता न येणं ! बाहेरची व्यवधानं सांभाळत.... नात्यांचा गुंता सोडवत जगत रहाणं!

हे आजचे नाही.... अनादी अनंत कालापासून हे चालत आलंय.... रामायण महाभारतातील कालापासून कपट कारस्थान, कुरघोडी..... या सगळ्यात कुणाचा "अभिमन्यू " होऊ नये यासाठी जपायला हवं ! अनुभवांची दिवाळी म्हणजे प्रगल्भ विचार... ती जाणीव माझी भाची--अपर्णानं नव्याने करून दिली.... कशा गोष्टी तिथल्या तिथेच सोडून द्यायच्या ! तिचं नाव मीच "अपर्णा " ठेवलंय. तिची तपस्या सफल झाली आणि...... सार्थ नाव ठेवल्याचं मलाही समाधान !

**सुश्री प्रभा सोनवणे** - “सोनवणे हाऊस”, ३४८ सोमवार पेठ, पंधरा ऑगस्ट चौक, विश्वेश्वर बँकेसमोर, पुणे 411011



श्री सुहास सोहोनी

## "कृतार्थ वारकरी"

### - (कथाकाव्य) समृद्ध वारकरी

कशा आपदा उभ्या ठाकल्या -
घडली नाही वारी -
उदास झाला वारीवंचित -
दु:ख दाटले उरी -
जाहला हताश वारकरी --- १

आषाढीचा वेध लागता -
भार्येसंगे नित्यची जाता -
यात्रेचा परिपाठच होता -
चुकली नाही कधी आजवर
पंढरीची वारी -
जाहला उत्सुक वारकरी --- २

वर्षामागून वर्षे सरली -
ओढ तरी ना अजुन संपली -
वृद्ध पाऊले दुबळी झाली-
कैसे होते दर्शन आता
चिंता दाटे उरी-
जाहला सचिंत वारकरी --- ३

बधिर चित्त परि अधिर दर्शना -
हुरहुर मनीची स्वस्थ बसेना -
उतावीळ मन घरी रमेना-
पडशीत टाकून टाळ नि चिपळ्या
पोथी जीर्ण तरी -
जाहला आतुर वारकरी --- ४

दिवसही आता फार न उरले -
नयनांमाजी चित्र रंगले -
दुबळेपण विसरली पाऊले -
दिंडीसंगे नाचू गाऊ
विठूमाउली हरी -
जाहला कातर वारकरी --- ५

परी अचानक नशिबाचा का -
घाव पडावा शिरी असा का -
अपुला माणूस व्हावा परका -
घरातली रखुमाई गेली
सोडुनी देवाघरी -
जाहला भकास वारकरी --- ६

स्थितप्रज्ञसा अंगणी पडे
उदास मुद्रा बोल तोकडे
अश्रू संपले नयन कोरडे
चित्त न लागे म्हणे स्वत:ला
नको आता वारी
जाहला विषण्ण वारकरी --- ७

एकादशीचा दिवस उगवला -
पंढरिचा मनी ध्यास लागला -
डोळ्यांपुढले रूप हटेना -
दु:खांश्रूची धार सरेना -
मनी असे ते स्वप्नी दिसता
थरारला अंतरी -
जाहला व्यथीत वारकरी --- ८

थकल्या नेत्री झापड क्षणभर -
क्षणभर दिसले स्वप्न मनोहर -
कानी गुंजला नामाचा स्वर -
स्वप्नी दिसली दिंडी वारी
आणि सावळा हरी -
जाहला दिङ्मुढ वारकरी --- ९

भास म्हणू की सत्य म्हणू या
हर्षभरे रोमांचित काया -
माऊलीची ही अगाध किमया
दर्शन घेऊन पडलो पाया -
चरणांवर मी स्वत: वाहिली
तुळशीची मंजिरी
जाहला पावन वारकरी --- १०

चार दिसांनी स्नेही आला -
बहु वर्षांनी आज भेटला -
वारी करुनी गावी चालला -
अबिर लावुनी वारकऱ्याला -
भेटे उराउरी -
जाहला नि:शब्द वारकरी --- ११

म्हणे पाहिले तुम्हा उभयता -
चरणी माथा लवला होता -
कोण तुम्हासी घेऊन गेला -
मूर्तीनिकटी कसे पोचला -
दाटीमधुनी कैसे गेला -
थेट असे गाभारी -
जाहला अबोल वारकरी --- १२

भाग्य असे आम्हा न लाभले -
आम्ही दर्शन दुरुन घेतले -
भाग्यवान आम्हाहून तुम्ही -
तुमच्या पाया पडतो आम्ही -
बोलून इतुके स्नेही परते -
गावी आपुल्या घरी -
जाहला अवाक् वारकरी --- १३

वारीचा जरि योग न आला -
स्नेही म्हणतो तुला पाहिला -
बुद्धी हरली तर्क संपला -
आकलनाच्या पल्याड घडले -
काय चमत्कारी -
जाहला स्तंभित वारकरी --- १४

विचार करुनी झाला वेडा -
गूढाचा ना होइ उलगडा -
कधी लागली शोधसमाधी -
शांत बसेना अवखळ बुद्धी -
उत्कंठा पोचली शिगेला -
बेचैनी बावरी -
जाहला भ्रमिष्ट वारकरी --- १५

अपूर्व क्षण मग एकचि आला -
ज्ञानाचा स्फुल्लिंग पेटला -
जणू मस्तकी स्फोट उडाला -
मनांतला कल्लोळही शमला -
गूढाचे होऊन सुबोधन -
शंका झाल्या दुरी -
जाहला नि:शंक वारकरी --- १६

भास नव्हे ती स्वप्ने नव्हती -
विठूकृपेची ती अनुभूती -
स्वये प्रभूने धरून हाती -
पंढरीस नेले सांगाती -
क्षणांत एका यात्रा घडवुनि -
परत आणिले घरी -
जाहला कृतार्थ वारकरी ---- १७

कृतज्ञ झाला कृतार्थ झाला -
सुफल जन्म सार्थकी लागला -
सोने झाले तनामनाचे -
भाग्य उजळले वारकऱ्याचे -
मी-तूपण संपले तयाचे -
विठ्ठल चरणी विलीन झाला -
एकवटुन अंतरी
जाहला पुनीत वारकरी ---
जाहला पवित्र वारकरी ---
जाहला समृद्ध वारकरी --- १८

श्री सुहास सोहोनी - रत्नागिरी, मोबा. नं. : ९४०३०९८११०

## कविता - प्रवास



श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर

सुखे भरून आसपास
न तूच; वाटते उदास

न सोबती.. दिवा.. न गाव
दिला मला असा प्रवास

जिणे 'पहाट-स्वप्न' गोड
(जपायचे सदैव भास)

जिवंत मी.. जगे अजून
न अन्य; फक्त हेच खास

तुझी हवी निरंत साथ
जसा जगावयास श्वास

मनास बोचणी.. न चैन
सजे विना बनेल फास

करायची हवीच जिद्द
सुखावतो हरेक त्रास

उधाण तू; न भोवतीस
जणू फलाट मी भकास

फितूर.. घातकी नशीब
फळे न एकही प्रयास

ऋतू समान वागतेस
पुन्हा पुन्हा चुके कयास

**श्री राजकुमार दत्तात्रय कवठेकर** - ओंकार अपार्टमेंट, डी बिल्डिंग, शनिवार पेठ, आशा  टाकिज जवळ, मिरज

## कविता - मी गृहिणी



**सुश्री प्रेमा माधव कुलकर्णी**

मी संसारसागरी एकरूप झाले

मी संसारसागरी रमले

मला न माहित हे कसे घडले?

मी कधी कशी गुंतत गेले?

मला न कळले माझे काही राहिले? ॥ १ ॥

किती असोत नाती - आले रमले

मी स्वागती त्यांच्याच गुंतले

शेजारी असती कोणी दारी

त्यांची सखी सोबतीण खरी

मग अलिप्त कसे व्हावे हे न समजले॥2॥

स्त्रीमुक्ती स्वातंत्र्य शब्दचि उरले!

माझे अवकाश मला मिळाले!

मायेत गुंतले, परी कधी न तुटले

मी धागा धागा जोडत गेले पण हे

भलते अवघड असते हे कुणा कळले?॥3॥

संस्कार संस्कृती नि समाजभान कसले?

नकळत रूजले, वाढले फुलले

अवघड ते कसे सहजची जमले

मी गृहिणी सफल संपूर्ण झाले

हे गंगौधासारखे जिणे पुण्याईचे झाले॥4॥

**सुश्री प्रेमा माधव कुलकर्णी** - कोल्हापूर मो 7387678883 ईमेल - pmk2146@gmail.com

## कविता - हे मनां… !



सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी

- मनां, तुज शोधतांना..

वाट मज सांपडेना… ।

पाय माझे अनवाणी..

धांवू किती मी कळेना.. ।

- थकली रे गात्रे माझी..

पेलवेना सारी ओझी.. ।

नको होऊं सैरभैर..

धपापतो माझा ऊर.. !

- पंख तुझे पसरुनी..

कुठे जाशी क्षणोक्षणी.. ।

थांग तुझा रे लागेना..

येई फिरुनी तूं मना.. ।

- ओढ तुला क्षितजाची..

नको ऐकवूं विराणी.. ।

हळूंवार आठवांची..

गाऊं तुझी-माझी गाणी.. ।

**सौ. शुभदा भास्कर कुलकर्णी (विभावरी) -** कोथरूड-पुणे. ३८. मो.९५९५५५७९०८

## कविता - .. दीप-ज्योती



सुश्री दीप्ति कुलकर्णी

दीपावलीच्या या ज्योती

दिव्य तेथे झळाळती

जणू सांगती जगती

संदेश ग प्रसारिती

. तमातून ग तेजाची

. उधळण करिताती

. येती आप्त नि सोबती

सर्वासवे तेजराशी

दीप्ती करते आरती

मांगल्य ग ते मागते

तम जाण्याची प्रार्थिते

प्रकाशासवे ती गाते

. दु:खामागुनी सुखाची

प्राप्ती होते आनंदाची

. ज्योती, ज्योती ग स्नेहाची

. प्रार्थिते ग ती यशाची |

**सुश्री दीप्ति कुलकर्णी** - कोल्हापूर

## कविता - आई



श्री आनंदराव (नंदकुमार) रघुनाथ

आई

जन्माचे सार्थक

तुझ्यामुळे झाले

आयुष्यात सुख भाळी आले

आई

प्रेम जिव्हाळा

सदाबहार फुललेला

निरंतर सुखमय आनंदी सोहळा

आई

जाई जुई

मन मधूर अंगाई

पवित्र संथ निर्मळ गंगाई

आई

माझी सावली

प्रसन्न विठु माऊली

नतमस्तक सदैव सगुण पावली

आई

सुखाचा सागर

कर्तव्याच्या जागता जागर

संस्कारांचा सुबोध उत्तुंग आगर

**श्री आनंदराव (नंदकुमार) रघुनाथ जाधव** - खणभाग, भारत चौक, शिवगर्जना मार्ग, “श्री ज्योतिर्लिंग”, २०७, सांगली.. संपर्क...८८३०२००३८९

## कविता - व्रतस्थ



श्री शरद कुलकर्णी

माझ्याआकाशा त, तुझे कृष्णमेघ

रुंदावून रेघ क्षितिजाची.

क्षितिजाची व्याप्ती, जशी ज्याची दृष्टी.

तेवढीच सृष्टी, ज्याचीत्याची.

ज्याचीत्याची वाट, आणि वेगळेच गाव.

नशिबाचे ठाव, वेगळाले.

वेगळाल्या वाटा, नसावा बोभाटा.

पायातला काटा, बोचणारा.

बोचणारा काटा, हळूच काढावा.

डोळ्यातला थेंब, लपवावा.

लपवून थेंब, व्हावेनिमूट मार्गस्थ.

होउन व्रतस्थ, आयुष्याशी.

**श्री शरद कुलकर्णी** - मिरज

## कविता - हार… प्रहार…



प्रा. सौ. सुमती पवार

प्रहार लागतो कधी करावा तर कधी लाभती हार

हार जीत तर येणारंच हो, नको वाटतो भार …

सुकृत करती, नीतीमुल्ये जनमानसी पेरती

धुरीण ऐसे जगात असती करा त्यास आरती…

ढासळता हो समाजस्वास्थ्य प्रहार लागती पहा

गुंडपुंड माजले पहा ना म्हणवती वरूनी महा…

भीती वाटते आज काल हो, खरे कसे बोलावे

कळत नाही खरेच आता कसे बरे वागावे..

क्षणात इकडे क्षणात तिकडे कावळे पहा उडती

कशी करावी कोणाच्या त्या मनाची झडती…?

पायपोस ना पहा राहिला नाही मान सन्मान

कुठल्या खडकावरती फुटे ही “नाव” कुणा ना जाण …

**प्रा. सौ. सुमती पवार** - नाशिक, ९७६३६०५६४२ ईमेल svpawar6249@gmail.com

## कविता - एक तारा उगवता



**श्री प्रकाश लावंड**

कंठ थिजून गेला तुला हाकारताना
सभोवताली किती गूढ शांतता ही
कुठं दडून बसले आवाज आज सारे
कानां असह्य झाली नि:शब्द आर्तता ही

नजरा ओळखीच्या आपुलकीचे हसू
भिंतीआड चिणली आस्था काळजातली
विश्वासानं धरला तो हातही निसटला
ज्या वाटेनं चाललो ती दरीपाशी थांबली

इथंच थांबावं की परतावं कळेना
दरीत उतरावं की चढाव्या टेकड्या
अंधार आवळतोय साऱ्या जाणिवांना
विधात्या इथं तूच आहेस वाटाड्या

दिवसाचे पांगलेले किरण झाले गोळा
पश्चिमेच्या सीमेपार गेला त्यांचा जथा
क्षितिजावर दिसला एक तारा उगवता
माझ्यासाठी तूच पाठविलेस रे या दूता

**श्री प्रकाश लावंड - करमाळा जि.सोलापूर.   मोबा 9021497977**



सुश्री मंजुषा सुनीत मुळे

## कविता - आठवणी

काही माणसं, काही क्षण आणि काही आठवणी
मनात घर करून असतात
आणि अशी कितीतरी घरं मनात सांभाळत
माणसं जगत असतात...

काही घरं आडवाटेला
काही पलीकडे जराशी
काही मात्र अगदीच समोर
येताजाता दिसावीतअशी......

दिवस सरतात, वर्षे लोटतात
काळ काही थांबत नाही
पण कितीही प्रयत्न केला तरीही
मनातली गर्दी हटत नाही...

मग नकळत त्या काळाचंच औषध घेऊन
काही आठवणी जिरून जातात
काही आणि आपल्याही नकळत
कोप-यात कुठे दडून रहातत....

पण काही मात्र इतक्या ठाम
मनातून हलतच नाहीत
आणि अगदी मनातलं सांगू का
त्या हलाव्यात असं मनालाच वाटत नाही.

सुश्री मंजुषा सुनीत मुळे - मो ९८२२८४६७६२

## कविता - आयुष्याचे व्हावे चंदन..



श्री सुहास रघुनाथ पंडित

गृहसौख्याचे विणता धागे, विणता विणता विणित गेलो
गुंतत गेलो कसा, कळेना, पिंज-यात या कसा अडकलो

चुकता चुकता सहजपणाने नवी वाट मी शोधित जावे
अवसरातीला कृष्ण किनारी नक्षत्रासम कुणी चमकावे

फडफड केविलवाणी सोडून उंच भरारी घ्यावीच कधी
वैरीण होऊन जरी वाहते पार करावी सहज नदी

तृप्तीचे मधुप्याले प्राशून शृंगाराच्या रसात न्हावे
आसक्तीचे सोडून बंधन पैलतटीचे अभंग गावे

असे वाटते, असे जगावे मुक्तपणाने सोडून बंधन
ध्येयासाठी झिजता झिजता आयुष्याचे व्हावे चंदन

**श्री सुहास रघुनाथ पंडित** - सांगली (महाराष्ट्र) मो - 9421225491

## कविता - करायचं काय... ?



डॉ.सोनिया कस्तुरे

बाहेर दिव्यांची खूप मोठी आरास
आतून दाटलेल्या आंधाराचं
करायचं काय ?

अवती-भवती खूप गर्दी
आतून वाटणाऱ्या पोरकेपणाचं
करायचं काय ?

मन स्वच्छंदी उडू पाहतंय कर्तव्यापायी
पंखातलं बळ नाहीसं होतंय
करायचं काय.. ?

विज्ञान, तंत्रज्ञानाची झेप उंच
नितीमुल्ये, माणूसकी हरवत चालली
करायचं काय.. ?

इकडे सभा तिकडे परिषद
भुकेनं व्याकूळ जीवांचं..
करायचं काय.. ?

साऱ्या प्रश्नांची उत्तरं बुद्धाकडे
बुद्ध कळतो, वळत नाही.
करायचं काय.. ?

सुटतील प्रश्न, उजडेल पहाट ;
दिसेल लख्ख स्मित, चालतील सगळे
बुद्धाची वाट.. !

**डॉ.सोनिया कस्तुरे -** विश्रामबाग, जि. सांगली, भ्रमणध्वनी:- 9326818354

## **काव्यानंद - जय शारदे वागेश्वरी - कवयित्री शांता शेळके**



**सौ. विद्या पराडकर**

भारतीय संस्कृतीत त्रिवेणी संगमाला फार महत्त्व आहे.

तेच महत्त्व साहित्य, कला व संगीत यांनाही आहे.

कवयित्री शांता शेळके, संगीतकार फडके, गायिका आशा भोसले यांनी एका नाविन्यपूर्ण कलाकृतीची निर्मिती केली.

ती कलाकृती म्हणजे **"जय शारदे वागेश्वरी"**. हे स्तवन गीत होय. म्हणूनच हे गीत आजही मराठी मनावर अधिराज्य करीत आहे.

**जय शारदे वागेश्वरी स्तवन गीत**

**जय शारदे वागेश्वरी**

**विधी कन्यके विद्याधरी**

**ज्योत्स्नेपरी कांती तुझी**

**मुख रम्य शारद चंद्रमा**

**उजळे तुझ्या हास्यातुनी**

**चारी युगाची पौर्णिमा**

**तुझिया कृपेचे चांदणे**

**नित वर्षु दे अमुच्या शिरी ||१**

**वीणेवरी फिरता तुझी**

**चतुरा कलामय अंगुली**

**संगीत जन्मा ये नवे**

**जडता मतिची भंगली**

**उन्मेष कल्पतरू वरी**

**बहरून आल्या मंजिरी**

**जय शारदे वागेश्वरी ||२**

साधारणतः सांस्कृतिक व साहित्यिक कार्यक्रमाची सुरुवात शारदास्तवनाने होत असते. शारदा स्तवन हा या सांस्कृतिक कार्यक्रमाचा आत्मा असतो.

कवयित्री शांता शेळके यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकार झालेले, संगीतकार फडके यांनी संगीतबद्ध केलेले, आशाताईच्या मधुर गळ्यातून साकार झालेले हे गीत आजही प्रशंसेस पात्र आहे.

प्रस्तुत गीतात दोन ओळींचे धृवपद आहे व दोन कडवी आहे.

प्रथमदर्शनी आपण सर्व शारदेचे भक्त तिच्या अलौकिक लावण्याने मंत्रमुग्ध होतो.

रसिकांना मंत्रमुग्ध करण्याची कला कवियत्री जवळ आहे.

शारदेचे हुबेहूब शब्दचित्र कवयित्री ने समर्पक व चपखल शब्दातून केले आहे.

ज्योत्स्नेपरी कांती तुझी मुखरम्य शारद चांदणे सुंदर उपमा व रूपकाचा एक अनोखा मिलाफ केलेला दिसतो.

एखाद्या हिऱ्याला जसे कोंदणात बंदिस्त करावे तसा केलेला शब्दांचा वापर मौलिक वाटतो.

या गीताचा दुसरा विशेष म्हणजे नितांत सुंदर कल्पना विलास होय. उदाहरण "उजळे तुझ्या हास्यातुनी चारी युगाची पौर्णिमा, बहरून आल्या मंजिरी"

लयबद्धता हे या गीताचे लक्षण होय.

यमकाचा मोठ्या खुबीने केलेला वापर स्तुत्य वाटतो.

या गीतात मूर्तीमंत शारदा देवीचे सर्वांग सुंदर चित्रण केले आहे.

प्रत्यक्ष संगीताची जननी शारदा तिची वीणेवरून फिरणारी चतुर बोटे, कलामय अंगुली अगदी शब्दमय काव्यमय वाटते.

या काव्याचा जनमानसावर होणारा परिणाम अचेतनालाही चेतना प्राप्त करून देतो.

शारदा ही विधात्याची मुलगी, विद्येची देवता, वाणीची ईश्वर व संगीताची माता आहे.

मुळातच हे गीत सुंदर, संगीतकाराने चढविलेला साज सुंदर, आशाताईच्या मधुर गळ्यातून निघालेला स्वर सुंदर या त्रयीमुळे हे गीत मराठी साहित्याच्या मंदिरातील नंदादीपाप्रमाणे प्रकाशमय राहील यात शंकाच नाही.

"झाले बहु होतील ही बहू परंतु यासम नसे जणू" हे गीत सरस्वती देवीने शांताबाई कडून लिहून घेतले असे वाटते.

हे सर्व सरस्वतीचे देणे आम्हा रसिकांसाठी नजराणा नव्हे काय?

गीत संपले तरी सूर कानात घुमत असतात.

या गीतातील भाषा ओघवती आहे.

मराठी सारस्वतातील हे गीत मैलाचा दगड ठरो.

या काव्यातून पाझरणाऱ्या उदात्त भक्तीरसाने अक्षरशः रसिक श्रोते व वाचक मंत्रमुग्ध होतात.

**सौ. विद्या पराडकर -** वारजे, पुणे

## चित्र काव्य -- चित्र क्रमांक १



चित्र सौजन्य - श्री आशिष मुळे

एक देखणे फुल उमले

शुभ्र कोमल पर्णदलांचे

मध्यभागी रेखीव फुलले

छान तुरे लाल केसरांचे ||

डहाळीवरी लगडलेल्या

कळ्या आणिक नाजुक फुले

वाऱ्यावरती खालीवरती

मोहरून मंद मंद झुले ||



**सौ. ज्योत्स्ना तानवडे**

पुष्पवैभव असे साजिरे

निसर्ग किमया शोभिवंत

परिसराला आनंद देई

सौंदर्य तरुचे खुलवित ||

**सौ. ज्योत्स्ना तानवडे -** वारजे, पुणे.५८

# चित्र काव्य -- चित्र क्रमांक २



**सौ. ज्योत्स्ना तानवडे**

झाला बंदिस्त माणूस
खिडक्याही झाकलेल्या
निसर्गाशी फारकत
जाणिवाही खुरटल्या ||

ऊन वारा वर्षाधारा
खिडकीत डोकावतो
करू पाहे दूर जरी
निसर्गही खुणावतो ||

मनामधे असे ओल
निसर्गाची ओढ वाटे
कुंडीतल्या रोपामधे
चैतन्याचे बीज दाटे ||

**सौ. ज्योत्स्ना तानवडे** - वारजे, पुणे.५८



चित्र सौजन्य - श्री आशिष मुळे



**सौ नीला देवल**


तीन गवाक्षे.

आयुष्याच्या नभाखाली देह इमारत मोठी झाली
गवाक्षे भूत वर्तमान भविष्याची, बंद की उघडी दृष्टी मनाची
कटू वेदनांच्या आठवांचे, भूत गवाक्ष बंद असावे
वर्तमानचे द्वार उघडूनी स्नेह बीजाचे रोप रुजवावे
निरामय नात्यांच्या मृतिकेमध्ये खत घालावे मायेचे
दुष्टाव्याची किड मारावी मधुर वाणीच्या माऱ्याने
स्वभावाचे उदक शिंपू नी रोप वाढवू तेजप्रकाशे
नाविन्याचे रूप निराळे रोज नवे ते नित्य नवे
सृजनाचा ध्यास घेऊनी बंध बांधावे मनामनाचे.

**सौ. नीला देवल - मो ९६७३०१२०९० ईमेल -**

## पुस्तकावर बोलू काही - “दि अल्टिमेट इन्व्हेस्टर“

**– गोष्ट जन्मजन्मांतरीची**




**पुस्तकाचे नाव. : द अल्टिमेट इन्व्हेस्टर**

**लेखक आणि प्रकाशक : आशिष मुळे**

**पृष्ठसंख्या :  २४०**



**सौ. प्रभा हर्षे**

लेखक श्री. आशिष मुळे यांची ही पहिलीच कादंबरी आहे.

Investment या क्षेत्रात काम करताना, या क्षेत्राचा वेगळ्या पद्धतीने विचार करून त्यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

‘Investment‘ हा शब्दच मुळी गुंतवणुकीवर वाढ - आहे त्यात वाढ, असे सुचवतो. वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळी वाढ अपेक्षित असते. निवड करण्याची वेळ आली तर कशाची निवड केली जाईल ? तर जिथे जास्तीत जास्त वाढ मिळेल त्या क्षेत्राची. पण जास्त जास्त म्हणजे किती जास्त ? आणि या जास्तचा  विनियोग तरी कसा करणार? या हव्यासाचा, आसक्तीचा शेवट तरी कशात होणार? या बिकट प्रश्नांचा गुंता सोडवण्याचा विचार प्रामुख्याने या पुस्तकात केला आहे.

कादंबरीची सुरुवात कोकणातील एक गरीब व कष्टाळू मुलगा राघव ह्याच्या, परिस्थिति बदलण्यासाठी  आणि सुधारण्यासाठी चाललेल्या धडपडीपासून होते. राघव नशीब आजमावण्यासाठी कोकणातून मुंबईत येतो. त्याच्या नशिबाने तो चांगल्या माणसांच्या सहवासात येतो. राघव कधीही कष्टांना घाबरत नाही व सच्चेपणा सोडत नाही. लक्ष्मीला अविरत कष्टांनी प्रसन्न करून घेतो. संसारातही सुखी होतो. पण पत्नीच्या दुःखद निधनानंतर सर्व व्यवसाय मुलगी व जावई यांच्या ताब्यात देवून परत कोकणातील आयुष्य जगू लागतो. या सर्व प्रवासात त्याला सायली नावाच्या एका मुलीची साथ लाभलेली असते. आपले प्रेम त्याच्या प्रगतीत अडसर ठरू नये याची काळजी घेत, सायली राघवपासून दूर जाते. पण मनाने सतत त्याच्याजवळ राहते. कोणतीही समस्या उद्भवली की सायलीचे पोपटी डोळे त्याला सतत अचूक मार्गदर्शन करत रहातात याचा अनुभव त्याला वारंवार येत असतो.

आयुष्याच्या दुसऱ्या पर्वात राघव अध्यात्माचा अभ्यास करू लागतो. त्या अनुषंगाने त्याची विचारशक्ती स्फुरण पावू लागते. ‘ शरीर नश्वर आहे पण आत्मा तर अमर आहे. पुढच्या जन्मात आत्मा तर तोच रहाणार. ’ ह्याच गोष्टीचा आधार घेऊन, ‘ आपली या जन्मातली संपत्ती मेल्यावर बरोबर नेता येणार नाही हे तर खरेच. पण तीच संपत्ति आपल्या पुढच्या जन्मासाठी सुरक्षित ठेवता आली, आणि पुढच्या जन्मात ती आपल्याला परत मिळाली तर ? – तर  आपण पुनः त्या संपत्तीचा  उपभोग घेऊ शकू का ? ’ असा एक

अगदी वेगळाच विचार त्याच्या मनात सतत यायला लागतो. आणि इथेच ही कादंबरी पूर्णपणे वेगळे वळण घेते. राघव सतत या कल्पनेचा विचार करू लागतो. धाडसाने या विचाराचा पाठपुरावा करण्यात तो यशस्वी होतो. या जन्मातली संपत्ती त्याच्या पुढील जन्मात त्याला मिळेल अशी व्यवस्था करण्याच्या मागे लागतो. मिळते का ही संपत्ती त्याला पुढील जन्मात ? या उत्कंठावर्धक प्रश्नाचे उत्तर वाचकांना पुस्तक वाचल्यावर नक्की मिळेल.

कादंबरीची वाटचाल दोन समांतर रुळांवर होताना दाखवली आहे. लेखकाने सिनेमातील फ्लॅश बॅक तंत्राचा सुयोग्य वापर या कादंबरीत केला आहे. कथेला असलेली कोकणच्या समुद्र किनाऱ्याची पार्श्वभूमी वाचकाच्या मनाला आनंद देऊन जाते. सायलीचे राघवला गरज लागली तर अचानक प्रकट होणे वाचकाला आश्चर्यचकित करून टाकते. तसेच भारताची आध्यात्मिक राजधानी वाराणसी, हिमालयाची हिमशिखरे, यांचेही मनोज्ञ दर्शन या कादंबरीतील चित्रमय वर्णनामुळे अनुभवता येते.

कादंबरीचे खरे वेगळेपण आहे ते त्यात मांडलेल्या वेगळ्याच विचारांमध्ये. आपण कायम ऐकत आलो आहोत, वाचत आलो आहोत, की वर जाताना काहीही न्यायला परवानगी नाही, सगळं इथेच ठेवून जायचं आहे. हे तर मान्यच आहे. मग ---- ' जरी वर नेता येणार नसले, तरी पुढच्या जन्मात माझे आत्ताचे सगळे काही माझे मलाच मिळेल- असे काहीतरी मी करू शकेन का ? ' --- हा लेखकाने मांडलेला पूर्णपणे वेगळा आणि नवा विचार वाचकाला विचारात पाडतो - गुंतवून ठेवतो.

त्याहीपुढे जाऊन, खरी संपत्ती म्हणजे तरी काय ? सोने नाणे, घरदार, महागड्या वस्तू ही खरी संपत्ती ? का आत्मिक समाधान, प्रिय व्यक्तींचा सहवास ही खरी संपत्ती ? याच्या निष्कर्षाला पोहोचेपर्यंतचा प्रवास थोडासा खडतर पण रंजक आणि मनाला समाधान देणारा आहे.

या सर्व प्रवासाचे वर्णन वाचकांच्या मनावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटवते. उदा. --पैसा हे सुखाचे साधन जरूर आहे पण साध्य मात्र नाही-- पैशाने माणूस अहंकारी बनला तर कोणीच सुखी होवू शकत नाही-- आयुष्यात साथीला प्रेमाची माणसे असणे हेच खरे सुख ! लेखकाने नकळतपणे हाही विचार सतत व्यक्त केला आहे, की माणसाला सहवासाचे प्रेम सर्वात जास्त हवेहवेसे असते. अत्युच्च आनंदाच्या क्षणीही सोबत हवी असते- फक्त हक्क सांगणारी सोबत नाही- तर कायम साथ देणारी, आश्वस्त करणारी निरपेक्ष सोबत!

कादंबरीत शेवटपर्यंत कथानायकाच्या सोबत सतत सावलीसारखी राहिलेली सायली, मी नंतरही विसरू शकले नाही. आपल्या प्रिय व्यक्तीच्या यशासाठी स्वतःचे सुख बाजूला सारणारा असा सोबती विरळाच, असे राहून राहून वाटत राहिले.

सर्व ऐहिक संपत्ती क्षणभंगुर आहे हे कळण्यासाठी आधी अगणित संपत्ती मिळाली पाहिजे, त्याचा निर्मोहीपणे त्यागही करता यायला पाहिजे व परमेश्वरी कृपाप्रसाद मिळण्यासाठी आत्मिक साधनाच केली पाहिजे, हीच जीवनातली सर्वात मोठी गुंतवणूक, असा विचार ठामपणे मांडत, तेथेच पुस्तकाचा शेवट झालेला आहे.

राघवचे पुनर्जन्मानंतरचे रूप म्हणजे निक. हाही राघवसारखा सरळ मनाचा आहे. ज्या वेगाने त्याने पूर्ण भारतभर प्रवास केलेला दाखवला आहे, तो नक्कीच आश्चर्यचकित करणारा आहे.


एक वेगळा आणि महत्वाचा विचार देणारे, सोप्या सहजसुंदर भाषेतील ओघवते कथन असणारे हे पुस्तक मला खूप आवडले. पुस्तक वाचून संपले तरी आपल्या मनात त्याबद्दलचेच विचार चालू राहतात. मला वाटते हेच या पुस्तकाचे यश आहे.

विशेषत्वाने सांगावेसे वाटते ते असे की – लेखक आशिष मुळे यांनी अजून वयाची चाळीशीही गाठलेली नाही हे जेव्हा समजले, आणि या कादंबरीतली कथा ही पूर्णतः काल्पनिक कथा आहे असे ते स्वतः म्हणत असले, तरीही, वयस्कर मंडळींनाही झेपण्यास अवघड वाटणारा हा अतिशय परिपक्व विचार त्यांनी अगदी सहजपणे, आणि विस्तृतपणे त्यांच्या या लिखाणातून इतक्या अलगदपणे वाचकांसमोर मांडलेला पाहून, त्यांच्या या वैचारिक झेपेचे मला कमालीचे कौतुक वाटते आहे.

तुम्हीही ही कादंबरी नक्की वाचा आणि तुमचा अनुभव शेअर करा.

श्री. आशिष मुळे यांना त्यांच्या पुढच्या साहित्यिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**सौ. प्रभा हर्षे -** मोब. नं. ९८६०००६५९५



# पुस्तकावर बोलू काही - व्याख्यानांचे आख्यान

- **एका व्याख्यात्याचा खुसखुशीत प्रवास**



**लेखक : मिलिंद जोशी**

**प्रकाशक : दिलीपराज प्रकाशन, पुणे**

**किंमत - २३० रुपये**



सुश्री तृप्ती कुलकर्णी

गेल्या काही दिवसांपासूनच्या अराजकीय (अराजकता या अर्थाने... उगाच गैरसमज नको) वातावरणात तुम्हाला जर तणाव विरहित हसू हवं असेल तर तुम्ही आख्यान वाचायला पाहिजे. हो हो 'आख्यानच' वाचायला हवं. दिवाळीतल्या खमंग आणि खुसखुशीत पदार्थांचा आस्वाद घेताना तोंडी लावायला अतिशय उत्तम, मनालाही गुदगुल्या करणारं आणि गप्पा मारता मारता किस्सा सांगण्याचा आनंद देणारं हे आख्यान तुम्ही न चुकता वाचायला हवं. अहो, आवाज, जत्रा, हसगत असे दिवाळी अंक तर तुम्ही वाचताच. चुटकुले विनोदी प्रसंग मित्रांना आवर्जून सांगता, व्हाट्सअपवर पाठवता. ते तर कराच. पण यावर्षी हे आख्यानही वाचाच. तुम्हाला एक वेगळाच आनंद मिळेल. कसलं आख्यान म्हणून काय विचारता? अहो व्याख्यानांचं आख्यान.

काय म्हणता व्याख्यान- आख्यान !... नको रे बाबा. अहो थांबा थांबा, निष्कर्षाप्रत येण्याची घाई करू नका. हे आख्यान कंटाळवाणं, निरस, जीवनाचं मोठं तत्वज्ञान सांगणारं, वैराग्याचं, त्यागाचं महत्त्व सांगणारं असं अजिबात नाही. किंवा या व्याख्यानाचा सू रही गंभीर, प्रचंड चिंतनशील वगैरे नाही. पण एक मात्र आहे, हे आख्यान ज्या व्याख्यानांमुळे दिलं गेलं आणि ज्या वक्त्याने ते लिहिलं त्याचा उद्देश मात्र मिश्किलवृत्तीने निष्कपटपणे जगाकडे पाहणं, त्याचं अवलोकन करणं आणि पारंपरिक श्रवण संस्कृतीचं जतन करणं हा आहे.

तसं पाहायला गेलं तर व्याख्यान देण्याचं आणि ऐकण्याचं प्रमाण हे अलीकडच्या काळात जरी कमी झालेलं असलं तरी नाहीसं झालेलं नाही आणि होणारही नाही. कारण चित्रपट आणि नाट्य यांच्याही आधीपासून आपल्या समाजाचं रंजन आणि बोधन करणारा आणि 'संवादशीलता' साधणारा प्रकार म्हणून व्याख्यान प्रसिद्ध आहे. महाराष्ट्राला तर आचार्य अत्रे, काका गाडगीळ, राम शेवाळकर, शि. म. परांजपे, शिवाजीराव भोसले आणि अगदी अलीकडचे तरुण लोकप्रिय व्याख्याते मिलिंद जोशी अशा नामवंत वक्त्यांची परंपरा लाभली आहे. ' व्याख्यानाचे आख्यान ' हे पुस्तक अशाच या व्याख्यान परंपरेतील एक तजेलदार अनुभव कथन आहे. खरंतर हा एका व्याख्यात्याचा खुसखुशीत प्रवास आहे. खुसखुशीत अशासाठी की हा प्रवास वाचताना आपल्याला त्यातल्या गंमतीशीर घटना वाचून हसू आल्याशिवाय राहत नाही. आणि या गंमती काल्पनिक नसून मिलिंद जोशींनी त्यांच्या व्याख्यानाच्या प्रवासादरम्यान प्रत्यक्ष अनुभवलेल्या आहेत. त्यामुळे या घटनांकडे पाहताना आपल्याला माणसांचे स्वाभाविक नमुने बघायला मिळतात. काही इरसाल तर काही

भोळसट, काही व्यवहारी तर काही भावनाशील नमुने. अशा या नमुनेदार माणसांनी त्यांच्याही नकळत एखाद्या साध्या घटनेचं गमतीशीर घटनेत, विनोदी प्रसंगात किंवा फजिती स्वरूपात कसं रूपांतर केलंय हे यात वाचायला मिळतं. आणि घटना घडल्यावर, ती चूक लक्षात आल्यावर तिथल्या प्रेक्षकांच्यामध्ये पिकलेल्या हशात... आपणही मनाने सामील होतो. हे प्रसंग अगदी साध्या साध्या घटनातून निर्माण होतात जसं की प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देणं, दीपप्रज्वलनाचा कार्यक्रम करणं, व्याख्यानासाठी आमंत्रण देणं, व्याख्यात्याची सोय आपल्या शहरात किंवा गावात करणं, किंवा व्याख्यानातला सत्कार समारंभ असो. यातून मानवी स्वभावातील विसंगती, गावकऱ्यांची किंवा शहरांमधल्या लोकांची त्यावेळची मानसिकता आणि सामाजिकता, तिथल्या चालीरीती, वागण्याबोलण्याचं भान नसणं, नियोजनाचा अभाव..., तर काही वेळा व्याख्यात्याबद्दलची उत्सुकता, आपुलकी या गोष्टीही आपल्याला दिसून येतात.

पुस्तकाच्या सुरुवातीला प्राध्यापक मिलिंद जोशींची व्याख्याता म्हणून होणारी जडणघडण, त्यात त्यांना येणाऱ्या अडचणी आणि त्यावर त्यांनी केलेली मात, अशा प्रेरक गोष्टीही आपल्याला मिश्किल शैलीत वाचायला मिळतात. मला इथे वाचकांना सांगायला आवडेल की उत्तम व्याख्यात्यासाठी व्याख्यात्याच्या मनावर, जिभेवर, बुद्धीवर आणि वाणीवर काय काय संस्कार घडवावे लागतात हे मिलिंद जोशी यांनी अगदी हसत खेळत सांगितलं आहे. या दृष्टीने ज्यांना व्याख्याता म्हणून आपलं कार्यक्षेत्र निवडायचं आहे त्यांना हे पुस्तक एक मार्गदर्शक स्वरूपात उपयुक्त ठरेल. मिलिंद जोशी व्याख्याते होण्याच्या आधी म्हणजे त्यांच्या महाविद्यालयीन काळात त्यांना होणारा दम्याचा त्रास हा व्याख्याता होण्यातला मोठा अडसर ठरला होता. त्या दम्याला मिलिंद जोशी यांनी कसं नामोहरम केलं हे या पुस्तकातून वाचण्याजोगं आहे. स्वतःवर बेतलेले असे जीवावरचे प्रसंग सांगतानादेखील जोशी सरांच्या लेखणीनं आपला मिश्किलपणा बिलकुल सोडला नाही. हॉस्टेलमधल्या आठवणी सांगताना ते म्हणतात ' रात्री अपरात्री दम्याचा त्रास झाला की माझ्या वरच्या विंगेतले माझे मित्र, गणपती मंडळाचे कार्यकर्ते जसा गणपती उचलून आणतात तसं मला उचलून तळमजल्यावर आणत आणि तिथून दुचाकीने डॉक्टर कुलकर्णींच्या दवाखान्यात नेत. '... मात्र या जडणघडणीत त्यांना सहकार्य करणाऱ्यांचे, त्यांच्या कुटुंबियांचे, मित्र परिवारांचे, त्यांच्या मार्गदर्शकांचे उल्लेख करताना हीच लेखणी किंचित गहिवरल्यासारखी वाटते.

आत्तापर्यंतच्या 25 वर्षांच्या आपल्या व्याख्यात्याच्या कारकिर्दीत आपल्याला अनेक सुहृद भेटले, आपल्या विचारकक्षेचा विस्तार झाला, जगण्यात, अनुभवात सातत्याने भर पडत गेली आणि माणूस म्हणून प्रगल्भतेकडे वाटचाल सुरू झाली हेदेखील ते या पुस्तकातून आवर्जून नमूद करतात. अर्थात असे अनुभव घेण्यासाठी मनाची संवेदनशीलता, तरलता, समय सूचकता, अचूक स्मरणशक्ती, उत्तम निरीक्षण शक्ती आणि माणसांप्रती असलेला लोभ, बांधिलकी, त्यासाठी करावी लागणारी तडजोड, या गोष्टीदेखील त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होत्या आणि त्यामुळेच त्यांना व्याख्याता म्हणून कार्यक्षेत्र करता आलं, प्रसिद्धी मिळाली, हेही एक वाचक म्हणून आपल्या लक्षात आल्यावाचून राहत नाही. आता मी जो एक प्रसंग सांगते तो विनोदी असला तरी एखाद्याला खजील करू शकणारा आहे.. पण तो ज्या प्रकारे जोशी सरांनी सावरून धरला तो त्यांची संयमीवृत्ती किती कमालीची होती हे दाखवतो... ते सांगतात, ' महाराष्ट्रातल्या एका तालुक्याच्या ठिकाणी एका

व्याख्यानमालेत माझे व्याख्यान होते. त्याच वर्षी मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांचे मडगाव येथे आकस्मिक निधन झाले. कराड येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठीच्या निवडणुकीसाठी ते उमेदवार म्हणून उभे होते। त्यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्रभर त्यांचे जिथे जिथे दौरे झाले तिथे तिथे मी त्यांच्यासमवेत उपस्थित होतो. त्यांच्या निधन समयीही मी तिथेच होतो. त्यानंतर आठवणीतले शिवाजी सावंत हे पुस्तक मी संपादित केले. अनुबंध प्रकाशनाने ते प्रकाशित केले. मी ज्या गावी व्याख्यानासाठी गेलो होतो त्या गावातील एका शिक्षकाने ते पुस्तक वाचले होते. त्यांच्यावरच व्याख्यानापूर्वी माझा परिचय करून देण्याची जबाबदारी देण्यात आली होती. माझा सगळा परिचय त्यांनी व्यवस्थित करून दिला आणि शेवटी म्हणाले, ' मिलिंद जोशी इतके भाग्यवान आहेत की सगळे मोठे साहित्यिक त्यांच्या मांडीवरच प्राण सोडतात '. उपस्थित श्रोत्यांमध्ये हशा पिकला. मी वक्ता आहे की यमदूत असाच प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाला असावा. मी व्याख्यानासाठी उभा राहिलो तेव्हा खुलासा करताना म्हणालो, ' सर थोर साहित्यिक माझ्या मांडीवर प्राण सोडतात असं आपण म्हणालात हे पुण्या-मुंबईतल्या लोकांना कळू देऊ नका. त्यांना समजले तर मला सुपाऱ्या देतील यांना मांडीवरती घ्या आणि वर पाठवा... ' असे अनेक चमत्कारिक प्रसंग सांगतानाच प्रमुख पाहुण्यांनी कसं बोललं पाहिजे, व्यासपीठाची आचारसंहिता कशी पाळली पाहिजे हेदेखील ते सांगतात. श्रद्धांजली की हास्यांजली, निमंत्रणाचे पक्षी, अक्कलखाती जमा, करोनामुळे बदललेली श्रवणसंस्कृती, भाषणांपूर्वीचे दिव्य, क्षण असे कसोटीचे, संधी दार ठोठावत असते, इत्यादी अनुभवातून ते एकूणच व्याख्यानाच्या सर्व बाजूंचे वाचकाला नितळ दर्शन घडवतात. आपण जरी व्याख्यान देणार नसलो तरी समोरचा व्याख्याता काय काय परिस्थितीतून आपल्यापुढे उभा आहे याची जाणीव करून देणारं हे पुस्तक श्रवण- संस्कृतीचा मान कसा राखावा याचं भान आणून देते... एक श्रोता म्हणूनही आपली जाणीव समृद्ध करते.

**सुश्री तृप्ती कुलकर्णी – मोबा. नं. ९८८११५७३३३**



# पुस्तकावर बोलू काही – खारीच्या वाटा



**पुस्तकाचे नाव : "खारीच्या वाटा"**

**लेखक श्री. ल. म. कडू**

**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे**



सुश्री सुलू साबणे जोशी

एक नदीकाठचं साधंसुधं खेडं, शेतीवर जगणारं! तिथे रहाणारे आई, अप्पा आणि त्यांचा इयत्ता चौथीत शिकणारा मुलगा - ह्या संवेदनशील मुलाच्या डोळ्यांनी टिपलेली ही रोजच्या जिण्याची कथा - यात त्याचं घर, घरातली माणसं, गाईगुरं, गावजीवन, निसर्ग, भवताल - भवतालातील झाडंमाडं, भैरोबाचं देऊळ, देवळातील शाळा, गुरुजी, मित्र, आंबेमाळ (त्या आंब्यांची भन्नाट नावे - शेंद-या, खोब-या, खाप-या, पुंगशा, गाडग्या), करवंदे, तोरणे असा रानमेवा देणारी झाडे, या सगळ्याचं चित्रमय वर्णन लेखक - श्री. ल. म. कडू यांनी या पुस्तकात केलं आहे. चित्रमय म्हणायचं कारण लेखक स्वतः उत्तम चित्रकार आहेत. त्यांच्या शब्दाशब्दांतून उगवून आलेली ही सुंदर चित्रे त्यांच्या रेखाटनांतून साकार झाली आहेत. हा शब्द-चित्रांचा मिलाफ वाचता वाचता आपलाही परकायाप्रवेश होतो, आपण त्या मुलाच्या अनुभूती अनुभवायला लागतो.

या छोट्या मुलाला शाळेतून येतांना एक खारीचं तान्हुलं सापडतं आणि उपजत कळवळ्याने ते तो घरी घेऊन येतो. त्याची आईही प्रेमळ. यापुढचं त्याचं अख्खं विश्व या खारीनं - 'लुकी'नं (लुकलुकणाऱ्या डोळ्यांची म्हणून तिचं नाव 'लुकी') व्यापून टाकलं आहे. हा छोटा आणि त्याचा मित्र - दिनू यांच्या उचापत्या, खारीच्या उपजत सवयींचे त्यांना लागलेले शोध, त्याच्या घरातील बारदाना - जैशा, बारशा बैल, हरणी गाय, तिची कालवड - गौरी, गुंडी म्हैस, भांब्या बोका, हौशा कुत्रा आणि त्यांचे आपापसातील साहचर्य आणि सामंजस्य - या सगळ्याचा कळस म्हणजे बारशा बैलाने लुकीच्या स्वीकाराच्या प्रसंगाचे लेखकाने केलेले प्रत्ययकारी वर्णन - हा बारशा आणि लुकी अतिशय सुंदर चित्ररूपाने मुखपृष्ठावर झळकत आहेत. गावगाडा, गावातील मुक्त जीवन, ग्रामदेवतांचे उल्लेख, त्यांच्या गूढ कथा, परंपरा आणि निसर्ग, आणि या सगळ्याची रोजच्या जगण्याभोवतीची घट्ट वीण, यातून हा कहाणीचा प्रवाह सहजपणे वाहतो आहे. या प्रवाहाची भाषा ओघवती आहे, सचित्र आहे, अस्सल ग्रामीण मराठी आहे (टुळूटुळू, , खेत-या, भरांडा, आखर, चुमुककाटे, सणसर इ. इ.). लेखकाचे शब्द रस, रंग, रूप, गंध आणि नाद लेवून उतरलेत, इतके की, या मुलाच्या निवेदनातून तिथल्या आसमंतातील कण न् कण सजीव होऊन उठला आहे.

यात आपला जीव रमतो न रमतो, तोच या मुलाचं गाव धरणाखाली जाणार ही बातमी येते आणि मुळासकट उन्मळून पडल्याची ठसठस घेऊन सगळं गाव विस्थापित होतं. लुकीची आणि या मुलाची कायमची ताटातूट होते, इथवर हे कथन आहे. एक सुंदर चित्र विस्कटल्याची जाणीव चटका लावून जाते. हा लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव आहे, असा पुस्तकाच्या मलपृष्ठावर उल्लेख वाचल्यावर जीव गलबलून जातो.

'राजहंस प्रकाशन'ने पुस्तक अतिशय देखणं केलं आहे - मुखपृष्ठावरील चित्र आणि आतील रेखाटने याबद्दल श्री. कडू यांचं कौतुक करावं तेवढं थोडेच आहे.

**या साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित पुस्तकाचा अनुवाद दहा भाषांत होतो आहे, हा लेखकाचा सन्मान आहेच. पण त्याचबरोबर मराठी भाषेचाही सन्मान होतो आहे, आणि हे लेखकाचे ऋण मान्य करायलाच हवे.**

सुश्री सुलू साबणे जोशी मोबा. नं. ९४२१०५३५९१

# पुस्तकावर बोलू काही - "धरणकळा"




**पुस्तकाचे नाव : धरणकळा**

**लेखक - श्री. ल. म. कडू**

**प्रकाशक : राजहंस प्रकाशन, पुणे**



सुश्री सुलू साबणे जोशी

श्री. ल. म. कडू यांच्या "खारीच्या वाटा" पुस्तकातील मुलगा आता कळता झालाय. मूळ गावाशी जुळलेली आपली नाळ तुटलीय, ही वस्तुस्थिती त्याला कळतीय, पण वळत नाही. त्याची घुसमट थांबत नाही. तो कानकोंडा झालाय. तात्या (वडील) घुमा होताच, पण तो आणखी आतल्या आत हरवून गेलाय. आईची अवस्था कसनुशी. सगळ्यांचेच कासावीस डोळे धरणाच्या पाण्यात आपल्या बुडलेल्या घराचा ठावठिकाणा शोधताहेत.

या कहाणीच्या पार्श्वभूमीला निसर्गाचा विस्तीर्ण बदलता रंगमंच आहे, ज्याचं वर्णन लेखकाने फार विलोभनीय केलं आहे. पुस्तकाचे शीर्षक - " धरणकळा" (की मरणकळा?) - अशा विस्थापितांचे आहे की, " कळा ज्या लागल्या जीवा, मला की ईश्वरा ठाव्या || कुणाला काय हो त्याचे, कुणाला काय सांगाव्या? " पिढ्यान् पिढ्यांची वहिवाट अंगवळणी पडलेली आणि आता आपलंही भागधेय हेच, ही मानसिकता घट्ट झालेल्या गावक-यांना ' आपले गाव धरणाखाली जाणार ', हा बदल झेपत नाही. निसर्गाचे पडणारे दान पत्करायचे आणि ' ठेविले अनंते तैसेची रहावे ', या चाकोरीत रहायची त्यांची सवय ! धरण भरतं, गाव पाण्याखाली जातं. जो तो निमूटपणे आपला वाटा पत्करतो, कुणी पैसे घेऊन देशावर निघून जातात, कुटुंबं मोडून जातात. जे मागे रहातात, ते जरा उंचावरची जागा बघून कारवीच्या कुडाची केंबळी घरं बांधतात.

मग देवाचा कौल घेतला जातो - 'खडी टाकली' जाते. कौल मिळतो की गाव गिळून टाकलेलं धरण फुटणार. पुन्हा आशा-निराशेचा, ऊनपावसाचा खेळ सुरू होतो. अखेरीस खरोखरच धरण फुटतं, पाणी ओसरतं आणि बुडून गेलेल्या गावखुणा पुन्हा दिसू लागतात. तुटलेल्या बुंध्याला पुन्हा पालवी फुटावी, तशी सगळ्यांची आशा पालवते. गाव नांदतं करायचं ठरतं. किती वेळा, किती प्रकारे वारूळ भुईसपाट होतं, पण 'सातेरी मुंग्या' ते पुन्हा हिरीरीनं बांधून काढतात. ही उपमा आणि ते चित्र इथे फार परिणामकारक लागू होते.

मात्र, तोवर सरकारकडून धरणाची फुटलेली भिंत पुन्हा बांधून काढायचं ठरतं आणि सगळ्यावर बोळा फिरतो. सगळी वस्ती हिरमुसली होते.

पुढील आयुष्याची अनिश्चितता, मिळणा-या एकरकमी पैशांचा मोह आणि त्याच्या नियोजनाचे शिक्षण नसणे, नवीन पिढीला पडलेली शहराची भूल - अशा विपरीत परिस्थितीने आलेली हतबलता - याने प्रत्येकाची फरपट होताना यापुढे दिसते.

कृषिकर्म, अलुतं-बलुत्यात निश्चिंतपणाचं सुख असणा-या इथल्या गावगाड्याला धरणामुळे खीळ बसली, हे तर खरंच ! कुणाची तरी तहान भागवण्यासाठी धरणं बांधली जातात, पण कुणाचं तरी तोंडचं पाणी पळवून, असंच काहीसं चित्र  दिसतं. मनुष्यस्वभावाचे एकेक नमुने तर मासलेवाईक. पैशाच्या लोभापायी सख्खी नाती विस्कटतात, घरं मोडतात, गावसंस्कृती लयाला जाते. एकेकाची फसगत, त्यातूनही स्त्रियांची झालेली वाताहत पोटाला पीळ पाडून जाते.  लेखकाने ह्या कथानायकाच्या माध्यमातून सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक, आर्थिक विस्फोटाचं चित्रण फार प्रभावी केलं आहे. भूमिपुत्र म्हणवणा-यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलं आहे.

'खारीच्या वाटा 'पासून सुरू झालेला या मुलाचा मनोरम प्रवास 'धरणकळे'ने मनोभंगाच्या कडेलोटाशी संपतो. त्याच्या सैरभैर मनःस्थितीचे वर्णन त्यांनी ओघवत्या भाषेत केलं आहे. त्यांच्या लेखनाला लय आहे - गद्यकाव्यच एक प्रकारे ! मराठी मातीचा सुगंध असलेली शब्दकळा आहे (वळघण, आवांज, चोंडं, सदिसदि, बिवड इ. इ.). चपखल म्हणी, वाक्प्रचारांचा वापर आहे. (शब्दसूची देण्याचं औचित्य प्रशंसनीय!) सामाजिक आशय भिडणारा आहे - तो इतका की, शहरात रहाणारे आपण या धरणाच्या पाण्याचं सुख घेतो आहोत, याचा अपराधभावही दाटून येतो आहे.

लेखकाने लिखाणाला दिलेली स्व-रेखांकित चित्रांची जोड तर उत्तमच आहे, ती आशयाला भरीवपणा देतात आणि गतिमानही करतात. पुस्तकाच्या सुरुवातीला केलेले डेरेदार वृक्षाचे आणि डोईवर गवताचा भारा घेतलेल्या पाठमो-या शेतक-याचे रेखाटन आणि पुस्तकाच्या अखेरीस त्याच वृक्षाचे तोडून ठेवलेले कलेवर आणि खांदे पडलेला हताश असा तोच शेतकरी, ही चित्रे अत्यंत समर्पक आहेत.

दोन्ही पुस्तके उत्तम आहेत, आणि फक्त वाचनीयच नाहीत तर कायमस्वरूपी संग्राह्य अशीच आहेत.

सुश्री सुलू साबणे जोशी मोबा. नं. ९४२१०५३५९१



# लेख - पुण्यातील पहिल्या महिला पत्रकार



## श्रीमती विद्या नाडगौड़ा

सौ. अमृता देशपांडे

एक काळ असा होता की मुलींनी मॅट्रिक (११ वी) ची परिक्षा पास केली की त्यांचे शिक्षण पूर्ण झाले, हा



नियम. त्यापुढे तिने फक्त आईच्या हाताखाली घरकाम करावे, फार फार तर शिवण करावे. ह्याचा अर्थ मुलींना कुठल्याच कामात गती नव्हती असा नाही. पालक (वडील) मुलीचे लग्न करुन देणे ही तिच्याबद्दलची एकच जबाबदारी समजून लवकरात लवकर तिचे लग्न करुन देण्यावर त्यांचा भर होता. तीच सामाजिक रूढी होती. लग्नानंतर ज्या पतीने तिची हुशारी बघून तिला पुढे शिकण्यास प्रोत्साहन दिले, त्या स्त्रियांनी आपल्या बुद्धीच्या जोरावर देशाच्याही सीमारेषा ओलांडून आपली विद्वत्ता सिद्ध केली. पण सर्वसामान्य घरातल्या मुली मॅट्रिकनंतर 17-18 व्या वर्षी लग्न होऊन "दिल्या घरी जात".

– १९४५-४६ चा काळ. कोल्हापूरजवळ कागल नावाचे छोटेसे गाव आहे. त्या काळात ते छोटेसे खेडे होते. मुला- मुलींची एकच शाळा होती तिथे. १९१५-२० च्या दरम्यान BSc B. Ed. झालेले तिथले दिवाणगुरुजी शाळा चालवीत होते. एक शिस्तप्रिय व विद्वान शिक्षक म्हणून त्यांना पंचक्रोशीत मान होता. त्यांची स्वत:ची मुलेसुध्दा त्याच शाळेत शिकत होती.

दैवाचे फासे चुकीचे पडू लागले की परिस्थिती हाताबाहेर जाते असे म्हणतात ना अगदी तसेच झाले. अचानक गुरुजींच्या पत्नीने, 11 लेकरांच्या माऊलीने जगाचा निरोप घेतला. सर्वात लहान लेक एक वर्षाची. घरावर आकाशच कोसळले. ते पूर्णपणे हतबल झाले. कसेबसे एक वर्ष कागलमध्ये काढल्यानंतर त्यांनी कोल्हापूरला जायचे ठरवले. तिथे वंशपरंपरागत असलेले घर होते. पण यांच्या वाटेला फारच कमी जागा होती. सर्व मुलांसह गुरुजी कोल्हापुरात आले. आणि पत्नीविना संसार सुरू झाला. मोठ्या मुली स्वयंपाक पाणी सांभाळत, लहान भावंडे सांभाळत. मोठे भाऊ शिकत असताना अर्थार्जन करुन वडलांना मदत करत. खाणारी तोंडे जास्त, कमावणारे हात अपुरे. त्या काळात अनेक परिवारांची हीच कहाणी होती.

गुरुजींची एक कन्या विद्या. ही नावाप्रमाणेच हुशार. अभ्यासातच नाही तर सुलेखन करणे, ते व्यासपीठावर सादर करणे यात ती अव्वल होती. बघता बघता मॅट्रिक झाली, 85% मार्क्स मिळाले. आपल्याला कॉलेजमध्ये जायला मिळावे, पुढे शिकायला मिळावे असे तिच्या मनात होते. पण तिच्या खालच्या दोघीनी 11वी नंतर न शिकता लग्न करुन वडलांचा व भावाचा भार हलका करावा हे मनोगत व्यक्त केल्याने तिघींचेही लग्न करुन देण्याचे त्यांच्या वडलांनी ठरवले. सुदैवाने विद्यासाठी एक सुंदर स्थळ सांगून आले. माणसं पुण्याची असल्याने तिला पुढे शिकण्यास वाव होता, अशी समजूत घालून तिचे लग्न करुन दिले.

... आणि कु. विद्या दिवाणची सौ. विद्या नाडगौडा झाली.

नाडगौडा हे जमखंडी या गावचे. कानडी ब्राह्मण. घरी सासू सासरे, मोठे दीर जाऊ मुले, धाकले दोन दीर, तीन नणंदा. अशा भरगच्च परिवारात दोन नंबरची सून म्हणून तिचा प्रवेश झाला. पती श्री. हणमंतराव नाडगौडा (नानासाहेब) हे उत्कृष्ट चित्रकार म्हणून प्रसिध्द होते. फोटो झिंको प्रेसमध्ये नोकरीला होते. घर खाऊन पिऊन सुखी होते. पण कानडी लोकांचे अतीव सोवळे -ओवळे करताना  विद्याताईना नाकी नऊ येत. कारण पूर्वी त्या सगळ्याची कधीच सवय नव्हती. लग्नानंतर सासरी रुळेपर्यंत पुढच्या शिक्षणाचा विषय काढण्याची हिम्मत नव्हती. सासूबाई अतिशय कर्मठ अणि कडक. सकाळ संध्याकाळ सोवळ्यात स्वयंपाक, जिन्यावरुन चौथ्या मजल्यावर घागरीने पाणी भरणे, यात दिवस कसा जाई ते कळतच नसे. सवय नसल्याने थकवा जाणवत होता. वडलांची, भावंडांची आठवण येत असे. मनात काहूर उठे. पण आलेला दिवस असाच जाणार हे ठरलेलेच होते. त्यांच्या धाकटया दिरांकडे बरीच पुस्तके होती. विद्याताई काम संपवून पुस्तके वाचू लागल्या. वाचनात खूपच आनंद मिळू लागला. मुळातच हुषारी असली की लपून रहात नाही. पतीकडून वही आणि पेन घेऊन त्यानी लिहिणे सुरू केले. घरचे काम करुन लिहायला रात्रच होत असे. कधी कधी मेणबत्तीच्या प्रकाशात लिहावे लागे, पण त्यांनी लिहिणे सोडले नाही.

एकदा वर्तमानपत्रात आलेली "समता" या मासिकाच्या कथालेखन स्पर्धेची जाहिरात वाचून विद्याताईंनी स्वत: लिहिलेली एक कथा त्या स्पर्धेसाठी पाठवली आणि त्या कथेला प्रथम पुरस्कार मिळाला. २५ रुपये रोख व मासिकाचे नाव असलेले रजत शिल्प हे पुरस्काराचे स्वरूप होते. ही बातमी पुणे, नाशिक, कोल्हापूर सर्वत्र प्रसिध्द झाली. पेपरात नाव छापून आले, सासऱ्यांना खूप आनंद झाला व अभिमान वाटला. ते चित्रशाळेत चित्रकार होते. त्यांना त्या क्षेत्रात खूप मान होता. या पारितोषकामुळे घरात विद्याताईच्याबद्दल आदर निर्माण झाला. सासूबाईच्या वागण्यातही बदल झाला. त्या प्रेमाने वागू लागल्या. सोवळे न येण्याकडे दुर्लक्ष करु लागल्या. तो काळ घरात सासू सासरे, वडीलधारे यांचे मान राखण्याचा होता.

एक दिवस विद्याताई दळण घेऊन येत असताना एक गाडी जवळ येऊन थांबली. आणि त्यातल्या बाईंनी जवळ बोलावले आणि विचारले, ‘ तू आमच्याकडे नोकरी करशील का? ’ त्या सौ. काणेवहिनी होत्या. समोरच्याच वाड्यात काणे यांचा मंदार प्रेस होता. तिथे श्री.. वसंतराव काणे यांचे " संध्या " हे सायंदैनिक व " रोहिणी " हे मासिक छापले जात असे. त्यांना प्रूफ रीडिंगसाठी  जबाबदार व्यक्ती हवी होती. विद्याताईचे लेखन त्यांनी वाचले होते. विद्याताईनी त्यांना “ घरी सासू सासरे व ह्यांची परवानगी घ्यावी लागेल, ” असं उत्तर दिलं. ताबडतोब काणेवहिनींनी  घरी येऊन परवानगी मागितली. तेव्हा सासूबाईनी घरातलं सगळं करुन दुपारी करु दे, अशी परवानगी दिली. अशी अर्धवेळेची नोकरी सुरू झाली. सुरवातीला चुका झाल्या, नंतर हळूहळू काम जमू लागले. ‘संध्या’ बरोबर ‘रोहिणी’चे कामही दिले गेले. पगारही वाढला.

ह्याच काळात पानशेत धरण फुटले. बातम्या, सूचना, लेख या कामात प्रचंड भर पडली. दिवसभर प्रेसमध्ये काम करुन रात्री पंधरा जणांच्या जेवणाची व्यवस्था करणे भाग होते. भाकऱ्या, भाजी, आमटी, भात हे तरी हवेच. दुहेरी काम  कष्टाचे होते, पण मनासारखे लेखनाचे काम असल्याने दडपण जाणवत नव्हते. श्री. वसंतराव काणे यांनी त्यांना

संध्या व रोहिणीचे सहसंपादक केले. हे प्रमोशन त्यांना आदर, पैसा, मान व प्रतिष्ठा घेऊन आले. हळूहळू त्या press  conference लाही उपस्थित राहू लागल्या. ‘सहसम्पादक’ बरोबरच, दैनिकची ‘ स्त्री पत्रकार ’ म्हणून त्यांची नवीन ओळख निर्माण झाली. त्या क्षेत्रात त्यांचे खूप नाव झाले. कुठल्याही press conference ला विद्याताई आल्याशिवाय कार्यक्रम सुरूच होत नसे. ‘ पुण्यातल्या पहिल्या महिला पत्रकार ‘ म्हणून गोवा, नाशिक, पुणे, मुंबई येथे त्यांचे नाव झाले. अनेक बक्षिसे मिळाली. अनेक राजकीय नेते, उद्योगपती यांच्या ओळखी झाल्या. श्री शरद्जी पवार तर विद्या ताई आल्याशिवाय मीटिंग सुरूच  करत नसत. तसे ते निक्षून सांगत. याचे कारण विद्याताईचे सत्य आणि शब्दश: अचूक लेखन. ते जे बोलत, ते जसेच्या तसे वाचकांपर्यंत पोचवण्याचे काम त्या काटेकोरपणे करत.

त्या वेळी नवीन सिनेमा release होण्याच्या पहिल्या दिवशी पहिल्या show साठी फक्त संपादकांना  pass मिळत असे. श्री. काणे हे त्या शोला विद्याताईंना पाठवत. कारण सिनेमा पाहून त्याचे यथार्थ वर्णन, परिक्षण शब्दबद्ध करणे हा विद्याताई यांचा हातखंडा होता. तत्परतेने ते त्या संध्याकाळी अंकात प्रकाशितही करत. त्यामुळे काणे खूष आणि सिनेमावालेही खूष. पुढे पुढे तर direct विद्याताईनाच pass येऊ लागले. एका नवोदित पत्रकाराने एकदा एका प्रसिध्द व्यक्तीला विचारले, की “ त्या इतरांसारख्याच साध्या पत्रकार आहेत, तर त्यांनाच  एवढे महत्व का दिले जात आहे?”  तेव्हा त्या व्यक्तीने सांगितले की, “ त्यांचे लिखाण चांगले असतेच, पण त्यांची तत्परता, सचोटी, विनम्र स्वभाव आणि साधेपणा ह्या गुणांनी " पत्रकार " या वर्गाला खूप उंची मिळवून दिली आहे. समाजात " पत्रकार" या घटकाला आदराचे स्थान मिळवून दिले आहे. म्हणूनच त्या सगळ्यात वेगळ्या आणि महत्वाच्या आहेत.”

पत्रकारितेबरोबर त्या पुणे रेडिओ केंद्रावरही अनेक कार्यक्रम, मुलाखती घेत असत. अनेक राजकीय नेते, समाज नेते, रंगभूमी व चित्रपट नायक-नायिका, गीतकार, संगीतकार, गायक, चित्रकार, शैक्षणिक क्षेत्रातले वरिष्ठ अधिकारी यांच्या भेटी व मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत.

पत्रकारिता क्षेत्रातही चांगले वाईट अनुभव आलेच. पण सर्व थरातील लोकांच्या ओळखी झाल्या. मान, प्रतिष्ठा मिळाली, तर कधी मानहानीही झाली. पण श्री. वसंतराव काणे व काणेवहिनींच्याकडून सर्व प्रकारची सुरक्षा मिळाली. नोकरीतही संरक्षण मिळणे अत्यावश्यक असते.

स्वर्गीय भारतरत्न लतादिदी, भारतरत्न भीमसेन जोशी, जगदीश खेबुडकर, श्री शरद पवार, यांच्यासारख्या दिग्गजांच्या मुलाखती हे त्यांच्या कारकिर्दीतील सोनेरी क्षण होते.

पत्रकारितेबरोबर अन्य लेखनही त्यांनी केले आहे. महत्वाचे म्हणजे, त्यांनी श्री राघवेंद्रस्वामींचे चरित्र  मराठीत लिहून प्रकाशित केले आहे. आणि स्वामींचे हे एकमेव पुस्तक मराठीत आहे. त्याला प्रास्ताविक भारतरत्न कै. भीमसेन जोशी यांचे आहे.

पुढे पुढे वयोमानानुसार त्यांना कामाच्या गतीला लगाम घालावा लागला. तरीपण लेखन सुरूच  होते. ओळखीचा फायदा पैशाच्या रूपात न घेता गरीबाला आर्थिक सहाय्य व इतर मदत करुन गरजूना हात देऊन वर काढणे, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

त्यांना भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, स्व. इंदिरा गांधी पुरस्कार, सेवारूप करुणामूर्ती भगवान बुध्द पुरस्कार, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार, भारत सरकारच्या संलग्न नेहरु युवा पुरस्कार अशा अनेक तारांकित पुरस्कारांनी गौरविले गेले आहे.

पूर्वी पत्रकारांना  निवृत्तीनंतर pension वगैरे नव्हते. त्याबाबतीत विद्याताईनी सरकारदरबारी प्रचंड प्रयत्न करुन ती सन्माननीय मदत सर्व पत्रकारांना मिळवून दिली.

आजही वयाच्या 87व्या वर्षी गरीबांना सर्वतोपरी मदत करण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय आहे.

एका लहानश्या खेड्यातून येऊन, सदैव कार्यरत राहून स्वत:चा उत्कर्ष घडविणे, विपरीत परिस्थितीत डगमगून न जाता नेटाने वाटचाल करणे, हाती घेतलेले काम तन मन लावून तडीस नेणे, हे त्यांच्या गुणालंकारित व्यक्तित्वाचे मोठेपण. ही जडणघडण होण्यामागे त्यांचे माहेर कोल्हापूर, तिथल्या शाळेचे- महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलचे संस्कार, सासरच्या लोकांचा पाठिंबा, पतीची साथ, तसेच काणे पती- पत्नीचे प्रोत्साहन, या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. असे त्या अभिमानाने सांगतात.

एकेकाळी नक्षत्राप्रमाणे चमकणारे व्यक्तिमत्व अर्थात पुण्यातील पहिल्या महिला पत्रकार श्रीमती विद्याताई नाडगौडा ह्या दाराआडच्या दिव्यासमान अजूनही इतरांना  प्रकाश देत आपले जीवन आनंदाने व उत्साहाने जगत आहेत. त्यांना दीर्घायुष्य लाभो व " दाराआडचा हा दिवा "  सदैव तेवत राहो या मनःपूर्वक शुभेच्छा.

सौ. अमृता देशपांडे - पर्वरी, गोवा.  मो. 9822176170



## लेख - आयुष्याचा चिरंतन प्रवास



सुश्री संगीता कुलकर्णी

हे मागचं वर्ष खूप काही शिकवून गेलं. बरे वाईट अनुभव घेत घेत आयुष्याचा एक पाढा मुखोद्गत झाला. मनाच्या पटलावर कोरल्या गेलेल्या या वर्षभरातल्या चांगल्या वाईट अनुभवांची उजळणी करायला गेले तेव्हा वाटलं की हे आपल्याला आलेले प्रत्येक अनुभव "एक आयुष्य समृद्ध करणारी आठवण" होऊन बसले आहेत. मानवी जीवनाचा हाच तर उद्देश नाही ना ? माणूस म्हणून आपण आपल्या या आठवणींमध्ये काय काय साठवतोय नाही.. चांगले वाईट अनुभव गाठीशी बांधून कित्येक जन्मोजन्मीच्या प्रवासात काय काय आत्मसात करतोय आपण..

या वर्षात मी खूप काही शिकले. या मागच्या पस्तीस-छत्तीस वर्षात पाटी बऱ्यापैकी कोरीच होती म्हणायचं का? किंवा रेघोट्या असतील फार फार तर आता जरा अक्षरांना लकब आलीये म्हणा ना आणि हे अनुभव आठवत बसले ना कि प्रत्येक वेळी नवं गुज नवीन गोष्टी सांगून जातात. दिवसभरात माणसांची ये जा ची वर्दळ असते. रात्री मात्रं वर्दळ कमी जवळ जवळ नसतेच आणि अश्या रात्रीच्या शांततेत दिवसभरात उमटलेल्या पाउलखुणा माझ्या मनात रेंगाळतात...

ते मी मन लावून ऐकते जे दिवसभरात चाललेले असते ते रात्रीच्या शांततेत आठवत राहतात आणि मी तशी वरचेवर या अनुभवांचा अर्थ लावत बसते. जसा काळ बदलत जातो तसे अनुभव ही अनुभव संपन्न होत जातात आणि त्याबरोबर मी ही..

प्रत्येक गोष्ट दैवाने ठरवल्याप्रमाणे होते. पण त्या नशिबापर्यंत जाण्याचा जो मार्ग आहे ना तो आपण निवडतो कदाचित... मग कधी या रस्त्यावर खाच-खळगे असतात कधी काट्याकुट्यांचा तर कधी फुलांच्या पायघड्या घातलेला.. फुलांच्या पायघड्या असल्या की आपण खूप सुखावतो.. वाटतं नकोच आता या आपल्या प्रवासात काट्याकुट्यांचा, खाचखळग्यांचा आणि दगड गोट्यांचा रस्ता. मग समजा नदीकाठची अगदी गार वाळू जरी लागायला लागली ना तर तीही नकोशी वाटते, कारण पायांना फक्त फुलांची सवय झालेली असते ना... पण या नदी काठावर चालल्याशिवाय खळाळत्या पाण्याचा, पाण्यात पोहोणा-या बदकांचा, रंगीबेरंगी शिंपल्यांचा आनंद तर घेता येणार नाही ना.. ! त्यामुळे रस्ता हा कितीही खडतर असला तरी आपण त्यातून किती नी काय काय मिळवत असतो हे महत्वाचे..

माझी आजी माझ्या आईला नेहेमी विचारायची, “ तू देवाजवळ काय मागतेस ? ” आईचं उत्तर असायचं, “ घरात सुख, समृद्धी असू दे, सगळ्यांचं भलं कर हेच मागते ”. मग आजी म्हणायची, “ बाई गं देवाजवळ माग की पुढचा जन्मही बाईचाच दे... !!” आजी असं का म्हणायची हे आता कळायला लागलंय- आलेल्या अनुभवानंतर..

स्त्री जन्मात केवढं काही अनुभवतो ना आपण.. सगळ्या भावना, संवेदना जणू खोलवर रुजलेल्या असतात. प्रेम, समर्पण, त्याग, सेवा असं किती काही आपसूकच देत जाते स्त्री.. तिच्याकडचं असलेलं सगळं ती ओंजळीने वाटत जाते... बिना तक्रार करता... हसतमुखानं... !

स्त्री जन्म मिळाला ना की ' दाता ' होता येतं... तसंच ' तितिक्षा ' हा एक गुण माणसात असणं सहज सोपं नाही. ती तितिक्षा आपल्या घरातल्या आई, आजीच्या जीवनाचं तर गमक असते. त्याग करत जे काही वाट्याला येतंय, पदरी पडतंय त्याचा भोग घेणं, हे किती सहज जमतं या सगळ्या लेकी, सुना, आयांना... आयुष्याच्या गोड संवेदनांसोबत वाईट संवेदनाही येणारच की... जसा पर्वत चढायचा म्हटलं की सोबत दरीची भीती येणारच ना.. सगळ्या चांगल्या  वाईट भावभावना एकमेकांत गुंफलेल्याच असतात जणू. म्हणतात ना प्रेम येताना हातात दुःखाचा दिवा घेऊन येतं, पण त्या दुःखाच्या दिव्याने का होईना त्या चिरंतन प्रेमाची ओळख तरी पटते. त्या प्रेममय देवापर्यंत पोहोचण्याचा केवढा महत मार्ग मोकळा होतो नाही या जन्मात ? असाच जन्मोजन्मीचा प्रवास करत असतो आपण... पडत धडपडत शिकत अनुभव गाठीशी बांधत चालत असतो...

आयुष्य म्हणजे खरंच चिरंतन प्रवास आणि आपण एक प्रवासी पक्षी. कुसुमाग्रजांच्या कवितेतले प्रवासी पक्षी... जे प्रवास करतायत तिमिराकडून तेजाकडे. भेदतायत हे आकाश, हे सूर्यमंडळ आणि करतायत प्रवास अनंताचा. पण हा प्रवास ज्याचा त्याचा असतो. या प्रवासात अनेक पक्षी आपल्याला भेटत जातात आणि या भेटत गेलेल्या पक्ष्यांची शुभ्र माळ तयार होते... तयार होत जाते..

सुश्री संगीता कुलकर्णी - लेखिका/ कवयित्री - ठाणे 9870451020



# लेख - मी कृतज्ञ आहे..... माझ्या सुपरमूनची.....



सुश्री ज्योती विलास जोशी

कृतज्ञ आणि कृतघ्न हे दोन शब्द लहानपणी लिखाणात गफलत करायचे आणि संपूर्ण लेखनआशयाचा अर्थच बदलायचा. तसेच हे दोन्ही शब्द आपल्याही विचारांची आणि आयुष्याची दिशा बदलतात असा विचार मनाला चाटून गेला. जेव्हा 'बाळा होऊ कशी उतराई' असं म्हणत महान मंगल आईचा झोत मिळालेली ती माता कृतज्ञ होते, तेव्हा माझं जीवन आनंदमय सुखमय करणाऱ्या सगळ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करायला मन सरसावतं. ज्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करावी त्यांची मी केलेली यादी 'लाखो तारे आसमान में' अशी झाली.

– तुझं माझं नातं अगदीच जवळचं ! तू माझा मामा !! माझ्या आन्दामामाला (आनंदा मामा) मी चंदामामा म्हणायची... अजूनही म्हणते. आईच्या हातात माझं इवलसं बोट होतं. ते तुझ्या हातात सोपवून ती गेली. माझी कायमची साथ सोबत करायची हे आश्वासन घेऊन गेली ती तुझ्याकडून.... तिला दिलेल्या वचनांना तू बांधील राहून सतत माझ्यासोबत असतोस. माझ्या जीवनाचा साक्षीदार! 'आई होऊ कशी उतराई?' हा प्रश्न अनुत्तरीतच राहिला. नकळत कृतज्ञतेच्या भाव भावनांनी ऊर भरून आलंय.... लहानपणापासूनचा सगळा जीवनपट डोळ्यासमोरून तरळून गेला, आणि मी तुझ्याप्रती नतमस्तक झाले–

– 'सुपभर लाहया आणि त्यात रुपया ' असं आज चैत्र पौर्णिमेला दिसलेलं तुझं लोभस रूप जीवाला वेड लावून गेलं. त्या यादीतल्या तुला नजरेत भरूभरून घेतलं मी. कृतज्ञतेने आपोआप माझे कर जुळले –

लहानपणी मी तुझ्यावरच गस्त ठेवायचे. कधी आकाशात राज्य करत असल्यासारखा समोर दिसायचास, तर कधी लिंबोणीच्या झाडामागे लपून बसायचास, .... अनंतफंदी आहेस खरंच ! तू तुझ्या चिरेबंदी वाड्यात मला नेलंस. चांदोबा चांदोबा भागलास का? असं म्हणत त्या कोवळ्या वयातच ते नातं फुलत गेलं. रात्री तू ससा हरीण यांना मांडीवर घेऊन बसायचास. तेव्हा आई मला तुला 'मृगांक' 'शशांक' असं का म्हणतात, त्याची गोष्ट सांगायची. मलाही तुझ्या मांडीवर बसावसं वाटायचं. कधी कधी ढगांसोबत तू पुढे पळायचास आणि मी तुझ्या पाठोपाठ यायचे.

– हा पाठशिवणीचा खेळ तरुणाईतही चालू राहिला. मात्र आता तू माझा पाठलाग करू लागला होतास, कोणतीही असूया मनात न ठेवता. 'आधा है चंद्रमा रात आधी ' म्हणत तुझ्या चांदण्यात फिरणारी मी, 'चंदा रे, चंदा रे कभी तो जमी पे आ' अशी आस घेऊन तुला बोलवू लागले. एक गुलाबी रंगाची छटा तुझ्यात दिसलीच मला, तुझा नेहमीपेक्षा मोठा आकार मात्र डोळ्यात मावेना झाला होता माझ्या... विलोभनीय होतं सगळं... प्रेम जडलं माझं तुझ्यावर.... तू माझा सखा होतास अगदी जिवाभावाचा !पण आजही तू तोच माझा चंद्र आहेस ना? की बदलला आहेस. आजही कापरं भरतं अशा विचारानं.... असं का वाटलं मला? असं का झालं साशंक मन माझं? अरे तुझ्या या रूपाला कोणीतरी 'नवीनचंद्र' असं म्हणालं म्हणून.... एरवी काय कमी देखणा आहेस? माझ्यासाठीचं तुझं असणं, हे निकोप निरागस असं.... तुझ्या चांदण्यात फिरताना त्यानं माझा हात हातात घेतला होता. तूही माझ्यासोबतच होतास. तो माझ्या हृदयाचं गूज जाणून घेत होता तेव्हा माझी पावलं तुझ्या लयीत चालत होती. तुझ्या चांदण्यात फिरताना माझ्या सख्याचा ' श्वास जणू मालकंस... स्पर्श जसा पारिजात ' हीच अनुभूती आली.

रुपेरी रस्ता, गुलाबी थंडी, चांदण्यांची शीतलता, तुझी सोबत आणि त्याचा हात हातात.. सुख म्हणजे नेमकं हेच असतं ना?..........

– तू आमच्या स्वप्नगंधित क्षणांचा साक्षीदार होतास. प्रीतिच्या चांदराती, अबोल नातं जोडताना तुझी साथ होती. कलेकलेने वाढणारा आणि पौर्णिमेला पूर्णाकृती होणारा तू मला सूर्यापेक्षाही जास्त आवडतोस. सूर्याप्रमाणे आग ओकत नाहीस ना तू.. म्हणून.. लख्ख चांदण्यांचा सडा टाकून किती गोड हसतोस रे.. कोजागरीचं तुझं सुंदर दर्शन एक विलक्षण अनुभूती!! सृष्टीची निर्मिती करणाऱ्याने सर्वांना या आकाशाकडे बघण्याची एक नवी दृष्टी दिली आहे तिचं निमित्त तू आणि तुझ्या चांदण्या.. प्रत्येक रूपात सुंदर दिसतोस. मग ती चंद्रकोर असो किंवा पूर्ण चंद्र. जशी ललनेच्या भाळी चंद्रकोर, किंवा गोल कुंकू शोभून दिसते ना? अगदी तसंच. माझं पूर्ण आयुष्य आणि माझ्या रात्री आनंदाने भरून टाकणाऱ्या तुझी उतराई कशी होऊ रे? तुझे उपकार कसे फेडू?

– मी आई होणार होते. ग्रहण पाळायचं होतं, त्या दिवशी मात्र तुझं दर्शन नाही झालं... आयुष्यात पहिल्यांदाच चुकल्याचुकल्यासारखं झालं. एरवी कोजागिरीला पिठूर चांदणं अंगावर घेत, कधी ढगाआड लपलेल्या तुला शोधत, तुझ्या कोमल प्रकाशात तुझी आभा नजरेत भरत, तुझी शितलता अनुभवत, तुझ्यासोबत जुन्या स्मृतींची ओंजळ भरत भरत चालणारी मी... तुझ्यासाठी आतुर होते. बिलंदर तू- आता माझ्या लेकराचा  मामा झालास. कसं जमतं तुला हे सगळं?माझ्याशी खेळलेले खेळच तू त्याच्याबरोबर खेळलास. निंबोणीच्या झाडामागे लपलास आणि इकडे माझ्या लेकराच्या पापण्या अलगद मिटल्या. चैतन्यमयी आहेस बघ तू अगदी!! किती उपकार आहेत तुझे माझ्यावर....

– तुझ्या बदलत्या रूपासोबत माझं वयही वाढत गेलं. पण तू अजूनही कसा उत्कट, ताजा, टवटवीत, प्रसन्न? कधी मंदिराच्या कळसावर चिंतन करत असल्यासारखा दिसतोस, तर कधी नदीच्या डोहात थरथरत असतोस. पांढऱ्या रंगातला लख्खपणा दाखवणारा तूच! भरगच्च शीतलता देऊन चराचराला तृप्त करणारा तूच!! आकाशभर चांदण्यांचा चुरा सांडणारा तूच!! कैवल्याच्या चांदण्याला चकोर देखील भुकेला, तिथं आमचं काय? वाढत्या वयात तरल तृप्तीची, समाधानाची शीतलता, प्रसन्नतेची आभा देणारा तू, अंधारातून प्रकाशाकडं नेणारी एक अनामिक ओढ निर्माण करतोस. एक अजब किमयागार आहेस तू.. तुझ्या सहस्त्र दर्शनाने घडणारा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा दीर्घायुष्याची साक्ष देतो. त्याकडे आमची वाटचाल. आकाशाचं अद्भुत अनाकलनीय असीमित असं सौंदर्य अबाधित ठेवणाऱ्या तुझं, सगळेच कौतुक करतात. 'हे सुरांनो चंद्र व्हा, चांदण्याचे कोष माझ्या प्रियकराला पोचवा' ही तरुणाईतील आर्तता आताशा' चंद्र व्हा हो पांडुरंगा' म्हणत... भक्तिमार्गाकडं झुकतीये. तुझं मन थोर आहे असं आम्ही म्हणतोय. लक्षात येतंय ना तुझ्या? चंद्रासारखी गोल भाकरी, चंद्रकोरीसारखी कोर भाकरी... अशी रोज तुझी आठवण काढत मी घास घेते. तुझ्या उपकाराची परतफेड कशी करू ?

– आता थोडे आशेचे किरण दिसायला लागलेत मला. आता तू अप्राप्य राहिला नाहीस म्हणे... 'रामाला ग चंद्र हवा' ही नवलाई संपत आलीये म्हणे... तुझा सातबारा मिळायला लागलाय म्हणे.... आता तुझं रूपडं पहायचं नयनसुख अनुभवायला मिळणार आहे म्हणे...' चलो दिलदार चलो चाँद के पार चलो 'असं म्हणत मी ह्यांच्याबरोबर तुला भेटायला येईन. आता तू जरी भागलास आणि निंबोणीच्या झाडामागे लपलास, तरी मी तुझी कृतज्ञता व्यक्त करायला अंतरिक्षात येईन हं...

**सुश्री ज्योती विलास जोशी -** इचलकरंजी. मो. नं. 9822553857 ईमेल - jvilasjoshi@yahoo.co.in



# लेख - "जागृत ग्राहक व्हा"

ॲड. ज्योत्स्ना (सावळे) डासाळकर

दिवाळी जवळ आली की एकावर एक फ्री! सेल ! सेल ! ५०% ६०% ! चंदूकाका सराफ, गाडगीळ सराफ - दागिन्यांच्या किमतीवर १०% सूट, तूट, घडणावळ मोफत इ. इ. जाहिरातींचे कॉंग्रेस गवतासारखे उदंड पीक येते. विविध योजना, सुवर्ण भिशी, पतसंस्था / व्यापारीवर्ग जाहीर करतात. आणि आकर्षक जाहिराती व चमकदार योजनांना ग्राहकवर्ग बळी पडतो. विशेषतः महिलावर्ग तर अधिकच. भुलवणारी माणसे हल्ली जाहिरात करून "आभासी स्वप्न दुनियेत" नेतात आणि ग्राहकवर्ग त्यात रमतो आणि व्यावहारिक जगात आपली प्रचंड फसवणूक करून घेतो.

म्हणूनच आपल्या ग्राहकांच्या हातात " ग्राहक संरक्षण कायद्याचे " अमोघ शस्त्र दिलेले आहे. आपल्या ग्राहकांचे हक्क आणि सदोष वस्तू नाकारण्याच्या अधिकारांचे संरक्षण करणारा हा " ग्राहक संरक्षण कायदा २०२० " आहे. मात्र ह्यासाठी आपल्याला आपले हक्क व अधिकारांची जाणीव व्हायला हवी. ' ग्राहकराजा जागा हो ' ह्या उक्तीनुसार ग्राहकराजा खरोखर जागृत व्हायला हवा.

पाऊस पडला की सुगी येते त्याचप्रमाणे दसरा दिवाळी पाडवा इ. सणांबरोबर खरेदी- विक्रीसाठी अलोट गर्दी होते. आणि उत्पादकवर्गास "उदंड झाले पीक" अशी अवस्था होते. " एकदा विकलेला माल परत मुळीच घेतला जाणार नाही " असा फलक सर्वत्र दुकानात असतो. आणि दुसरीकडे जवळच " ग्राहकांचा संतोष हेच आमचे ध्येय " असाही फलक असतो. पण आपण हे जागरूकतेने माहित करून घेतले पाहिजे की " ग्राहक संरक्षण कायद्यातील " कलम २ (जी) नुसार " मालात काहीही उणीवा, दोष, त्रुटी " आढळल्यास विक्रेत्याने ग्राहकास कोणत्याही परिस्थितीत माल परत बदलून दिलाच पाहिजे. मालाचे जेव्हा फायदे इ. वर्णन करून विक्री केली जाते, तेव्हा त्याचे ते फायदे किवा त्या वर्णनानुसार तो माल असावा. उदा. दुचाकी / चारचाकी वाहनाची जाहिरात केली जाते - एक ली. इंधनामध्ये अमुक कि. मी. जाते, आणि जर त्याप्रमाणे ते वाहन नसेल, तर ग्राहकास दिलेल्या आश्वासनाचा तो भंग ठरतो. अशावेळी तुम्ही तुमचा विक्रीकरार रद्द करू शकता किंवा नुकसानभरपाई मागू शकता. अशावेळी आपण ग्राहक संरक्षण कायद्याखाली निश्चित संरक्षण - न्याय मागू शकतो. " ग्राहक संरक्षण कायदा " हा फसलेल्या ग्राहकांसाठी एक कल्पवृक्षच आहे. अर्थात ग्राहकांनी पण त्याचा गैरफायदा घेऊ नये. डझनभर "संतूर" वापरून पुरुषवर्गाच्या पत्नीने अंघोळ केली, तरी "मम्मी" म्हणून तुमचे मूल हाक मारणार नाही किंवा लक्सच्या जाहिरातीमधील रमणीचे रहस्य सांगणारी करीना कपूर होणार नाही. ऑनलाइन शॉपिंग ही बदलत्या काळाची गरज आहे. टी व्ही वर तर ऑनलाईन शॉपिंगचे - आकर्षक सवलती सांगणारे चॅनलचआहे. अमेझॉन इ. सारख्या कंपन्यांमुळे खरेदीचे प्रमाण तर वाढले आहेच, पण त्याचबरोबर फसवणूकीचे पण !! परंतू अत्यंत खेदाची गोष्ट ही आहे की सुशिक्षित ग्राहकांना आपल्या फसवणुकीची जाणीव होते परंतू त्या अन्यायासाठी दाद कशी - कुठे मागावी याचे ज्ञान नसते. या अज्ञानाच्या

अंधारात तुमच्या हाती दिवाळीच्या आधीच "ग्राहक संरक्षण कायद्याचा" एक तेजोमय ज्ञानदीप चेतवण्याचा हा माझा एक प्रयत्न आहे.

"ग्राहक संरक्षण कायदा १९८६ / २०२०" ने आपल्याला दिलेले अधिकार खालील प्रमाणे आहेत—

१. सुरक्षिततेचा हक्क

२. विक्रीवस्तू वर्णनानुसार असण्याचा हक्क

३. वस्तू निवडण्याचा व सदोष वस्तू नाकारण्याचा हक्क

४. जनहित याचिका करून ग्राहक न्यायालयाकडे आपण दाद मागू शकतो.

आपण आपली कोणतीही रास्त व योग्य तक्रार या न्यायालयाकडे - प्रत्यक्ष व नवीन सुधारित ग्राहक संरक्षण कायद्यानुसार ऑन लाईन देखील करू शकतो. नवीन सुधारित ग्राहक संरक्षण कायद्याने तर जुन्या ग्राहक संरक्षण कायद्यापेक्षा खूप सहज सुलभ महत्वाचे बदल करून आपल्याला न्यायाचे दालनाच खुले केले आहे. फक्त यासाठी आपण "सतर्क व जागरूक" ग्राहक बनले पाहिजे.

१. सोन्याच्या वस्तू किंवा अन्य वस्तू खरेदी करताना हॉल मार्क / ॲगमार्क पाहिले पाहिजेत.

२. खरेदी करताना वस्तूचे वर्णन व दर्जा, तसेच वस्तूची एक्सपायरी डेट इ. पाहिली पाहिजे.

३. मोबाइल / इलेक्ट्रॉनिक / इलेक्ट्रिकल वस्तूंचा वापर कसा करावा याबद्दलची पुस्तिका / गॅरंटी कार्ड इ. घेतलेच पाहिजे.

विनाविलंब, अत्यंत कमी खर्चिक, प्रसंगी वकीलही न देता आपणच आपली बाजू मांडून न्याय मिळवून देणारी ही न्याय प्रक्रिया म्हणजे - ग्राहक तक्रार निवारण कार्यालय ! याबद्दल नंतर कधीतरी बोलूया.

**दीपावलीच्या तुम्हा सर्व ग्राहक बंधू भगिनींना शुभेच्छा ! आणि खरेदीसाठी जागरूक राहून खरेदी करा ही विनंती !**

**एवंच, ग्राहकराजा जागा हो!**


ॲड. ज्योत्स्ना (सावळे) डासाळकर एम.ए., एल.एल.बी. कोल्हापूर. मो. नं. ९५१८७७८८२४

# लेख - जेम्स वेब अंतरिक्ष दुर्बीण



श्री राजीव गजानन पुजारी

२५ डिसेंबर २०२१ ला भारतीय वेळेनुसार संध्याकाळी पाच वाजून पन्नास मिनिटांनी अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था अर्थात NASA ने खगोलशास्त्राच्या इतिहासातील सर्वात मोठी व सर्वात सक्षम अशी दुर्बीण अंतराळात प्रक्षेपित केली. ही दुर्बीण फ्रेंच गयाना येथील अंतराळ स्थानकावरून एरियन-५ या प्रक्षेपकाद्वारा प्रक्षेपित करण्यात आली. या दुर्बिणीचे वजन ६२०० किलोग्रॅम आहे. या दुर्बिणीचे नांव आहे जेम्स वेब स्पेस टेलिस्कोप- अर्थात JWST. ही दुर्बीण विश्वाच्या आरंभीच्या टप्प्यांचे सिंहावलोकन करेल, महास्फोटानंतर (Big bang) लगेचच अस्तित्वात आलेल्या आकाशगंगा आणि तारे यांचे निरीक्षण करेल, ताऱ्यांभोवती ग्रहमाला कशा निर्माण झाल्या यांविषयीचे यथार्थ ज्ञान देईल. यामुळे आपली सौरमाला कशी अस्तित्वात आली याविषयीच्या आपल्या ज्ञानात भर पडेल. या दुर्बिणीद्वारा आपणास १३. ८ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या विश्वात डोकावता येईल.



ही दुर्बीण अमेरिकेची अंतराळ संस्था -नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन (NASA), कॅनेडियन स्पेस एजन्सी (CSA) आणि युरोपीयन स्पेस एजन्सी (ESA) यांच्या संयुक्त भागीदारीतून विकसित करण्यात आली आहे. ही दुर्बीण हबल अंतरिक्ष-दुर्बिणीने रचलेल्या पायावर कळस उभा करेल आणि विश्वाची रहस्ये उलगडण्याचे काम करेल.

विश्वाच्या प्रारंभीच्या आकाशगंगा कशा दिसत होत्या, त्यांची निर्मिती कधी झाली या प्रश्नांची उकल करण्यासाठी जेम्स वेब दुर्बिणीची निर्मिती करण्यात आली आहे. ही दुर्बीण कोणत्या गोष्टींचा अभ्यास करणार आहे हे चांगल्या प्रकारे समजण्यासाठी पहिला तारा जन्माला येण्यापूर्वी विश्वाच्या प्रारंभीच्या काळात काय घडले होते हे समजणे आवश्यक आहे.

विश्व, काळ आणि अवकाश हे सर्व १३. ८ दशलक्ष वर्षांपूर्वी महास्फोटातून निर्माण झाले. पहिली काही लाख वर्षे हे विश्व प्रोटोन्स, इलेक्ट्रॉन्स व न्यूट्रॉन्सचा उष्ण व घन असा महापूर होता. जसजसे विश्व थंड होऊ लागले, तसतसे प्रोटॉन्स व न्यूट्रॉन्स यांचे एकीकरण होऊन आयोनाइज्ड हैड्रोजन व हेलीयम निर्माण झाले. त्यांच्यावर घन विद्युतभार होता. या सर्व घनभारित द्रव्याने ऋणभारित इलेक्ट्रॉन्सना आकर्षित केले. पुनर्संयोजन नावाने ओळखली जाणारी ही प्रक्रिया बिग बँग नंतर २, ४०, ००० ते ३, ००, ००० वर्षांनी घडून आली. जो प्रकाश पूर्वी या घट्ट दाटलेल्या आयोनाइज्ड प्लाझमामुळे विकरण झाल्याशिवाय प्रवास करू शकत नव्हता तो आता मोकळेपणाने प्रवास करू लागला. मागे वळून पाहताना, सर्वप्रथम निदर्शनास आलेला प्रकाशाचा प्रकार हाच, आणि तो बिग बँग नंतर सुमारे चार लाख वर्षांनी अस्तित्वात आला. याला " वैश्विक मायक्रोवेव्ह बॅकग्राउंड रेडीएशन " म्हणतात. याला खरे म्हणजे बिग बँग नंतर जे विश्व उदयास आले त्या विश्वातील वेगवेगळ्या ठिकाणांच्या तापमानाचा आलेखच म्हणावा लागेल. हे तपमानातील चढउतार दीर्घिकांच्या निर्माणाचे संकेत देतात आणि दीर्घिकांच्या रचनांसंबंधी सर्वसाधारण माहिती देतात. अजूनपर्यंत

विश्वात ताऱ्यांचा उगम झालेला नव्हता. या वेळेपासून ताऱ्यांचा उगम होण्याच्या कालावधीला वैश्विक कृष्णयुग (Cosmic dark age) म्हणतात.

सध्याच्या सिद्धांतानुसार अगदी सुरुवातीचे तारे खूप मोठे, म्हणजे आपल्या सूर्याच्या ३० ते ३०० पट होते. ते लवकरच नाश पावले आणि फक्त काही दशलक्ष वर्षांतच त्यांचे रूपांतर सुपरनोव्हांमध्ये झाले. या अत्यंत तेजस्वी सुपरनोव्हांचे निरीक्षण करणे हा विश्वाच्या सुरुवातीच्या ताऱ्यांचा अभ्यास करण्याचा एक मार्ग आहे. अगदी सुरुवातीला निर्माण झालेल्या आकाशगंगांसारख्या खगोलीय पिंडांच्या अभ्यासासाठी हे अत्यंत महत्वाचे आहे.

जेम्स वेब दुर्बिणीचा उपयोग करून वैज्ञानिक सध्याच्या आकाशगंगा व सुरुवातीच्या आकाशगंगा यांचा तौलनिक अभ्यास करतील. त्यावरून त्यांना सध्याच्या आकाशगंगा कशा निर्माण झाल्या, त्यांना सध्या असणारे आकार कसे प्राप्त झाले, आकाशगंगांदरम्यान रासायनिक मूलतत्वांचे वितरण कसे झाले, आकाशगंगांच्या केंद्रास्थानी असणारी कृष्णविवरे त्या त्या आकाशगंगांवर कसा प्रभाव टाकतात, दोन आकाशगंगा जेव्हा एकमेकांवर आदळतात तेव्हा काय होते या सर्वांविषयी अगदी खात्रीलायक ज्ञान मिळेल.

तारे व त्यांची ग्रहमंडळे धूळ व वायू यांच्या ढगांमध्ये निर्माण होतात. या धूळ व वायू यांच्या ढगात दृश्य प्रकाशाद्वारे डोकावता येणार नाही. म्हणून वेब दुर्बीणीवर अशी वैज्ञानिक उपकरणे बसवली आहेत, जी या धूळ व वायू यांच्या ढगांत इन्फ्रारेड किरणांच्या मदतीने डोकावू शकतील. या धूळ व वायूच्या ढगांवर ज्यावेळी इन्फ्रारेड लाईट पडेल त्यावेळी ज्यापासून तारे उत्पन्न होतात अशा अत्यंत दाट अशा भागांभोवतालची धूळ चमकू लागेल व अशा भागांचा अभ्यास विस्तृतपणे करता येईल. त्यामुळे खगोल शास्त्रज्ञांना ताऱ्यांचा जन्म कसा झाला याचा सखोल अभ्यास करता येईल. तसेच बहुसंख्य तारे समूहातच का उत्पन्न होतात, ग्रहमंडळे कशी उत्पन्न झाली यांचा शोध घेता येईल.

आपल्या सौरमालेबाहेरील ग्रह, ज्यांना बहिर्ग्रह म्हणतात, त्यांचा शोध पहिल्यांदा इ. स. १९९२ मध्ये लागला. त्यानंतर खगोलशास्त्रज्ञांनी हजारो बहिर्ग्रह शोधून काढले; आणि फक्त आपल्या आकाशगंगेतच शेकडो दशलक्ष बहिर्ग्रह आहेत असे खगोल शास्त्रज्ञांचे मत आहे. त्यांचेविषयी अधिक माहिती, त्यांचे वातावरण कशापासून बनलेले आहे, त्यांच्यावरील हवामान व ऋतू यांचा अभ्यास जेम्स वेब दुर्बीणीच्या मदतीने केला जाईल.

आपल्या सौरमालेतील ग्रह आणि इतर खगोलीय पिंड यांचा अभ्यासदेखील वेब दुर्बिणीद्वारे केला जाईल. हा अभ्यास मंगळाकडे पाठविलेल्या ओर्बिटर्स, लँडर्स आणि रोव्हर्सद्वारे केल्याजाणाऱ्या जिवाश्मांच्या अभ्यासासाठी पूरक ठरेल. ही दुर्बीण आपल्या सौरमालेतील बर्फाळ धूमकेतूंचा अभ्यास करण्यासाठी सक्षम आहे. शनी, युरेनस व नेपच्यून या ग्रहांच्या अभ्यासासाठीसुद्धा ही दुर्बीण वापरली जाईल.

अतिप्राचीन आणि अतिदूर आकाशगंगांचा वेध घेण्यासाठी वेब दुर्बिणीवर अशी उपकरणे बसवली आहेत, जी अवरक्त किरणांजवळच्या आणि अवरक्त किरणांच्या मध्यभागीय तरंगलांबींसाठी संवेदनशील आहेत. या आकाशगंगांकडून येणाऱ्या प्रकाशाला पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी अब्जावधी वर्षे लागतात. त्यामुळे ज्यावेळी

आपण हे खगोलीय पिंड बघतो त्यावेळी आपण त्यांची अब्जावधी वर्षांपूर्वीची प्रतिमाच बघत असतो. एखादी वस्तू पृथ्वीपासून जेव्हढी दूर, तेव्हढीच जास्त काळाच्या मागे ती असताना आपण तिला बघत असतो. त्यामुळे एकाद्या वस्तूपासून निघालेला प्रकाश जर १३. ८ अब्ज वर्षांनंतर आपणापर्यंत पोहोचत असेल, तर विश्वाची अगदी सुरुवातीची अवस्था आपण बघत असतो.

आपण जाणतोच की, महाविस्फोटानंतर पासूनच हे विश्व प्रसरण पावत आहे. त्यामुळे त्यांच्यापासून निघालेल्या प्रकाशलहरी ताणल्या जात असतात. एका रबराच्या पट्टीला शाईचा ठिपका लावून नंतर ते रबर ताणल्यावर तो ठिपका जसा ताणला गेलेला आपण बघतो तसेच हे आहे. याचाच अर्थ असा की, दूरस्थ अवकाश पिंडांपासून निघालेल्या प्रकाशलहरींची तरंगलांबी सुरुवातीला दृश्य प्रकाशलहरींच्या तरंगलांबीएव्हढीच असते, पण प्रकाशलहर ताणली गेल्यामुळे ती तरंगलांबी अवरक्त प्रकाशलहरीच्या तरंगलांबीच्या क्षेत्रात पोहोचते. यालाच वैज्ञानिक ताम्रसृती (redshift) म्हणतात, आणि पिंड जेव्हढा दूर, तेव्हढीच जास्त ताम्रसृती आपणास अनुभवायला मिळते.

वेब दुर्बिणीवरील अवरक्त किरणांसाठी संवेदनशील असणारी उपकरणे वैज्ञानिकांना महास्फोटानंतर तयार झालेल्या सुरुवातीच्या ताऱ्यांचा अभ्यास करण्याची संधी देतील. नंतर या ताऱ्यांचा स्फोट होऊन सुपरनोव्हाच्या घटना घडल्या. त्यातून जी मूलद्रव्ये व धूळ बाहेर फेकली गेली, त्यापासून ग्रह निर्माण झाले व कालांतराने काही ग्रहांवर सजीवांची उत्पत्ती झाली.

सुरुवातीचे तारे महाप्रचंड होते. त्यांचा कार्यकाळ संपल्यावर त्यांचे रूपांतर सुपरनोव्हा स्फोटांमध्ये झाले. त्यांचा प्रकाश जसजसा दूर जाऊ लागला, तसतसा तो मंद मंद होत गेला. हा अतिमंद प्रकाश 'बघण्यासाठी' वेबवरील उपकरणे तशीच संवेदनशील असायला हवीत. एकाद्या दुर्बिणीची संवेदनशीलता किंवा मंद प्रकाश 'बघण्याची' त्याची क्षमता ही त्या दुर्बिणीच्या भिंगांच्या किंवा आरशांच्या आकारामानाशी निगडित असते. वेबवर अठरा षट्कोनी आरसे मधमाशांच्या पोळ्यासारखे एकत्र करून एकावीस फूट लांबीचा मोठा आरसा तयार करण्यात आला आहे. उड्डाणावेळी हे आरसे घड्या करून ठेवण्यात आले आहेत व दुर्बीण तिच्या कक्षेत प्रस्थापित झाल्यावर या घडया उलगडण्यात येतील.

हबल अवकाश दुर्बिणीच्या आरशाचा व्यास आठ फूट आहे. वेब दुर्बिणीच्या आरशाच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ हबलपेक्षा सहापट असल्यामुळे तो अतिदूर अंतरावरून येणारे प्रकाशकण जास्त प्रमाणात 'गोळा' करू शकेल. या प्रकाशकणांना फोटोन्स म्हणतात. अतिदूरच्या आकाशगंगांची छायाचित्रे घेण्यासाठी हबलला त्या अंधुक दिसणाऱ्या आकाशगंगांचे सोळा दिवसपर्यंत 'अतिदूर क्षेत्रीय' वेध घ्यायला लागायचे, वेबला मात्र ही निरीक्षणे फक्त सात तासांतच करता येतील.

वेब दुर्बीण तिचा वैज्ञानिक विदा (data ) अवरक्त प्रकाश स्वरूपात गोळा करते. अब्जावधी प्रकाशवर्षे दूर असलेल्या अवकाश पिंडांकडून येणाऱ्या क्षीण प्रकाशाचे अवलोकन करायचे म्हणजे दुर्बिणीच्या अंतर्भागात असलेली उपकरणे अतिशीत वातावरणात ठेवायला लागतात, नाहीतर दुर्बिणीच्या उष्णतेमुळे ते क्षीण अवरक्त संकेत नाहीसे होतात. वेबच्या अभियंत्यांनी हे साध्य करण्यासाठी दोन प्रणालींचा अवलंब केला आहे.

वेब दुर्बीण पृथ्वीपासून एक दशलक्ष मैलांवर लॅगरेंज बिंदू -२ वर प्रस्थापित करण्यात आली आहे. या बिंदूवर स्थित राहून ती सूर्याभोवती परिभ्रमण करणार आहे. पृथ्वीपासून पुरेशा दूर अंतरावर असल्यामुळे पृथ्वीच्या उष्णतेचा तिच्यावर परिणाम होणार नाही. पण हे एवढेच पुरेसे नाही. उपकरणांचे तपमान अजून कमी करण्यासाठी दुर्बीण तिच्या निर्धारित कक्षेत प्रस्थापित झाल्यावर टेनिस कोर्टच्या आकाराचे सौर कवच उघडले गेले. हे कवच सूर्य, पृथ्वी व चंद्र यांचेपासून येणारा प्रकाश व उष्णता अडवून धरेल. या कवचावर खास तयार केलेल्या उष्णतारोधक द्रव्याचे पाच थर आहेत. प्रत्येक थर आत येणारी उष्णता अडवून धरेल, तरीसुद्धा जी उष्णता हे थर भेदून जाईल ती सौर कवचाच्या बाजूंनी परावर्तित केली जाईल. याव्यतिरिक्त प्रत्येक थरादरम्यान असलेली निर्वात पोकळी उष्णतारोधनाचे काम करेल.

हे सौरकवच एवढे प्रभावी आहे की, जी बाजू सूर्याच्या दिशेला असेल तेथील तपमान पाण्याच्या उत्कलन बिंदूएवढे असेल, तर उपकरणांच्या जवळचे तपमान -२३७ डिग्री सेंटीग्रेड एवढे कमी असू शकेल.

हे तपमान अवरक्त किराणांजवळच्या तरंगलांबींसाठीची उपकरणे कार्यरत राहण्यासाठी पुरेसे आहे. पण अवरक्त किरणांच्या मध्यभागीय तरंगलांबीच्या उपकरणांसाठी आणखी थंड वातावरणाची आवश्यकता असते. त्यासाठी वेब दुर्बीणीवर एक खास क्रायकूलर बसवला आहे. हा क्रायकूलर अतिशीत हेलियम दुर्बीणीच्या उपकरणांमध्ये अतिरिक्त दाबाने पम्प करेल. त्यामुळे तपमान -२६७ डिग्री सेंटीग्रेड पर्यंत खाली उतरेल.

वेब दुर्बीण बहिर्ग्रह शोधण्यासाठी दोन पद्धतींचा उपयोग करेल. जेव्हा एखादा बहिर्ग्रह त्याच्या पालक ताऱ्यासमोरून जातो, त्यावेळी ताऱ्याचे तेज थोडे मंद होते. हे ताऱ्याच्या तेजाचे मंद होणे, वैज्ञानिकांना ताऱ्यासमोरून जाणाऱ्या ग्रहाविषयी बरेच काही सांगून जाते. उदाहरणार्थ, ग्रहाचे आकारामन आणि त्याचे ताऱ्यापासूनचे अंतर वगैरे. या पद्धतीला संक्रमण पद्धत म्हणतात.

दुसरी पद्धत आहे ती म्हणजे बहिर्ग्रहाच्या थेट प्रतिमा घेणे. यासाठी वेबवर कोरोनाग्राफ नावाचे उपकरण बसविण्यात आले आहे. हे उपकरण ताऱ्यांकडून येणारा तीव्र प्रकाश अंधूक करून दुर्बिणीकडे सोडते. त्यामुळे दुर्बिणीला बहिर्ग्रहाच्या थेट प्रतिमा घेता येतात.

वेब दुर्बीण स्पेक्ट्रोस्कोपीचा वापर करून बहिर्ग्रहांमध्ये कोणती मूलद्रव्ये आहेत हे सांगू शकते. ताऱ्यांकडून येणारा प्रकाश वर्णपटल निर्माण करतो. हा वर्णपटल वेगवेगळ्या तरंगलहरींचा प्रकाश वेगवेगळ्या पट्ट्यांनी दर्शवितो. जेव्हा ग्रह ताऱ्यासमोरून जातो, त्यावेळी ताऱ्याकडून येणारा प्रकाश त्या ग्रहाच्या वातावरणातून जाऊन मग दुर्बिणीकडे येतो. ग्रहाच्या वातावरणातील वेगवेगळी मूलद्रव्ये वेगवेगळ्या तरंग लांबीचा प्रकाश शोषून घेतात. त्यामुळे ज्यावेळी ग्रह ताऱ्यासमोरून जातो, त्यावेळी मिळणाऱ्या वर्णपटलात फरक पडतो. त्यामुळे ग्रहाच्या वातावरणात कोणती मूलद्रव्ये आहेत ते समजते.

बहिर्ग्रहाच्या थेट प्रतिमा व स्पेक्ट्रोग्राफी वापरून वैज्ञानिकांना त्याचा रंग, त्यावरील वेगवेगळे ऋतू, ग्रहाचे परिवलन, हवामान वगैरे अनेक गोष्टी समजतात. यातील काही बहिर्ग्रह पृथ्वीसारखे असण्याची शक्यता आहे

व ते त्यांच्या पालक ताऱ्याभोवती अशा कक्षेत फिरत असण्याची शक्यता आहे की ज्यामुळे त्या ग्रहावरील परिस्थिती द्रवरूप पाणी अस्तित्वात असण्यासाठी अनुकूल असेल.

वेब दुर्बिणीचा प्राथमिक आरसा व प्रचंड सौरकवच हे प्रक्षेपकावर बसवलेल्या संरक्षक कवचात सामावू शकत नाहीत, म्हणून त्यांच्या घड्या घालून ते संरक्षक कवचात बसविण्यात आले होते. प्रक्षेपणावेळचे प्रचंड हादरे व पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाच्या बाहेर पडतानाच्या वेळची प्रचंड उष्णता यांपासून या संरक्षक कवचामुळे वेब दुर्बिणीचे रक्षण झाले. सौरकवच एकवीस मीटर लांब व चौदा मीटर रुंद आहे. ओरोगामीमध्ये आपण जशा घडया घालतो तशा बारा घडया घालून हे सर्व संरक्षक कवचात बसविण्यात आले होते. बाकी अनेक प्रणालीसुद्धा अशाच पद्धतीने बसविण्यात आल्या होत्या.

प्रक्षेपणानंतर एक महिन्यानी वेब दुर्बीण तिच्या ठरविलेल्या कक्षेत प्रस्थापित झाली. त्यानंतर आरसे व सौरकवच उघडण्यात आले. त्यानंतरचे पाच महिने उपकरणे थंड होण्यासाठी व आरसे ठराविक पद्धतीत संरेखित करण्यासाठी लागले. प्रक्षेपणानंतर सहा महिन्यांनी वेब दुर्बीण कार्यान्वित झाली. आता या दुर्बिणीने अब्जावधी वर्षांपूर्वीच्या दीर्घिका, अब्जावधी वर्षांपूर्वीच्या ताऱ्यांचे जन्म व मृत्यू, अनेक प्रकाशवर्षे दूर असणाऱ्या बहिर्ग्रहांच्या वातावरणातील मूलद्रव्यांचा  वर्णपट आदि बहुमूल्य माहिती पाठविण्यास सुरुवात केली आहे. वैज्ञानिक त्या माहितीचा अभ्यास करीत आहेत. आणि एक दिवस नक्की उजाडेल जेव्हा आपणास हे विश्व कसे उत्पन्न झाले, विश्वात पृथ्वीव्यतिरिक्त कोठे जीवन आहे का आदि प्रश्नांची उत्तरे नक्कीच मिळतील.

श्री राजीव गजानन पुजारी - **विश्रामबाग, सांगली मो. 9527547629**





## लेख - घ डी !

"हाताची घडी, तोंडावर बोट !"

श्री प्रमोद वामन वर्तक

लहानपणी शाळेत शिकत असतांना आपापल्या बाईकडून अथवा गुरुजींकडून असा सज्जड दम, माझ्या समकालीन लोकांनी नक्कीच ऐकला असणार ! त्यावेळच्या त्यांच्या त्या एका वाक्यातच एवढा दम भरलेला असायचा, की आम्ही सगळी मुलं, मुली, आमच्या हाता बोटाला गम  लावलेला नसतांना सुद्धा, डाव्या हाताच्या तळव्यात उजव्या हाताचे कोपर धरून, उजवा हात छातीवर उभा धरून, उजव्या हाताचीच तर्जनी आपल्या नाकाखाली ओठावर दाबून, चिडीचूप होतं असू ! हे वाचल्यावर, आपल्यापैकी अनेकांनी, मी वर्णन केलेली घडीची पोज बरोबर आहे का नाही, याचे प्रात्यक्षित लगेच केल्याचे, त्या महाभारतातल्या संजयासारखी दिव्य दृष्टी नसतांना सुद्धा, मला अगदी स्पष्ट दिसतंय ! आपल्या दोघांच्या मनातील विचारांची घडी, आपण हा लेख बहुतेक मनापासून वाचत असल्यामुळे, त्याची चारी टोकं एकमेकांना बरोब्बर जुळल्यामुळे तसं झालं असावं !

माझ्यावर काही वर्ष गावच्या शाळेत शिकण्याची वेळ आली तेव्हाची गोष्ट. त्या वेळेस आमच्या वर्गात, गावच्या सावकाराचा मुलगा रोज परीट घडीचे कपडे घालून यायचा ! त्याच्या त्या कपड्याचे आम्हाला तेंव्हा फार म्हणजे फारच अप्रूप वाटतं असे ! त्याच्या त्या तशा परीट घडीच्या कपड्यांना आम्ही कधी हात लावून बघायला गेलो, की तो लगेच " लांबून बघा रे, नाहीतर माझ्या सदऱ्याची घडी बिघडेल ! " असं बोलून आम्हाला दूर करायचा ! एवढंच  कशाला त्याच्या त्या परीट घडीच्या कपड्यांची घडी मोडू नये म्हणून, आम्ही सारे मैदानी खेळ खेळत असतांना हा मठ्ठ वर्गातच बसून आमचे खेळ पहात बसायचा, आता बोला ! त्याच्या त्या परीट घडीच्या कपड्यांची ऐट आम्हां बाकीच्या मुलांना त्या काळी परवडत नसे. मग आम्ही मुलं, रात्री शाळेची विजार आणि सदरा यांच्याशी झटापट करून त्यांची जमेल तशी त्याच्या त्या परीटघडीच्या कपड्यासारखी घडी करायचो. कपड्यांची तशी घडी एकदाची करून झाली की मग त्यांना दोन लाकडी पाटांच्यामधे रात्रभर ठेवून, त्यावर जड लोखंडी खलबत्ता ठेवायचो ! मग दुसऱ्या दिवशी, घरच्या 'पाट घडीचे' कपडे करून रुबाबात सकाळी शाळेत जायचो ! आता हे सगळं आठवलं की थोडं हसायला येतं, पण मग काही काळ का होईना, काही ना काही कारणाने बिघडलेली चेहऱ्याची घडी, या अशा आठवणीमुळे त्याच्या वरच्या सुरकुत्या जाऊन परत मूळ घडीवर येई, एवढं मात्र नक्की !

"काय गं, हल्ली सुमी गेली बरेच महिने माहेरी येवून राहिल्ये म्हणे ! खरं काय झालंय ते कळलं का गं तुला ?"

"नाही काकू, मला तसं कारण कळलं नाही, पण त्यांच्या लग्नाची घडी सध्या तरी विस्कटल्ये, एव्हढंच कानावर आलंय माझ्या !"

मंडळी, फार फार वर्षापूर्वी बरं का, लग्नाला काही वर्ष लोटल्यावर, चांगली दोन तीन अपत्ये झाल्यावर सुद्धा, या ना त्या कारणाने सुखी वाटणाऱ्या संसाराची घडी कधी कधी विस्कटायची !  मंडळी, आजच्यासारखी

लग्नाला फक्त एक, दोन महिने झाल्याझाल्या संसाराची घडी साध्यासुध्या कारणाने कधीच मोडत नसे ! शिवाय आजच्याप्रमाणे हे सगळं प्रकरण घटस्फोटापर्यंत जाण्याचा तो काळच नव्हता ! तर त्या काळी, अशा एखाद्या संसाराच्या घडी विस्कटलेल्या प्रसंगी दोन्हीकडचे अनुभवी, समंजस लोकं एकत्र येवून, अशा घडी विस्कटलेल्या संसारातील त्या नवरा बायकोला चार गोष्टी समजून सांगायचे आणि त्या दोघांना त्या गोष्टी पटायच्या सुद्धा ! त्यामुळे त्यांच्या विस्कटलेल्या संसाराची घडी पुन्हा नव्याने नीट बसायची आणि असे अनेक विस्कटलेले संसार, पुन्हा सुखा-समाधानाने संसाराची नवीन घडी घालून आनंदाने आपापल्या संसाररुपी वेलीवर नवीन फुलं फुलवत असतं ! हे माझ्याप्रमाणे आपण सुद्धा बघितले असेल ! गेली ती समंजस नवरा बायको आणि त्यांना समजावणारे त्या वेळची अनुभवी लोकं ! त्यामुळे, कालाय तस्मै नमः ! असं हाताची घडी घालून म्हणण्याव्यतिरिक्त आज आपण दुसरं काय करू शकतो ?

"काय गं सूनबाई, आठ दिवसापूर्वी तुझ्या डोहाळे जेवणाला माझ्या जाऊबाईंनी तुला दिलेली नऊवारी साडी दिसत नाही कुठे ?"---- "अहो आई, ती मी कुंदावन्सना घडी मोडायला दिली आहे !"

हे असे संवाद आपल्याला आपल्या लहानपणी कानावरून गेल्याचं आठवतंय का ? मंडळी, नीट आठवून बघा! त्या काळचा समस्त महिलावर्ग आपल्याला मिळालेली एखादी नवी कोरी सहावारी अथवा नऊवारी साडी, प्रथम देवा समोर ठेवून, स्वतः नेसून तिची घडी न मोडता आपल्या नात्यातील महिलेला घडी मोडण्यासाठी देत असत !

तेव्हा ही अशी प्रथा का होती, हा एक सखोल संशोधनाचा विषय नक्कीच ठरायला कोणाची हरकत नसावी ! आपल्याकडे पूर्वी अशा अनेक (मला) अजूनही अनाकलनीय असलेल्या प्रथा होत्या ! या बाबतीत, आपल्यापैकी कोणी चेहऱ्याची हसरी घडी न मोडता, त्यावर प्रकाश टाकणार असेल, तर मी माझ्या चेहऱ्याची घडी न मोडता ते ऐकून घ्यायला तयार आहे ! पण ते ऐकत असतांना जर का माझ्या चेहऱ्याची घडी बिघडली, तर समोरच्याने त्याचा योग्य अर्थ लावावा, एवढीच विनंती !

"सगळा स्वयंपाक येतो का गं तुला ? "

"हो येतो ना ! "

" पोळ्या ?"

" हो पोळ्या सुद्धा येतात !"

" घडीच्या ?"

त्या काळी मुलगी बघायच्या कार्यक्रमात साधारण इतर प्रश्नांसोबतच, वरील प्रश्न-उत्तरे होत. पण भावी सासूच्या शेवटच्या प्रश्नावर, भावी वधूच्या चेहऱ्याची घडी मोडत असे ! आजकाल काही काही भगिनींना घरचे स्वयंपाकपाणी करून सात सत्तावन्न गाठायची घाई असते ! त्यामुळे त्यांचे अर्धे लक्ष भिंतीवरच्या घडीत असल्यास नवल नाही ! मग अशा घडीच्या पोळ्या करायला त्यांना वेळ कुठून मिळायला ?

" अंथरुणातून उठतांना चादरीची नीट 'घडी' घालून ठेव !"

हा असा आदेशवजा हुकूम, माझ्या पिढीतील तमाम लोकांनी सकाळी सकाळी गादीवरून उठतांना, आपापल्या आई कडून अथवा वडिलांकडून नक्कीच ऐकला असेल ! आजच्या तरुण पिढीला त्यांचे मम्मी, डॅडी अशी रिक्वेस्ट करण्याचे डेअरिंग करत असतील का ? असा प्रश्न माझ्या हरघडी मनात येतो ! मुळात आजच्या पिढीला घडीचा फक्त एकच एक अर्थ माहित असावा आणि तो अर्थ म्हणजे त्यांच्या हातावरील घडी, इतकी आजकाल त्यांची नोकरीतली फरफट बघितली की मला म्हणावसं वाटतं ! त्या घडीतील सतत धावणाऱ्या नंबररुपी काट्याबरोबर आपल्याला सुद्धा त्यांच्या स्पीडने किंवा कधी कधी त्यांच्या स्पीडपेक्षा जास्त जोरात, दिवस रात्र धावायचं आहे, इतकंच या पिढीला ठाऊक असतं ! त्यामुळेच आजकाल त्यांच्या हातावर बांधलेल्या घडीत, अहोरात्र ऑफिसचे मेसेजेस येत असतात आणि असा मेसेज आला रे आला की, हे सगळेजण त्यांच्या हातातली कामं टाकून त्या मेसेजला तत्परतेने उत्तर पण देत असतात ! हे आपण सर्वांनी आपापल्या हाताची निमूटपणे घडी घालून बघितले किंवा अनुभवले सुद्धा असण्याची शक्यता नाकारता येत नाही ! या बदललेल्या त्यांच्या घडीच्या अर्थाला, सर्वार्थाने त्यांचे आजचे अर्थार्जन कारणीभूत आहे, हे आजच्या घडीचे पालक नक्कीच जाणतात ! आणि त्यामुळेच अशा घडीच्या काट्यावर धावणाऱ्या आपल्या मुलाला किंवा मुलीला जमेल तेवढी ते मदतच करत असतात, हेही तितकंच खरं ! त्यामुळे माझ्या पिढीने, वर सुरवातीला म्हटल्याप्रमाणे लहानपणी आपल्या आई किंवा वडिलांकडून ऐकलेला आदेशवजा हुकूम हल्ली कोणी कोणाला द्यायचा प्रश्नच येत नसावा ! असो, पुन्हा एकदा कालाय तस्मै नमः !

मंडळी, जाता जाता मला असं म्हणावंसं वाटतं की मला ठाऊक असलेल्या काही ठराविक प्रातिनिधिक घडया, मी आपल्या समोर उघडून (का नीट घडया घालून ?) मांडायचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे ! आपण वरील लेख वाचत असतांना, जर आपल्या चेहऱ्याची घडी मोडली नसेल, तर माझ्या या लेखाचे सार्थक झाले, असं आजच्या घडीला तरी मी नक्कीच म्हणू शकतो !

**श्री प्रमोद वामन वर्तक** - दोस्ती इम्पिरिया, ग्रेशिया A 702, मानपाडा, ठाणे (प.) मो - 9892561086



# लेख   - गंध सुगंध



सौ. उज्वला सुहास  सहस्रबुद्धे

'चला, उठा, मोती साबणाच्या स्नानाची वेळ झाली ' म्हणत येणाऱ्या छोट्या मुलाची जाहिरात टीव्हीवर दिसू लागली की दिवाळी जवळ आल्याची जाणीव होते. आणि तऱ्हेतऱ्हेचे सुगंध परिसरात दरवळू लागतात. सुगंधी तेल, साबण, उटणे, अत्तर यांचे वास नाकाला येऊ लागतात.

पंचंद्रियात गंधाचे इंद्रिय हे फार तीक्ष्ण असते. कोणत्या वासामुळे आपण कुठे आहोत हे डोळ्यांनी न पाहता सुद्धा समजते. त्यावरून सहज आठवले ते पदार्थांचे वास!

यांच्या एका स्नेह्यांकडे रविवारी सकाळी नऊच्या सुमारास जावे, की कांदे पोह्याचा वास अगदी बाहेरच्या दारापर्यंत यायचा ! तसे कांदे पोहे तेच पदार्थ घालून केले तरी त्यांच्या इतके छान जमतील असं वाटायचं नाही. तो कांदे पोह्याचा वास अजूनही स्मरणात आहे!

उन्हाळ्यातील संध्याकाळी अंगणात पाणी मारले की येणारा मातीचा वास- मृद्गंध, संध्याकाळी उमलणारी जुई, मोगरा, रात राणीची फुले यांचे सुगंध, हे काही कुपित भरून ठेवायचे गंधच नाहीत मुळी ! ते फक्त मनाच्या कुपीतच भरून राहतात आणि आपले आपल्याला अनुभवता येतात. असाच एक गंध माझ्या आजोळच्या घरात मी मनात भरलेला ! माझ्या मामाच्या घरी म्हैसूर सँडल् साबण वापरला जाई. तो येणारा चंदनी वास मला आजोळच्या घरी घेऊन जातो. आम्ही 'हमाम' साबण वापरणारे, त्यामुळे त्या चंदनी सोपचा वास आमच्यासाठी दुर्मिळच होता !

सुगंध हा असा सांगता तरी येतो पण माझ्या मुलीला आजीची गोधडी पांघरली, की आजीचा वास त्या गोधडीला येतो आणि तसाच वास आईच्या गोधडीलाही येतो असं ती म्हणायची तेव्हा मी बघतच राहायची! पण ते आजीचं आईचं पांघरूण तिला मायेच्या सुगंधात ओढून घ्यायचं !

कितीतरी वेगळे वास आपण दिवसभरात घेत असतो. किराणा मालाच्या दुकानात  तेल, डाळी, धान्य, साबण इत्यादींचा एकत्रित वास भरलेला असतो. आताच्या पॅकिंगच्या जमान्यात दुकानात येणारे हे वास आता कमी झाले आहेत. कापडाच्या दुकानातील कोऱ्या कापडाचा गंध हाही वेगळाच ! तो कॉटनला येणारा वास आता सिंथेटिक कपड्यांना नाही !

कामावर जाताना येताना लोकल, बस प्रवास यातील गंध, घामाचा कुबट वास नको म्हणून मारलेले विविध प्रकारचे स्प्रे, यामुळे होणारे वासाचे मिश्रण नाकाला झोंबणारेच वाटते. काही वेळा तर ते ऍलर्जीकही असते.

गंध सुगंधांच्या या दुनियेत देवघरात येणारा वास काही वेगळाच असतो. वातावरणाचा परिणाम असेल किंवा काही असेल, पण तिथे येणारा धूप, कापूर, उदबत्ती, अत्तर यांचा सुगंध मनाला पवित्रतेचा आनंद देतो. वेगवेगळे गंध आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी मिळत असतात आणि कळत नकळत ते आपण घेत असतो.

कोळीणीला माशांच्या गंधाइतके काहीच प्रिय नसते. तिच्या उशाशी जरी वासाची फुले ठेवली तरी त्यांच्या सुगंधापेक्षा मासळीचा गंधच तिला अधिक आनंद देतो !

बालगंधर्व अत्तराचे खूप शौकीन होते. त्यांच्या रोजच्या स्नानाच्या पाण्यात विविध प्रकारची अत्तरे वापरली जायची. त्यांच्यासाठी कनोजहून अत्तरे मागवली जायची. पूर्वीच्या काळी राजेरजवाडे अशा सुगंधी अत्तराचे मोठे खरेदीदार असत. तो जमाना गेला ! गंधांचे महत्त्व बदलले. त्यातला अकृत्रिम गंध दुर्लक्षित व्हायला लागला. सेंटची कृत्रिम दुनिया जन्माला आली आणि पाश्चात्य संस्कृतीचे सुगंध दरवळू लागले.

गंधाच्या दुनियेत एकदा शिरल्यावर बरेच काही सुगंध आणि आठवणी मनात दरवळू लागल्या. अंगणातल्या वेलीवर उमलणारी जुईची नाजूक फुले तोडून गजरे ओवणारी माझीच मी मला आठवले. सोनचाफ्याची फुले दप्तरात ठेवून वह्या पुस्तकांना सुगंधित करणारी आणि मोगऱ्याच्या वासावर अजूनही जीव टाकणारी मी, सुगंधाच्याबद्दल किती किती आणि काय काय लिहू?

सौ. उज्वला सुहास सहस्रबुद्धे - **मोबा. नं. ८०८७९७४१६८**






प्रधान संपादक - श्री हेमन्त बावनकर, पुणे

संपादक मंडळ (हिन्दी) श्री विवेक रंजन श्रीवास्तव, भोपाल / श्री जय प्रकाश पाण्डेय, जबलपुर

संपादक (अँग्रेजी) कैप्टन प्रवीण रघुवंशी (नौसेना मेडल), पुणे

संपादक मंडळ (मराठी) श्रीमती उज्ज्वला केळकर, सांगली / श्री सुहास रघुनाथ पंडित, सांगली / सौ. मंजुषा सुनीत मुळे, सांगली / सौ. गौरी गाडेकर, मुंबई

ईमेल - adm.eabhivyakti@gmail.com [प्रवेशांक निःशुल्क]

www.e-abhivyakti.com


शुभ दिवाळी २०२२